## प्रकरण पाचवे

# कला व स्थापत्य

कलेची निर्मिती का केली जाते, याविषयी उलट सुलट मते मांडली जातात. काही विद्वानांच्या मते कलानिर्मितीला बंधन नसावे ती मुक्त असावी. कलेसाठी कला की जीवनासाठी कला अशा प्रकारचे वाद या संदर्भात निर्माण झालेले दिसून येतात. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात कला ही केवळ करमणूकीचे साधन समजली जात नसावी. मानवाच्या प्रगतीसाठी भक्ती, ज्ञ ाान यांच्या इतकीच कलेची आवश्यकता होती.

कला हा स्त्रीलिंगी शब्द आहे. चित्र, संगीत, नाटय, स्थापत्य व शिल्प इत्यादी घटकांना कला असे म्हटले आहे. परंतु कला शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल व अर्थाबाबत विद्वांनात, भाषाशास्त्रज्ञात मतभिन्नता आहे. इंग्रजी भाषेमध्ये कलेसाठी 'ART' म्हटले जाते. 'ART' शब्दाचा संबंध फ्रेंच 'ART' व लॅटिन artis (आर्टिस) किंवा ars (आर्स) शब्दाशी जोडला जातो. अर् या धातूपासून हा शब्द बनला असून त्याचा अर्थ उत्पन्न करणे, बनविणे असा होतो.[१] संस्कृतमधील ईर् (जाणे, फेकणे, उपयोग करणे) हा धातू अर् या धातूशी संबंध मानलेला आहे. संस्कृतमध्ये कला किंवा शिल्प यांचा जो सर्वसाधारण अर्थ होतो. तोच अर्थ लॅटिन 'आर्स' शब्दाचाही होतो.

१३ व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रजी भाषेत 'ART' शब्दाचा प्रयोग फक्त कौशल्य अशा अर्थाने करण्यात आला. पुढे सतराव्या शतकानंतर संगीत, चित्र, काव्य, नृत्य, गायन, वास्तू, मूर्ती इत्यादी सर्व ? घटकांना उद्देशून कला शब्दाचा वापर होऊ लागला. कला शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत पंडितानी पुढीलप्रमाणे सांगितली आहे. १) कम् आनन्दं लाति इति = आनंद देणारी ती कला. २) कल् = शब्द करणे, वाजवणे यावरुन तत्संबंध्द ती कला. ३) कल म्हणजे सुंदर, मधुर, सुख्र देणारे ती कला. ४) कड् = मदमस्त करणे, प्रसन्न करणे. तदनुकुल ती कला होय. संस्कृत शब्दकोशात कला म्हणजे चंद्राचा सोळावा भाग. एख्राद्या वस्तूचा सोळावा अंश, राशीच्या तिसाव्या भागाचा साठावा भाग, मुद्दलाचे व्याज, काळाचा एक भाग, एख्राद्या कामातील अपेक्षित कौशल्य[२] असा दिला आहे. महाराष्ट्र शब्दकोशात कौशल्याच्या कामाला कला असे म्हटले आहे.[३]

महाराष्ट्र  शब्दकोशात दिलेला हा अर्थ कला शब्दाच्या आधुनिक अर्थाशी जवळचा वाटतो. कलेमध्ये भावनेला फार महत्व आहे. अंतकरणातील भावना व्यक्त करण्याचे कौशल्य म्हणजे कला होय. अशी कलेची समर्पक व्याख्या केली जाते. कला ही मानवाच्या विविध क्रियाप्रमाणे एक क्रिया आहे. मानवी सृजनशीलतेचा एक आविष्कार म्हणजे कला होय. सर्वप्रथम कलेची अमूर्त अभिव्यक्ती मनात होते आणि नंतर स्वर, शब्द, रंग, अभिनय इ.द्धारा तिचा बाहय आविष्कार होतो व मग दुसऱ्यालाही त्या कलाकृतीचा आस्वाद घेता येतो. भावनेची उत्कंठा वाढली म्हणजे ती कोणत्याही माध्यमाद्धारे व्यक्त होते. भावनेला प्रयत्नाची व कौशल्याची जोड देऊन कलाकार कला निर्मिती करतो. कलेचे सौंदर्य आत्मा असून, आनंद हा परिणाम आहे. कला ही संस्कृतीची जननी असून ती राष्ट्राची संस्कृती जिवंत ठेवणारे माध्यम सुध्दा आहे.

प्राचीन काळापासून भारतीयांना कलेचे विविध प्रकार ज्ञात होते असे दिसून येते. यजुर्वेदाच्या तिसाव्या अध्यायामध्ये वेगवगेळ्या ६४ कला प्रकाराविषयी विवेचन केले आहे.[४] जैन साहित्यामध्ये ७२ कलांचा संदर्भ आढळतो.[५] महाराष्ट्र व त्यातील मराठवाडयाला प्राचीन काळापासून कलेचा वारसा लाभलेला आहे. मराठवाडयाचा कलेचा इतिहास मोठा उद्बोधक आहे.प्राचीन मराठवाडयातील राजकीय इतिहासाची सुरुवात सातवाहन घराण्यापासून होते.सातवाहन घराण्यानंतर मराठवाडयावर वाकाटक घराण्याने राज्यकारभार केला. वाकाटक घराण्याने जवळजवळ ३०० वर्षे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कला व स्थापत्य क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केल्याचे दिसते. वाकाटक राजे शिव व विष्णूचे उपासक असले तरी त्यांनी बौध्द धर्माला राजाश्रय दिला. वाकाटकांच्या काळात मराठवाडयामध्ये हिंदु धर्माबरोबरच बौध्द धर्माची प्रगती झाली असल्यामुळे त्याकाळात कला व स्थापत्य क्षेत्रात निर्मिती झाली. मराठवाडयामध्ये हिंदू व बौध्द लेणी, बौध्दस्तूप व विहार, चित्रकला, मूर्तिशिल्प यांचा विकास झ-ाला. मराठवाडयातील अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, औरंगाबाद, उस्मानाबाद, नांदेड, खारोसा, कंधार, शिऊर इ. ठिकाणी कला व स्थापत्य क्षेत्रात बरीच प्रगती झाली. वरील स्थळांचा कला व स्थापत्याच्या आढावा प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

### ५.१ लेणी स्थापत्य :

भारतीय जीवनामध्ये धर्माचे स्थान अनन्यसाधारण आहे. भारतीयानी धर्मविषयक कल्पना कलेच्या माध्यमातून मांडण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. स्थापत्य आणि शिल्पकलेची खरी प्रगती मराठवाडयामध्ये वाकाटक कालखंडात झाली. या कालखंडामध्ये मराठवाडयातील अनेक ठिकाणी डोंगरामध्ये लेणी खोदण्यात आली. लेणी स्थापत्य हा स्वतंत्र कलाविष्कार किंवा वास्तू प्रकार आहे. लेणी स्थापत्यालाच शैलगृह, शैलस्थापत्य आणि गुंफा या नावानेही ओळखले जाते. राजे महाराजांनी बौध्द धर्मियासाठी (बौध्द भिक्खू- भिक्खूणी) लेणी खोदण्यासाठी दान दिले. आपल्या देशातील डोंगराळ भागामध्ये लेणी खोदकाम करण्यात आले. परिणामी भारतामध्ये १५४५ लेणींची [६] निर्मिती झाली. लेणी निर्मितीमध्ये भारतातील मौर्य, सातवाहन, गुप्त, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालूक्य, कांचीचे पल्लव व देवगिरीचे यादव इत्यादी राजघराण्याने महत्वाचे योगदान दिले. वरील लेणीपैकी जवळ जवळ ८०० पेक्षा अधिक लेणी महाराष्ट्रात आहेत.[७] म्हणजेच एकूण लेण्यांच्या ६० टक्के एवढी लेणी महाराष्ट्रात उपलब्ध आहे.[८] तसेच कलेच्या दृष्टीकोनातून श्रेष्ठ दर्जाची समजली जाणारी लेणी महाराष्ट्रातच आहेत. ही सर्व लेणी सहयाद्रीत, काही मुख्य दक्षिणोत्तर श्रेणीत आणि कांही कोकणात तसेच देशावर पसरलेल्या सहयाद्रीच्या पूर्व-पश्चिम श्रेणीत आहेत. महाराष्ट्रात असणाऱ्या ८०० लेणीपैकी मराठवाडयात एकूण १२८ लेणी आहेत.[९]

लेणीचे खोदकाम करण्यात मौर्य सम्राट अशोक व दशरथ यांनी सर्वप्रथम सुरुवात केली. भगवान गौतम बुध्द हे बौध्द धर्माचे संस्थापक असून सम्राट अशोकाने बौध्द धर्मीय लेणी खोदकामास सुरुवात केली. गौतम बुध्दास वेदप्रामाण्य, परमेश्वराचे अस्तित्व व देवतानुग्रह मान्य नसल्यामुळे गौतमबुध्दाच्या हयातीत व नंतरही अनेक वर्ष बौध्दधर्मात मूर्तीपूजा प्रचलित नव्हती. गौतमबुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतर अनेक वर्षानंतर त्यांच्या अनुयायात महायान पंथ उदयास आला. या पंथाने मूर्तीपूजा सनातन धर्मापासून घेतली .महायान पंथाने मूर्तीपूजेचा अंगिकार केल्यावर गौतम बुध्दाचीच प्रतिमा बनवून तिची पूजा अर्चा सुरु केली. बौध्दमताचा विशेष प्रचार

सम्राट अशोकाने केला . त्याने स्तूप बांधल्याचे दिसून येते. पण बौध्द प्रतिमा कोरल्याचे संदर्भ सापडत नाहीत.[१०]

चैत्य,विहार, स्तूप या वास्तू बौध्द संप्रदायाच्या संबंधित आहेत. चैत्य म्हणजे बौध्दाचे देऊळ, प्रार्थना मंदिर होय. विहार म्हणजे बौध्द मठ जिथे बौध्द भिक्षूची राहण्याची व्यवस्था केली जाते. स्तूप म्हणजे मृत व्यक्तीचे स्मारक म्हणून बांधलेले शिल्प होय. बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी बुध्दाचे पात्र, वस्त्र, अस्थी, केस वगैरे वस्तू पूज्य मानून वाटून घेतल्या व त्यावर स्मारक स्तूप उभारले गेले. पुजनिय व्यक्तीचे अवशेष मातीच्या अथवा धातूच्या पायात घालून स्तूपाच्या मध्यभागी ठेवून त्यावर जो ढिगारा अथवा शिल्पकाम केलेले असते त्यास अंड म्हणतात. त्याच्या डोक्यावर एक चौरस वेदी असते तिला हर्मिका म्हणतात. हर्मिका भोवती कठडा व वर छत्र असते. स्तूपाच्या या पदविन्यासाचा पुढीलप्रमाणे तात्विक अर्थही लावला जातो. स्तूपाची संपूर्ण आकृती म्हणजे जगाची प्रतिकृती होय. चौथरा म्हणजे भूलोक व त्यावरील अर्धगोलाकार अंड म्हणजे आकाश स्तूपाच्या माथ्यावरील हर्मिका म्हणजे देवलोक आणि छत्र म्हणजे स्वर्ग होय.[११]

महायान पंथाने बुध्दाच्या मूर्ती निर्माण करण्यापूर्वी लोक स्तूपाची पुजा करत. प्रदक्षिणा घालता यावी म्हणून पुढील काळात प्रदक्षिणामार्ग बांधण्यात आले. स्तूपासमोर प्रार्थना, भजन करण्यासाठी सभामंडप बांधण्यात आले. स्तूप व सभामंडप असलेल्या प्रार्थना मंदिरालाच चैत्यग्रह असे नाव मिळाले. प्रत्येक विहाराशी सलग्न एक चैत्यमंदिर असे. महायान पंथाच्या अगोदर बौध्द धर्मात मूर्तीपूजा नव्हती. गौतमबुध्दाविषयी वाटणारा पूज्यभाव व्यक्त करण्यासाठी त्यांचे अनुयायी पुढील प्रतिकांची पुजा करत. बैल, घोडा, हत्ती, कमळ ही प्रतीके बुध्दाच्या जन्माशी संबंधित आहेत. बोधीवृक्ष हे ज्ञानप्राप्तीचे, धर्मचक्र हे पहिल्या उपदेशाचे तर स्तूप हे महानिर्वाणाचे . या प्रतिकांची प्रारंभीच्या काळात पूजा करत. या प्रतिकांना शिल्पकारानी आपल्या कलेमध्ये स्थान दिलेले दिसते.

लेण्यांना शैलगृह या नावाने ओळखले जाते. बौध्द धर्मामध्ये हीनयान व महायान पंथीयाची वेगवेगळी शैलगृहे होती. हीनयान पंथीमध्ये ‘स्तूप’ हा लेण्यात आढळतो. तर महायान पंथीयात लेण्यामध्ये बुध्दमूर्ती आढळते.[१२] बौध्द लेण्याचे चैत्य आणि विहार असे दोन भाग

आढळतात. चैत्यामध्ये सभामंडपात बुध्दमुर्ती अथवा स्तूप आढळतो तसेच तिथे प्रार्थना, प्रवचन यासाठी सभामंडप असतो. तर विहारात सभामंडपाच्या भोवती डोंगराच्या पोटात तिन्ही बाजूंनी लहान लहान खोल्या खोदलेल्या असतात.त्या खोल्यांमध्ये बौध्द भिक्षूंना विश्रांती घेण्यासाठी शयनासन म्हणजे लहान पलंगसदृश डोंगरात खोदलेला दगडी आकार असतो.

सम्राट अशोकाने तिसऱ्या बौध्द धर्मपरिषदेत बौध्द धर्माच्या प्रसारासाठी विभिन्न प्रदेशात धम्म प्रचारक पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 'महाधम्मरक्षित'हा स्थविर धम्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्रात आला व बौध्द धर्माचा प्रसार केला . त्यानंतर बौध्द स्थापत्य व शिल्प महाराष्ट्रात समृध्द झाले. प्राचीन भारतात भारतामध्ये मोठ मोठया डोंगरात खडक कोरुन लेणीचे खोदकाम करण्यात आले. परंतु भारतात ज्या ज्या ठिकाणी डोंगर आहेत. त्या सर्व ठिकाणी लेणी निर्माण करण्यात आल्या नाहीत. तर कलाकारांनी लेणी या स्थापत्य प्रकाराला अनुकूल असलेला खडक ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, अशाच डोंगरात लेणीचे खोदकाम केले.

भारतामध्ये सहयाद्री पर्वताच्या मोठ मोठया रांगा आहेत. या पर्वत रांगा लेणीच्या खोदकामासाठी आणि शिल्प प्रकाराला विशेष अनुकूल आहेत. लेणींच्या निर्मितीपूर्वी त्या खडकाचा आपणास हवा तेवढा भाग कोरुन, घासून सपाट केला जातो. यानंतर लेणीच्या खोदकामाला प्रारंभ करता येतो. सहयाद्री पर्वताचा खडक लेणी स्थापत्य प्रकाराला अनुकूल आहे. म्हणून कलाकारांनी जेथे जेथे सहयाद्री पर्वत आहे. तेथे तेथे लेणीचे खोदकाम केलेले नाही. भारतात ज्या ज्या ठिकांणी लेणीचे खोदकाम करण्यात आले त्या सर्व लेणी प्राचीन महामार्गावर व व्यापारी मार्गावर खोदण्यात आल्या. विशेष म्हणजे या सर्व लेणीचे खोदकाम नगरांपासून दूर अंतरावर असलेल्या डोंगरातच करण्यात आले. वाकाटक कालखंडात  मराठवाडयात अंजिठा, वेरुळ, औरंगाबाद, घटोत्कच, उस्मानाबाद येथे बौध्द लेणी तसेच शिऊर व खरोसा येथे हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती करण्यात आली आहे.

## बौध्द लेणी :

वाकाटक काळात औरंगाबाद अजिंठा, वेरुळ, उस्मानाबाद आणि घटोत्कच येथे बौध्द लेणींची निर्मिती करण्यात आली. चैत्यगृह आणि विहार हे बौध्द लेणी स्थापत्याचे दोन वास्तुप्रकार

आहेत. बौध्द भिक्खूंच्या प्रार्थनागृहास चैत्यगृह म्हणतात. चापाकार मंडप, नासिका व समोर आयाताकार ओवरी, गजपृष्ठाकार छत, प्रचंड आकाराचे चैत्य तोरण, छताला अर्धवर्तुळाकार लाकडी व दगडी गोपाने, आतमध्ये चौक, चौकात स्तूप, मागच्या बाजूस स्तूप, स्तूपाच्याभोवती प्रदक्षिणामार्ग व चौकाभोवती छताला आधार दिलेले अष्टकोणी खांब असा चैत्यगृहाचा पदविन्यास असे.[१३] बौध्द भिक्खूंच्या निवासस्थानासाठी डोंगर खोदून तयार केलेल्या वास्तूला विहार अशी संज्ञा होती. मध्यभागी प्रशस्त चौक व त्याभोवती ओळीने लहान लहान खोल्या, चापाकार चैत्य, आणि एक - दोन मोठे स्तूप असा विहाराचा पदविन्यास असे.[१४] प्रत्येक विहार स्वायत्त व स्वयंपूर्ण असे. वाकाटक काळात पुढील ठिकाणी बौध्द लेणी स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. वाकाटक राजांनी प्रामुख्याने विहार स्थापत्य निर्माण केले.

**वेरुळ :**

औरंगाबादमधील खुलताबाद तालुक्यात वेरुळ नावाचे गाव आहे. वेरुळ गावाजवळील चरणाद्री नावाच्या डोंगरात हिंदु- बौध्द व जैन अशा जवळ जवळ ३४ लेणींचा समूह आढळतो.लेणी क्रमांक १ ते १२ हया बौध्द धर्मीय, क्रमांक १३ ते २९ या हिंदू लेणी, क्रमांक ३० ते ३४ हया जैन धर्मीय लेणी आहेत. लेणी क्रमांक १ ते १२ या बौध्द धर्मीय असून त्यातील पहिल्या पाच लेणी हया वाकाटक कालखंडातील आढळतात. या पाच लेणीपैकी पाचव्या क्रमांकाची लेणी महारवाडा सोडून बाकी चार लेणी आकार, प्रकार व स्थापत्याच्या दृष्टिकोनातून अजिंठा लेणीशी मिळत्या जुळत्या आहेत.

**१) लेणी क्रमांक १**

हीनयान काळातील या गुंफेचे स्वरुप अत्यंत प्राथमिक अवस्थेतील आहे. केवळ पावसाळ्याच्या दिवसात बौध्द भिक्षुंना राहण्यासाठी म्हणून असलेली वर्षा विहाराची संकल्पना या गुंफेद्वारे पूर्ण होताना दिसते. बौध्द भिक्षुंना राहण्यासाठी या गुंफेमध्ये तिन्ही भिंतीत मिळून आठ खोल्या खोदलेल्या आहेत. या गुंफेचे आकारमान ही तसे लहानच आहे. त्यात कलाकारांच्या कौशल्याचे प्रतिबिंब कुठेही जाणवत नाही. काही खोल्या तर पूर्णपणे खोदवण्याचे कामही झालेले नाही. खांबाशिवाय खोदलेली ही गुंफा वेरुळ येथील सर्वात जुनी गुंफा असावी. हीनयान काळातील

या गुंफेत गाभारा नाही. तसेच कुठल्याही प्रकारची मूर्ती अथवा प्रतिमा संपूर्ण गुंफेमध्ये कुठेही नजरेस पडत नाही.

**२) लेणी क्रमांक २**

या गुंफेमध्ये बऱ्याच मोठया प्रमाणात कोरिवकाम दिसून येते. केवळ वर्षावास या संकल्पनेतून बाहेर पडून बौध्द भिक्षूंना राहण्याबरोबरच बुध्दाची पुजा,मनन व चिंतन या गोष्टी प्रतिमेसमोर करता येतील. या भावनेतूनच गुंफेच्या पाठीमागील भिंतीमध्ये गाभारा किंवा गर्भगृह खोदलेले आहे. या गर्भगृहामध्ये बुध्द प्रतिमा कोरलेली आहे. या संपूर्ण गुंफेत अनेक बौध्द प्रतिमा कोरलेल्या आहेत. गुंफेच्या प्रवेशद्वाराबाहेर डाव्या हाताला पद्‌मपाणी व उजव्या हाताला वज्रपाणी हे बोधिसत्व द्वारपालांच्या  रुपामध्ये उभे आहेत. गुंफा प्रवेशद्वाराच्या  डाव्या बाजूला एका छोटयाशा चौकोनी कोनडयात गर्भगृहात बुध्दप्रतिमा अतिशय साधी आहे. प्रलंबपादासनात बसलेली ही बुध्द प्रतिमा धम्मचक्र परिवर्तन मुद्रेतील आहे. बुध्दाचे पाय उमललेल्या कमलासनावर टेकलेले आहेत. बुध्द बसलेले आसन चौकोनी असून, त्यावर सिंहमुद्रा आहेत. पाठीमागे मकर, सिंह, हत्ती यांच्या मुद्रा आहेत. डाव्या बाजूला उडणारे गंधर्व दाम्पत्य आहे.गाभाऱ्यातील बुध्द मूर्तीच्या दोन्ही बाजुला चामरधारी सेवकाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. बुध्दाच्या उजव्या हाताशी उभा असणारा बोध्दिसत्व पद्‌मपाणी अवलेकितेश्वर आहे. बुध्दमूर्तीच्या डाव्या हाताला भव्य अशी मैत्रयाची सुंदर मूर्ती आहे. मैत्रयाचा मुकूट नक्षीदार असून, रत्नजडित अशा या सुवर्ण मुकुटामध्ये मोठया पदकाच्या मध्यभागी स्तूपाची प्रतिमा आहे. बोधिसत्वांच्या बाजूला पूर्णाकृती अशा बुध्दाच्या उभ्या प्रतिमा आहेत.

गाभाऱ्याच्या बाहेर दोन्ही बाजूला दोन बोधिसत्व द्वारपालाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. डाव्या बाजूला असेली बोधिसत्वाची मूर्ती ही पद्‌मपाणी अवलोकतिश्वराची आहे. पद्‌मपाणी अवलोकितेश्वराचा उजवा हात अभयमुद्रेत असून, त्यामध्ये रुद्राक्षमाला आहे. डाव्या हातामध्ये पद्‌म असून, डाव्या हाताला स्त्री देवता आहे. तसेच उजव्या बाजूला चामरधारी पुरुष सेवक उभा आहे. हा पुरुष सेवक मणीधर असून स्त्री देवता सदाक्षरी महाविद्या आहे. म्हणूनच हा अवलोकितेश्वर ‘सदाक्षरी लोकेश्वर’ आहे. उजव्या बाजूला बोधिसत्व वज्रपाणी उभा आहे.

अवलोकितेश्वरा प्रमाणेच वज्रपाणीची मूर्ती सुध्दा अतिशय उंच आहे. वज्रपाणीच्या मुकुटामध्ये आकर्षक कलाकुसर केलेली आहे.

लेणी क्रमांक २ च्या मुख्य प्रवेशद्धारातून आत शिरताच डाव्या भिंतीमध्ये उंच अशा चौकोनी कोनाडयात एका स्त्री देवतेची मोठी मूर्ती आहे. या स्त्रीने आपले वस्त्र कासोटयाच्या पातळाप्रमाणे नेसलेले आहे. वस्त्राच्या निऱ्या दोन्ही पायाच्या मध्यभागी सोडलेल्या आहेत.

**लेणी क्रमांक ३**

आकाराने लहान असलेली ही गुंफा लेणी क्र. दोनच्या मानाने अगदीच साधी आहे. शिल्पकला व कोरीवकाम याचे फारसे दर्शन या गुंफेमध्ये दिसत नाही. गुंफेच्या मध्यभागी असलेले चौरस आकाराचे सभागृह प्रत्येक बाजूला चार याप्रमाणे बारा खांबांनी आधारलेले आहे. सभागृहाच्या पाठीमागील बाजूस गाभारा असून त्यामध्ये गौतम बुध्दाची प्रतिमा कोरलेली आहे.

गर्भगृहातील बुध्दमूर्ती अतिशय ओबडधोबड आहे. प्रलंबपादासनात बसलेल्या गौतम बुध्दाच्या अंगावरील वस्त्र  धोतराप्रमाणे गुंडाळलेले आहे. डाव्या खांदयावरुन पाठीमागे नेलेल्या या वस्त्राचा सोगा बुध्दाच्या डाव्या हातामध्ये धरलेला स्पष्टपणे दिसत आहे. लेणीच्या गाभाऱ्यामध्ये बुध्दमूर्तीच्या दोन्ही बाजूला सेवकाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. उजव्या हाताला पद्मपाणी अवलोकितेश्वर असून, डाव्या हाताला मैत्रेय उभा आहे. मैत्रेयाच्या डोक्यावरील मुकुटाच्या मध्यभागी स्तूपाची अतिशय ठाशीव अशी प्रतिकृती कोरलेली आहे. उजव्या हातात ‘चामर’ धरलेला हा मैत्रेय अतिशय ऐटीत उभा आहे. गाभाऱ्याबाहेरील पद्मपाणी अवलोकितेश्वर व  वज्रपाणी या बोधिसत्व द्धारपालांच्या मूर्ती फारशा चांगल्या अवस्थेत नाहीत.

**लेणी क्रमांक ४**

लेणी क्र. ४ ही गुंफा आकाराने अगदी लहान आहे . गाभाराही अतिशय छोटया आकाराचा आहे. गाभाऱ्याच्या बाहेर दोन खांब आणि दोन अर्धस्तंभ यांनी वऱ्हांडयाची सीमारेषा उचलून घेतलेली आहे. वऱ्हांडयापलीकडे गुंफेची ओसरी आहे. स्तंभाचे कोरीवकाम घटपल्लव या पध्दतीचे आहे. घटपल्लव पध्दतीचे शिल्पकाम म्हणजे गुप्तकालीन शिल्पकलेचा प्रभाव आहे. दोन

आणि तीन क्रमांकाच्या गुंफांशी साधर्म्य सांगणारे स्तंभांचे कोरीवकाम पाहून या तीनही गुंफा साधारणत: समकालीन असाव्यात असे वाटते.

लेणी क्र. ४ मधील गाभाऱ्यातील बुध्दमूर्ती अतिशय साधी आहे. वरच्या बाजूला गंधर्व आणि गांधर्वी उडताना दिसत आहेत. बुध्दमूर्तीच्या उजव्या बाजूची बोधिसत्व मूर्ती समूळ नष्ट झ़ ालेली आहे. गाभाऱ्याच्या बाहेर प्रवेशद्धाराच्या डाव्या बाजूला बोधिसत्व पद्मपाणी असून, उजव्या बाजूला कोनाडयात अतिशय सुंदर शिल्पपट आहे. यामध्ये बोधिसत्व अवलोकितेश्वराची प्रलंब पादासनात कमलासनावर पाय ठेवलेली अतिशय भव्य अशी मूर्ती आहे. द्विभुज अशा या मूर्तीने आपल्या अभय मुद्रेतील उजव्या हातात अक्षमाला धरलेली असून डाव्या हातात कमलपुष्पाचा देठ आहे असे चित्र आहे.

अवलोकितेश्वराच्या डाव्या खांदयावर मृगाजिन पांघरलेले आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूला उभा असलेली स्त्रीमूर्ती तारा या बौध्द देवतेची आहे. तर उजव्या बाजूला उभी असलेली स्त्रीमूर्ती भ्रुकुटी या बौध्द देवतेची आहे. भ्रुकुटी, बोधिसत्व पद्मपाणी अवलोकितेश्वर व तारा या तिघांचा मिळून असलेला हा सुंदर शिल्पपट 'रक्तलोकेश्वर' म्हणून ओळखला जातो.

**लेणी क्रमांक ५**

अतिशय विशाल आकार असलेली ही गुंफा वेरुळ येथील सर्वात मोठा विहार आहे. या विशाल गुंफेमध्ये एकूण चोवीस स्तंभ आहेत. दहा स्तंभाची एक ओळ अशा दोन ओळी संपूर्ण विहाराला तीन भागात विभागतात. गुंफेच्या प्रवेशद्धारापासून शेवटच्या टोकापर्यंत या विहाराची लांबी एकशे सतरा फुट असून रुंदी साधारणपणे अठ्ठावन्न फुट आहे. विहाराच्या दोन्ही भिंतीमध्ये छोटी छोटी दालने व ओवऱ्या खोदलेल्या आहेत. या विहाराचा आणखी एक विशेष म्हणजे विहाराच्या मधल्या ओळीत संपूर्ण लांबीमध्ये दोन उंचवटे गुंफेच्याद्धारापासून गर्भगृहापर्यंत ठेवलेले आहेत. या उंचवटयांना पाहताना असे वाटते की, बहुधा विद्यार्थीदशेत असताना भिक्षू या उंचवटयांच्या दोन्ही बाजूस समोरासमोर बसत असावेत. उंचवटयाचा उपयोग अभ्यासाचे साहित्य - ठेवण्यासाठी होत असावा किंवा जेवणासाठी दोन्ही बाजूला भिक्षू बसत असून, जेवणाचे पात्र (ताट) या उंचवटयावर ठेवले जात असावे.

या विहारातील स्तंभाचे आकारमान त्याच्यावरील नक्षी व  कोरीवकामाचा प्रकार यावरुन तसेच विहाराच्या प्रशस्त लांबी- रुंदीवरुन हा विहार विद्यार्थी दशेतील भिक्षूंच्या वास्तव्यासाठी वापरला जात असावा. लेणीत धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुध्दाची मूर्ती आहे. लेणी क्र. १ ते ४ या धेरवाडा या नावाने ओळखल्या जातात. तर पाचव्या  क्रमांकाची लेणी महारवाडा या नावाने ओळखली जाते. गर्भगृहात गौतम बुध्दाची आसनस्थ मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूस द्वारपाल आहेत. लेणीत अवलोकितेश्वर  झोका घेत असल्याचेही शिल्प आहे. या लेणीचा उपयोग सामुदायिक पध्दतीने अध्ययन, अध्यापन, निवास, भोजन, धर्मचर्चा,पूजापाठ, प्रार्थना, प्रवचन तसेच सामाजिक व धार्मिक कार्यासाठी केला जात असावा. या विहाराचे आकारमान जरी एवढे विशाल असले तरी त्यामध्ये फारच थोडया शिल्पमूर्ती आहेत.

**घटोत्कच लेणी : -**

औरंगाबाद जिल्हयात सोयगाव तालुक्यात जंजाल, जंजाळा गावापासून ३ मैल अंतरावर असणाऱ्या डोंगरामध्ये घटोत्कच विहार आहे.[१५] घटोत्कच अजिंठा येथील लयनसमुहापासून दूर असला तरीही तो अजिंठा येथील लयन समुहाचाच एक भाग मानला जातो.[१६] पूर्वी येथे तीन लेणी होती असे दिसते. त्यापैकी सद्या दोन विहार अवशिष्ट आहेत. तिसऱ्या लेणीच्या फक्त कांही खुणा तेवढया दिसतात. राहिलेल्या दोन्ही लेणी विहार पध्दतीच्या आहेत. या दोन विहार पध्दतीच्या लेण्यापैकी एक आकाराने लहान असून त्याचे पुढील स्तंभ नष्ट झाले आहेत. एक अर्धस्तंभ व दुसऱ्या एका स्तंभाचे शीर्षक काळाच्या तडाख्यातून वाचले आहेत.[१७]

घटोत्कच लेणी पैकी दुसरे मोठे लेणे मात्र बरेचसे शाबुत आहे. त्याच्याही व्हरांडयाचे सर्व खांब नष्ट झाले आहेत.व्हरांडयाच्या उत्तरेच्या बाजूला एक खंडीत शिलालेख दिसतो. त्यामध्ये वराहदेवाची आरंभापासून वंशावळ दिली आहे. त्यातील काही ओळी वाचता येतात. तर काही खराब झाल्या असल्यामुळे वराहदेवाने कोणत्या उद्देशाने हे लेणे खोदविले व कोणत्या बौध्दभिक्षूसंघास दान दिले ही माहिती आता नष्ट झाली आहे. वाकाटक नृपती हरिषेण याचा सचिव वराहदेव यानेच ही लेणी खोदविली आहे.[१८]

घटोत्कच लेणी म्हणजे वाकाटकांचे एक सांस्कृतिक योगदान आहे. वाकाटक कालीन शिल्प स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून या लेण्यांचा उल्लेख केला जातो. घटोत्कच लेणीतील शिल्पे दृष्टीने प्रगल्भ व लावण्यपूर्ण आहेत. मूर्तीच्या शारीरिक ठेवणीपासून हातापायांची बोटे यांच्या घडणीपर्यंतच्या प्रत्येक क्रियेत लालित्य आहे. मूर्तीतून प्रतीत होणारे सौंदर्य मती गुंगविणारे आहे. या लेणीतील दोन विहारापैकी एक मोठा आहे. तो समुरे ८० फुट  लांब (२५ मीटर ) नि तितकाच रुंद आहे. हा विहार अंजिठा येथील १६ व्या लेण्याप्रमाणे आहे. या विहारास २० स्तंभ आहेत. या विहाराला तीन आयाताकृती प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या समोरच्या भागात सहा अष्टकोणी स्तंभ असून त्या समोर मोकळा व्हरांडा आहे. प्रवेशद्वाराच्या वरच्या दोन्ही बाजूस दोन स्त्री प्रतिमा कोरलेल्या आहेत.

विहाराच्या अगदी पाठीमागच्या बाजूस तीन गर्भगृहे आहेत. यातील मधले हे आकाराने मोठे व मुख्य गर्भगृह असून यात बुध्दाची धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील मूर्ती आहे. त्याच्या उजव्या बाजूस वज्रपाणी चामर घेऊन उभा आहे. डाव्या बाजूसही चामरधारी पद्मपाणी असावा. पण त्यांच्या हातात कमळ दिसत नाही. सिंहासनाच्या खालील भागावर दोन हरिणांच्या मध्ये धर्मचक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस शिष्य व श्रावक गुडघे टेकून बसलेले दाखविले आहेत. बुध्दाच्या डोक्याभोवती प्रभावलय असून त्याच्या दोन्ही बाजूस विद्याधर व विद्याधरी आकाशांतून माला घेऊन पुजेकरिता येत असलेले दाखविले आहे.[१९] बुध्द मूर्तीजवळ विद्याधर, धर्मचक्र व हरिण नेहमीप्रमाणे आहेत. मधल्या दरवाजाच्या चौकटीवर सुंदर नक्षीकामाच्या दोन पट्ट्या आहेत. तिसऱ्या पट्टीवर बसलेल्या व उभ्या असलेल्या बुध्दमूर्ती, मिथून वगैरे कोरुन तिला शोभिवंत केले आहे. छावणीच्या उंचीवर दोन्ही बाजूस एक देवता आहे.[२०] पण अजिंठयाच्या लेणीतल्याप्रमाणे तिचे वाहन मकर नसून वराह आहे. हे लेणे वराहदेवाने खोदविले यांचे ते सूचक असावे. बाजूच्या दरवाजांना व खिडक्यांना पद्मासनस्थ बुध्दमूर्तियुक्त चैत्यवातायनांनी व त्यावर गोलाकृतींनी सुशोभित केले आहे. मराठवाडयाची भूमी ही खऱ्या अर्थाने भारतीय इतिहासाचा अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. त्या सांस्कृतिक ठेव्यातील घटोत्कच लेणे हे अनमोल रत्न आहे. घटोत्कच लेण्यात शिल्प, मूर्ती व उत्तम प्रकारची रंगचित्रे तयार करण्यात आली आहेत.

**औरंगाबाद :**

खडकी उर्फ औरंगाबाद (संभाजीनगर) हे महाराष्ट्रातील जिल्हयाचे आणि मराठवाडा विभागाचे प्रमुख ठिकाण. गोदावरीची उपनदी खाम या नदीच्या उजव्या तीरावर हे वसलेले आहे. १६०४ मध्ये हे नगर मलिक अंबरने वसवले. याचे मूळ नाव 'खडकी' परंतु औरंगजेबाने त्याचे औरंगाबाद केले. छ. संभाजी महाराजांच्या धाकामुळे येथला कोट उभारला गेला. म्हणूनच आता या गावाचे नाव संभाजीनगर होऊ पाहत आहे.

सहयाद्री पर्वतार्गत देवगिरी पर्वतश्रेणीतील तीन गुंफा समुहापैकी औरंगाबाद हा ही महत्वपूर्ण नि वैशिष्टयपूर्ण गुंफासमूह आहे. औरंगाबादच्या बेगमपुरा या उपनगराच्या उत्तरेला साधारणपणे आठ कि.मी. अंतरावर सहयाचल टेकडयांत ही लेणी कोरलेली आहेत. औरंगाबाद येथील लेण्यांचे दोन समूह आहेत. दोन्ही एकमेकांपासून साधारणत: दोन कि.मी. अंतरावर आहेत. बिबीका मकबरा या थडग्यापासून लेण्यांकडे रस्ता जातो. सहयाद्री पर्वताच्या रांगते सुमारे २ कि.मी. अंतरातील डोंगरात एकूण १२ बौध्द लेणीचे खोदकाम करण्यता आले.[२१] हे खोदकाम वाकाटक व बदामीच्या चालुक्य घराण्याच्या कालखंडात करण्यात आले. या भागावर वाकाटक व बदामीच्या चालुक्य घराण्याची सत्ता होती. येथील लेणी एकाच डोंगरात विशिष्ट अंतर ठेवून तीन ठिकांणी कोरलेल्या आहेत. त्यामुळे येथील लेण्यांचे आपोआपच तीन विभाग पडतात. पहिल्या विभागामध्ये १ ते ५, दुसऱ्या विभागामध्ये ६ ते ९ आणि तिसऱ्या विभागात १० ते १२ औरंगाबाद येथील १२ लेणीपैकी केवळ लेणी क्रमांक १,२,५,६,७ व ८ या सहा लेणी वाकाटक काळातील आहेत.

**लेणी क्रमांक : १**

लेणी क्रमांक १ ही अपूर्ण असून या लेणीस प्रवेशद्वार व खिडक्या आहेत. लेणीच्या भिंतीवर यक्ष व बुध्दाची चित्रे आहेत. या लेणीत भगवान गौतम बुध्दाच्या विविध आसनयुक्त प्रतिमा आहेत. नागराज, नागराणी, बोधिसत्व, पद्मपाणि आणि वज्रपाणी यांच्याही कोरीव मूर्ती आहेत. या लेणीजवळच पाण्याचा हौद असून ही लेणी विहार आकाराची आहे. या लेणीच्या व्हरांडयाचे छत चार खांबावर आधारलेले आहे.

**लेणी क्रमांक : २**

या लेणीच्या गर्भगृहात बुध्दाची मूर्ती आहे. बुध्द मूर्तीच्या बाजूला पद्‌मपाणि वज्रपाणी व ागराज आहेत. या लेणीमध्ये प्रदक्षिणापथ कोरलेला आहे. या लेणीमध्ये दोन खांब असून या खांबावर शिल्पे कोरलेली आहेत. गर्भगृहातील बुध्दाची मूर्ती धम्मचक्रप्रवर्तन मुद्रावस्थेतील असून ती आकाराने मोठी व शिल्पकलेच्या दृष्टीने अतिशय महत्वाची वाटते. बुध्दमूर्तीच्या दोन्ही बाजूला बोधिसत्व अवलोकितेश्वर असून त्याच्या हातामध्ये कमळाचे फूल आहे. या विहारगुंफेचे अनेकानेक बुध्दमूर्ती व विशाल प्रदक्षिणापथ ही वैशिष्ट्ये आहेत.

**लेणी क्रमांक : ५**

लेणी क्रमांक ५ विहार असून या विहाराच्या पाठीमागच्या प्रदक्षिणामार्गयुक्त खोलीत भगवान गौतम बुध्दांची मूर्ती आहे. बुध्दमूर्तीच्या वर गंधर्व हातात पुष्पमाला घेऊन उभे आहेत. बुध्द मूर्तीच्या बाजूलाच बोधिसत्व आहे. लेणीच्या डावीकडील प्रवेशद्वाराजवळ तीन ठिकाणी बुध्दाच्या मूर्ती आहेत. सुरुवातीच्या काळात ही लेणी जैन धर्मगुरु वर्धमान महावीर यांचे मंदिर होते. सद्या महावीर प्रतिमा म्हणून जैन भक्त मंडळी तिची पूजा करतात.

**लेणी क्रमांक ६**

लेणी क्रमांक ६ मध्ये बुध्दाची प्रलंबपादमुद्रेतील मूर्ती आहे. बुध्दमूर्तीसोबत स्त्री - पुरुषांच्या प्रतिमा आहेत. तसेच पद्‌मपाणि व वज्रपाणी आहेत. मध्यभागी श्रीगणेशाची मोठी मूर्ती आहे. ही लेणी विहार व चैत्य अशा संमिश्र स्वरुपाची आहे. या लेणीचा व्हरांडा ३८ फुट १ इंच लांब व ९ फुट रुंद आहे. त्याच्या छताला चार खांबाचा आधार दिला आहे. यामधील खांब मध्यभागापर्यंत गुळगुळीत असून त्याच्या वरच्या बाजूला कोरीव काम केलेले आहे. व्हरांडा व लेणीच्या बाजूच्या भिंतीवर चित्रकाम केलेले होते; परंतु आज त्याचे केवळ अवशेष बाकी आहेत.

**लेणी क्रमांक ७**

औरंगाबाद लयन समुहातील सर्वश्रेष्ठ लेणी म्हणून लेणी क्रमांक ७ चा उल्लेख होतो. या लेणीच्या दोन्ही बाजूस द्वारपाल असून उजवीकडे संकटग्रस्तांना मदत करत असताना अवलोकितेश्वर दाखवला आहे. गर्भगृहात बुध्दाची मूर्ती आहे. या लेणीत चार खांब आहेत. व्हरांडयाच्या डाव्या बाजूला बोधिसत्व आहे. व्हरांडयाच्या दोन्ही कोपऱ्यामध्ये गंगा व यमुना नदी

यांचे शिल्प आहे. लेणीमध्ये प्रलंबपाद आसन अवस्थेतील व धम्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बुध्दाची मूर्ती आहे. त्यांच्या पायाजवळ एक ठेंगू यक्ष आहे. डाव्या बाजूच्या भिंतीवर नृत्य करणाऱ्या स्त्रियांचा समूह आहे. या नृत्यसमुहातील नायिकेचा साजशृंगार पारंपारिक पध्दतीचा आहे. नृत्यसमूहाच्या उजव्या बाजूस प्रेक्षकांचा समूह बसला आहे. या नृत्यसमूहातील प्रमुख नायिका म्हणजे नर्तिका ही औरंगाबादची राजतडाग आहे. या लेणीतील सभागृह ३८ फुट रुंद आहे. यामध्ये पुन्हा एक हॉल असून त्याची लांबी ३४ फुट व रुंदी २४ फुट आहे. लेणी क्रमांक ७ ही औरंगाबाद लेणीसमुहातील सर्वात श्रेष्ठ लेणी म्हणून ओळखली जाते.

**लेणी क्रमांक ८ :**

औरंगाबाद लेणीसमूहातील वाकाटक कालीन लेणी क्रमांक ८ ही सद्या नावापुरतीच शिल्लक आहे. याचा आकार २७ फुट लांब व २० फुट रुंद आहे. या लेणीच्या समोर व्हरांडा आहे. व्हरांडयाच्या डाव्या बाजूस उध्वस्थ अवस्थेतील बुध्दाची मूर्ती आहे. व्हरांडयाच्या बाहेर सहा स्त्रीया आहेत. लेणीच्या दुसऱ्या भिंतीवर बुध्द, बोधिसत्व व त्यांच्या अनुयायांचे शिल्प आहे. औरंगाबाद येथील आठव्या क्रमांकाच्या लेणीत विशेष काही नाही.

**अजिंठा :**

बौध्द लेणीसाठी प्रसिध्द असलेले हे एक जगप्रसिध्द ठिकाण आहे.औरंगाबादच्या (संभाजी नगरच्या) उत्तरेला सुमारे ११० कि.मी. अंतरावर अजिंठा येथील जगप्रसिध्द लेणी आहेत. प्रसिध्द चिनी प्रवासी युआन च्यांग (इ.स. ६०२ ते ६९४) हा दक्षिणेत बादामीला गेला असता त्याने या गुंफांचे जे वर्णन ऐकले ते लिहून ठेवले आहे.[२२] ते असे महाराष्ट्र देशाच्या पूर्व भागात एक मोठी पर्वतश्रेणी आहे. तिथे एका दरडीत भव्य मंडप दालने कोरलेली आहेत. त्यांत एक मोठा संघाराम आहे. अचेलो या पश्चिम भारताच्या रहिवाशाने तो खोदविला असे सांगतात. त्यातील मंदिर शंभर फुटांहूनही अधिक उंच आहे. त्या मंदिरात सत्तर फुट उंचीची एक भव्य बुध्दमूर्ती आहे. पुढे निर्मनुष्य झाल्यानंतर तिथे रान माजले आणि त्यात जंगली जनावरांनी वसती केली . त्यामुळे मध्ययुगात हे स्थान अज्ञातच राहिले. त्याचा शोध लावण्याचे श्रेय परकीय राज्यकर्त्यानाच द्यावे लागते. इ.स. १८१९

मध्ये मद्रास विभागातील काही गोरे लष्करी अधिकारी अजिंठयाच्या रानात हिंडत असताना, त्यांनी ही लेणी पाहिली. व इ.स. १८२४ मध्ये जनरल सर जेम्स अलेक्झांडर याने तिथे जाऊन त्या सर्व गुंफाची नीट पाहणी केली आहे.[२३]

अजिंठा लेणी पाहण्याचा जो प्रमुख केंद्रबिंदू आहे. त्यास व्हयु पॉईट म्हणतात. येथून सर्व लेणी सहजपणे दिसतात. येथूनच वघेरा नावाची नदी वाहते. इ.स. १९५१ मध्ये अजिंठा व वेरुळ लेणींना भारत सरकारने राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले. यानंतर दोन वर्षानी या लेणी भारतीय पुरातत्व विभागांकडे सोपविण्यात आल्या. बौध्दधर्मात महायान व हीनयान हे दोन पंथ आहेत. हीनयान पंथाला मूर्तिपूजा मान्य नाही. तर महायान पंथीय लोक मूर्तिपूजक आहेत. हीनयान पंथीय लोकांनी स्तूपांची पुजा करण्यास प्रारंभ केला तर महायान पंथीय लोकांनी बुध्द मूर्तीपूजा सुरु केली. वाकाटक काळात अजिंठा येथे हीनयान व महायान या दोन्ही पंथाच्या लेण्या आहेत.

अजिंठा लेणीच्या खोदकामास पैठणच्या सातवाहन घराण्यातील सम्राटांनी सुरुवात केली. वाकाटकांच्या काळात अजिंठा येथील लेणी क्र. १,२, १६,१७, व १९ चे खोदकाम झाले. वाकाटक सम्राट हरिषेण (इ.स. ४७५ ते ५००) याचा सचिव हस्तिभोज याचा पुत्र वराहदेव यांने अजिंठा लेणी क्रमांक १६ खोदण्यासाठी आर्थिक साहाय्य केले. या लेणीत वाकाटककालीन असलेल्या शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.[२४] या शिलालेखावरुन वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहिती मिळते. अजिंठा लेण्यांच्या निर्मितीचा काळ इसवी सनाचे दुसरे शतक ते सातवे शतक असा आहे.

**लेणी क्र. १**

या लेणीत २० खांबावर आधारीत एक दालन आहे. खांबावर फारच सुंदर नक्षीकाम केलेले आहे. लेणी क्रमांक १ ही चैत्य व विहार अशा संमिश्र स्वरुपाची वास्तू आहे. मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. द्वारकाशाखा विविध प्रकारचे कोरिवकाम करुन सजविल्या आहेत. मंडपातून आत गेल्यानंतर गौतम बुध्दाची मोठया आकाराची मूर्ती आहे. गर्भगृहातील ही मूर्ती जगातील सर्व मूर्तीपैकी सर्वश्रेष्ठ आहे. या मूर्तीचे वैशिष्टये असे की, आपण मूर्ती पाहण्याची जागा बदलली की मूर्तीचे हवभाव

सुध्दा बदलतात. (तपस्या, शांती, किंचित हास्यमय, प्रसन्न) या मूर्तीच्या दोन्ही बाजूला चवरी धारण केलेले काही (रक्षक) शिल्पे आहेत. लेणी क्र. १ मध्ये वज्रपाणी, हरीण, इत्यादी शिल्पे आहेत. शिल्प व चित्र या दोन्ही दृष्टीनी हे लेणे विशेष प्रेक्षणीय आहे. बुध्दाच्या जीवनातील प्रसंग, हत्तीच्या झुंजी इ. विविध प्रकारचे कलापूर्णशिल्पकाम येथे दिसते. इथले स्तंभ अतिशय देखणे आहेत.

**लेणी क्र. २**

अजिंठा येथील लेणी क्र. १ व लेणी क्र. २ मध्ये बरेचसे साम्य दिसते. लेणी क्र. २ ही विहार आहे. पहिल्या क्रमांकाच्या लेणीपेक्षा आकाराने थोडी लहान दिसते. लेणीच्या प्रवेशद्वारावरच सुंदर शिल्पकाम केलेले आहे. लेणीच्या गर्भगृहात गौतम बुध्दाची एक भव्य मूर्ती धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेत कोरली आहे. गर्भगृहात पंचिक आणि हारितीच्या मूर्ती आहेत. लेणीमध्ये शिक्षक, अभ्यासात मग्न असणारी मुले, खेळणारी मुले, मेंढी, यक्षमूर्ती आहेत. याच लेणीमध्ये जांभाल हारितीचे शिल्प आहे. वाकाटक काळात लेणी क्र. २ चे खोदकाम करण्यात आले. या लेणीतील शिल्पकाम सुंदर आहे. शिल्पकला व चित्रकला या दोन्ही दृष्टीने हे लेणे प्रेक्षणीय आहे.

**लेणी क्र. १६**

अजिंठा येथील १६,१७ व १९ या क्रमांकाची लेणी स्थापत्य व चित्रकला या दोन्ही दृष्टीनी भारतातल्या कुठल्याही लेण्यांपेक्षा उत्कृष्ट आहेत, असे बर्जेसने म्हटले आहे.[२५] यातले १६ वे लेणे वाकाटक नृपती हरिषेण (इ.स. ४७५ ते ५००) याच्या वराहदेव नावाच्या सचिवाने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपचयासाठी खोदविले आहे. हे लेणे अजिंठा येथील सुंदर विहारांपैकी एक आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस हत्ती कोरलेले आहेत. समोर नागराज आणि नागराणीचे शिल्प आहे. दालनाच्या बाहेरील डाव्या भिंतीवर वाकाटक सम्राट हरिषेण याचा मंत्री वराहदेव याने कोरलेला एक शिलालेख आहे. लेणीत १४ भिक्षूगृहे हे असून गर्भगृहात बुध्दाची प्रवचन करीत असलेली मूर्ती आहे. बुध्दांची भव्य मूर्ती सिंहासनावर अधिष्ठित असून, ती धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेत आहे. बुध्दांच्या मुखाभोवती तेजोवलय असून, त्यांच्या दोन्ही अंगी वज्रपाणी व पद्‌मपाणी चवऱ्या घेऊन उभे आहेत. ही लेणी आकाराच्या व स्थापत्याच्या दृष्टीने लेणी क्रमांक सतरा प्रमाणेच आहे.

**लेणी क्र. १७**

अजिंठा लेणी समुहातील क्र. १७ चे लेणे विहार आहे. या लेणीच्या समोरील डाव्या भिंतीवर मोठया आकाराचे संस्कृत शिलालेख आहे. वाकाटक नृपती हरिषेणाच्या मांडलिकाने रविसांब नावाच्या आपल्या लहान भावाच्या अकाली निधनाने संसाराची असारता पटल्यावर भिक्षुसंघाकरिता खोदवले असे कळते. १७ क्रमांकाचे विहार लेणे सामान्यत: १६ क्रमांकाच्या लेण्यासारखेच आहे. याचा व्हरांडा ६४ फुट लांब व १० फूट रुंद असून याच्या समोर सहा साधे अष्टकोनी स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. लेणीच्या बाहेर पाण्याचा हौद बनवला आहे. गर्भगृहात बुध्दाची व्याख्यान मुद्रेतील एक मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस चवरी धारण केलेल्या वज्रपाणी व पद्मपाणी आहेत. बुध्दाच्या मुखाभोवतील तेजोवलय असून दोन बाजूस आकाशांतून एक एक विद्याधर उपायन घेऊन येऊन ते बुध्दाला अर्पण करीत असलेला दाखविला आहे. या विहारात एकूण १६ खोल्या आहेत.

**लेणी क्र. १९**

क्रमांक १९ चे लेणे हे ही ऋषीक देशाच्या मांडलिकाने खोदवून बौध्द संघास अर्पण केले होते.[२६] हे लेणे महायान पंथीय चैत्यगृह आहे. या लेण्याला गंधकुटी या नावाने उल्लेखिलेले आहे. या गंधकुटीतील चैत्यात दोन खांबावरच्या कमानीत बुध्दांची उभी मुर्ती कोरलेली आहे. त्यांना पायापर्यंत लोंबणारा अंगरखा घातला असून त्यांची मुद्रां शांत आहे. बाजूच्या भिंतीवर बौध्दमुर्ती, यक्षमुर्ती कोरलेल्या आहेत. डाव्या हाताकडील भिंतीवर कोरलेले नागदंपतीचे शिल्प आहे. चैत्यमंदिरात स्तूपाजवळ भव्य बुध्दमूर्ती असून तिच्यावर मकर- तोरण दिसते. गंधकुटीच्या किंवा चैत्य लेण्याच्या आतील भाग २४ फूट रुंद, ४६ फूट लांब आणि २४ फूट, ४ इंच उंच आहे.

**हिंदु लेणी :**

वाकाटक सम्राटांनी ज्याप्रमाणे बौध्द लेणी स्थापत्याची निर्मिती केली ; त्याचप्रमाणे त्यांनी हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती केली. या काळात लातूर जिल्ह्यातील खरोसा आणि नांदेड जिल्ह्यातील शिऊर येथे हिंदू लेणी खोदविल्या शिऊर येथील लेणी वैष्णव व खरोसा लेणी शैव लेणी आहेत.

**खरोसा येथील लेणी :**

हे ठिकाण निलंगा ते लातूर रस्त्यावर असून या लेण्या निलंग्या पासून ३ कि.मी. अंतरावर आहेत. या लेण्यांच्या लगतच खारोसा हे लहानसे गाव वसलेले असल्यामुळे त्यांना खरोश्याच्या लेण्या असे संबोधले जाते. या लेण्या डोंगरात निर्माण केलेल्या आहेत. येथील खडक लालसर रंगाचा व वाळू मिश्रित आहे. त्यामुळे कलाकारांना आपल्या इच्छेप्रमाणे शिल्प साकारता आले नाही. येथे ऐकूण १३ लेण्या असून या लेण्या वाकाटक व राष्ट्रकुट काळातील आहेत असे इतिहासकारांचे मत आहेत.[२७]

या लेण्यांची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येते. पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या लेणीत एकही शिल्प नाही. तिसऱ्या क्रमांकाच्या लेणीत शिवलिंग कोरण्याची धडपड केलेली आहे. येथे सहा स्तंभ असून प्रदक्षिणा घालण्यासाठी  रस्ता तयार केलेला आहे. अपेक्षेप्रमाणे खडक उपलब्ध न झ ाल्यामुळे कलाकारांनी आपले काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे. चौथ्या क्रमांकाच्या लेणीत देखील शिवलिंग कोरण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे. पाचव्या व सहाव्या लेणीत काहीच नाही. सातव्या क्रमांकाच्या लेणीत नृसिंहाचे शिल्प अर्धवट व ओबड धोबड अवस्थेत कोरलेले आहे. आठव्या क्रमांकाची लेणी भव्य असून ते एक सभागृह आहे असे वाटते.कारण येथे कोणतेच शिल्प नाही . नवव्या क्रमांकाची लेणी दोन मजली असून तळमजला पूर्णपणे रिकामा आहे. दुसऱ्या मजल्यावर  एक प्रशस्त सभागृह असून त्याला चोवीस स्तंभ आहेत. सभामंडपात अंधार पडू नये म्हणून छताला एक छिद्र ठेवण्यात आलेले आहे. पावसाळ्यात पावसामुळे येणारे पाणी लेणीत साचू नये म्हणून त्या पाण्याची विल्हेवाट योग्य रीतीने लावलेली आहे. यावरुन कलाकार कल्पक व द्रष्टे होते हे स्पष्ट होते. या सभागृहाच्या बाजूला उपमंदीराच्या भिंतीवर काही शिल्पे कोरलेली आहेत.

दहाव्या क्रमांकाची लेणी हे खरोसा लेण्याचे भूषण आहे. या लेणीच्या प्रवेशद्वारावर शिवाची भव्य मूर्ती कोरलेली आहे. लेणीत प्रवेश केल्यानंतर तांडवनृत्य करणारा शिव दिसतो. त्यास 'नटेश्वर' म्हणतात. शिवपार्वतीचे आकर्षक व उत्थान शिल्प हे या लेणीचे वैशिष्ट्य आहे. तसेच समुद्रमंथनाचे दृश्य अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेले आहे. राम- रावण यांच्या युध्दाचे शिल्पांकन येथे आहे. युध्दभूमीवर अनेक रथ दर्शविलेले आहेत. लक्ष्मणाला बाण लागल्यानंतर हनुमानाने संजीवनी

वनस्पती आणण्यासाठी सर्व पर्वतच उचलून नेण्याचे शिल्प येथे खोदलेले आहे. या लेणीमध्ये विष्णूचे नऊ अवतार अप्रतिम स्वरुपात रेखाटलेले आहेत. त्यापैकी प्रामुख्याने नृसिंह, वराह, मत्स्य, बुध्द, राम हे अवतार विशेष मनमोहक आहेत. गजराज नम्र अवस्थेत दर्शविलेला आहे. एकंदरीत रामायणातील महत्वाचे प्रसंग, शिव महात्म्य, युध्दभूमी इत्यादी गोष्टीवर शिल्पे साकार झालेली आहेत. तत्कालीन कलाकारांच्या प्रतिमेची साक्ष लेण्यांद्वारे पटते.

क्रमांक अकराच्या लेणीत दोन मजले असून त्यापैकी तळमजला मोठया सभागृहासारखा आहे. येथे एकही शिल्प नाही. दुसरा मजला झोपडीसारखा आहे. त्यात चार शिल्पे आहेत. पण काळाच्या ओघात या कलाकृती अस्पष्ट झाल्या आहेत. बाराव्या लेणीला ‘बुध्द लेणी’ असे संबोधले जाते.पण त्यासंबंधी एकही पुरावा आज उपलब्ध नाही. तेराव्या क्रमांकाची लेणी नाममात्रच आहे. एकूण खरोसा लेण्या सुंदर असूनही त्यांचा विकास मात्र झालेला नाही. पण कलाकाराच्या कौशल्याच्या त्या - लेण्या साक्षीदार आहेत.

**धाराशिव - ऐतिहासिक व भौगोलिक माहिती**

उस्मानाबाद जिल्हा पुर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठवाडा समजला जाणाऱ्या मराठी भाषिक जिल्हयापैकी एक आहे. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर या जिल्हयाचा समावेश महाराष्ट्रात करण्यात आला. उस्मानाबादचे प्राचीन नाव ‘नागसेननगर ’ होते. पुढे नागसेननगर हे गाव मागे पडून ‘धाराशिव ’ असे नाव पडले. इ.स.पू. काळात राजा ‘करकंड ’ याने धाराशिव (धारापूर) नगराची स्थापना केली. धाराशिव नगरी ही तुळजापूरच्या उत्तरेस १२ मैलावर असून, लातूर हे ठिकाण धाराशिवापासून पूर्वेस ५० मैलांवर आहे. बार्शी हे ठिकाण धाराशिवच्या पश्चिमेस २६ मैल अंतरावर आहे. हे नगर उत्तर अक्षांश १७° ३५ ते १८° ४० व पूर्व रेखांश ७५° १६ ते ४६° ४० हया ठिकाणावर आहे. धाराशिव नगरीचा उल्लेख काही प्राचीन साहित्यात आढळून येतो. लेणी खोदकामास करकंड राजास तेरच्या शिवराजाने बरीच मदत केली. लेणी खोदकाम करीत असताना राजाचे वास्तव्य येथे जवळच असले पाहिजे. त्याने तेथे असलेल्या भोगावती नदीच्या किनाऱ्यावर वास्तव्य केले असल्याने तेथेच धाराशिव नगरी वसली असल्याची शक्यता आहे. लेणी- खोदकाम करीत असताना जिवंत पाण्याचा झरा आढळून आला. त्यामुळे शिवराजा आणि धारा (झरा)

यावरुन कदाचित धाराशिव असे नाव पडले असण्याची शक्यता आहे. मध्ययुगीन काळात धाराशिव नगरीचे महत्व वाढले. मुसलमान राजवटीत धाराशिव नगरीच्या परिसरात अनेक घडामोडी घडून आल्या. १८ व्या शतकात या प्रदेशावर निजामाचे वर्चस्व होते. इ.स. १९११ साली तत्कालीन निजाम मीर उस्मान आली तख्तनशील होते.[२८]

**धाराशिव लेणी**

उस्मानाबाद नगराच्या पश्चिमेस हातला देवीच्या डोंगराजवळ असलेल्या एका डोंगरामध्ये एकूण ९ लेण्या आहेत. त्यापैकी सहा बौध्द , दोन जैन आणि एक -हिंदू लेणी आहे.[२९] धाराशिव येथे सध्या सहा लेण्या दिसतात. त्यापैकी चार एका बाजूस व दोन त्याच्या विरुध्द बाजूस टेकडीत खोदली आहेत.[३०]

**धाराशिव लेण्यांच्या कालखंड**

धाराशिव लेण्यांच्या संख्येबाबत जशी मतभिन्नता आहे, त्याप्रमाणेच त्यांच्या कालखंडाबाबतही इतिहासकारात मतभिन्नता आहे. उस्मानाबाद शहरापासून अवघ्या ४ कि.मी. अंतरावर एक प्राचीन लेणी आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन ही लेणी ७ व्या शतकातील असावीत. तर काही लेणीचे खोदकाम इ.स. ५ व्या किंवा ६ व्या शतकात वाकाटक राजवंशाच्या कालखंडात झाले असावे. तेर हे धाराशिवच्या ईशान्येस बारा मैलावर आहे. त्याच्याजवळच्या या लेण्यांचा इतिहास आणि वर्णन जैन ग्रंथात आले आहे. सन १९२४ मध्ये डॉ.हीरालाल जैन यांना विदर्भातील कारंजा गावच्या जैन ग्रंथ भांडारात कनकामर कवीच्या 'करकंडचरिऊ' (कर्कंडचरित) या अपभ्रंश भाषेतील ग्रंथाची एक प्रत आढळली .नंतर त्यांनी तो ग्रंथ कारंजा -जैन- ग्रंथमालेत प्रसिध्द केला. या ग्रंथात कर्कंड राजाची पुढील कथा आली आहे. कर्कंड हा उत्तर भारतातील अंग देशाचा राजा होता. त्यांची राजधानी चंपा (सध्याचे भागलपूर) येथे होती. त्याचे राज्य भारतभर पसरले होते. पण दक्षिणचे चोल, चेर आणि पांडय देशांचे राजे मात्र त्याचे स्वामित्व मान्य करीत नव्हते. तेव्हा त्यांना जिंकण्या करिता मोठे सैन्य घेऊन तो त्यांच्या देशावर स्वारी करण्यास निघाला. वाटेत त्याचा मुक्काम तेरापूर येथे पडला. तेथील शिवनामक राजाने त्याला जवळच्या पर्वतावरील लेण्यासंबंधी माहिती दिली तेव्हा तो ती लेणी पाहण्यास गेला. त्यात त्याला पार्श्वनाथाची मुर्ती दिसली. तसेच त्या टेकडीवरील

वारुळात दबलेली आणखी एक पार्श्वनाथची मूर्ती त्याला आढळली. तीही त्याने आणून त्या लेण्यात बसविली. नंतर त्या लेण्यातील पार्श्वनाथ जिनाच्या सिंहासनावर त्याला एक ग्रंथि आढळली. ती तेथे योग्य दिसत नाही, असे वाटून त्याने एका शिल्पीला बोलावून ती ग्रंथि तोडून टाकण्यास सांगितले. तेव्हा तो शिल्पी म्हणाला, 'महाराज, या ग्रंथीच्या आत पाण्याचा मोठा झरा आहे. ती तोडून टाकल्यास पाण्याचा मोठा प्रवाह धो धो वाहत येऊन या लेण्याला धोका पोचेल.' पण राजाने त्याचे न एकेता ती ग्रंथि तोडून टाकण्याची त्याला पुन: आज्ञा केली. पण तसे करताच पाण्याचा ओघ जोराने बाहेर पाडून त्यांनी ते लेणे खराब झाले. त्यामुळे राजाला फार वाईट वाटले. पण तितक्यात एका नागकुमाराने आकाशातून तेथे येऊन त्यांचे सांत्वन केले. हे लेणे कोणी कोरविले असे राजाने विचारले तेव्हा त्याने त्याला पुढील माहिती दिली, दक्षिण वेद्यर्धा मध्ये (म्हणजे कैलासच्या दक्षिण दिशेस) नील व महानील असे दोन विद्याधर भाऊ राज्य करीत होते. शत्रूंनी त्यांचा पाडाव केल्यामुळे ते दक्षिणेत तेरापूर येथे पळून आले आणि तेथे त्यांनी आपले राज्य स्थापिले. तेथे त्यांना एका मुनीने जैन धर्माची दिक्षा दिली. नंतर त्यांनी हे लेणे कोरुन त्यात पार्श्वनाथाची मूर्ति स्थापिली. टेकडीवरील वारुळातील मूर्तीविषयी कर्कण्डाला असे समजले की, दुसऱ्या दोन विद्याधरांनी ती केरळ प्रदेशातील पूदी टेकडीवरुन आणली होती व ती तेथेच सोडून ते निघून गेले होते.

नंतर कर्कण्डाने स्वत: त्या पर्वतात आणखी दोन लेणी कोरविली. पुढे त्यांनी सिंहलद्विपावर स्वारी केली आणि परत येताना चोल, चेर आणि पांडय या देशांना जिंकून तो स्वदेशी चालता झाला. उस्मानाबादच्या या लेण्यांना जैन लेणी, चांभार लेणी, ब्राम्हण लेणी अथवा धाराशिव लेणी असे म्हटले जाते.[३१] या लेण्यांच्या मदतीने तेर संबंधी माहिती मिळते. धाराशिव लेण्यांचे खोदकाम चालू असताना येथून जवळच असलेल्या भोगावती नदीच्या किनाऱ्यावर धाराशिव नगराची उभारणी झाली.

**लेणी क्रमांक. २**

येथे असलेली क्रमांक २ ही बौध्द लेणी असून या लेणीचे खोदकाम इ.स. च्या पाचव्या शतकात वाकाटक राजवंशाच्या कालखंडात झाले आहे. ही लेणी येथील प्राचीन लेणी आहे. ही लेणी धाराशिव येथील लेणी समूहातील सर्वात प्रेक्षणीय व सुंदर आहे. लेणी क्र. १ पासून ही लेणी

२० फुट अंतरावर असून ती या परिसरात सर्व प्रथम खोदलेली आहे. ही लेणी शिल्प व वास्तुशिल्पाच्या दृष्टीने अंजिठा येथे वाकाटक कालखंडात खोदण्यात आलेल्या क्र. १६ व १७ लेणी समान आहे.[३२] दुसऱ्या लेणीच्या आत सुमारे ८० फुट बाय १० फुट व्हरांडा असून त्याचे छत ३२ खांबांनी पेलून धरले आहे. आतील बाजूस पार्श्वनाथाची भव्य मूर्ती आहे.येथील मूर्ती आजही सुस्थितीत आहेत. प्रवेशद्धाराजवळ पाण्याचे कुंड असून त्यात बारमाही स्वच्छ व गारपाणी असते.

हॉलच्या दोन्ही बाजूच्या व मागच्या भिंती मुनीकरिता २२ खोल्या आहेत. पाठीमागच्या गर्भगृहात सिंहासनावर पार्श्वनाथाची मूर्ती ध्यानमुद्रेत कोरली असून त्याच्या डोक्यावर ७ फणांचा नाग आहे. प्रत्येक फणेवर लहानसा किरीट आहे. सिंहासनाच्या पुढील भागावर सध्या भग्न झालेले, कडेवर उभे असलेले चक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस दोन दोन हरिण कोरले आहेत. सिंहासनाच्या दोन्ही बाजूस एक एक शार्दुल, चामरधारी सेवक व मालाधारी विद्याधर दिसतात.[३३]

**लेणी क्र. ३**

या लयनसमूहातील आणखी एक उल्लेखनीय लेणी म्हणजे क्रमांक ३ . सहा सपाट अष्टकोनी स्तंभावर पेललेला व्हरांडा, व्हरांडयाच्या मागील भिंतीत असलेल्या मंडपात जाण्यासाठी असलेली पाचद्धारे, त्यामागे २६ स्तंभ असलेला मंडप व मंडपाच्या तीन भिंतीत मागील भिंतीतील गर्भगृह वगळता एकूण १२ छोटया खोल्या किंवा कक्ष असा या लेण्यांचा तलविन्यास आहे. मंडपातील स्तंभाची मांडणी चौरस आकार असून या चौरसाच्या प्रत्येक बाजूत एकूण ६ स्तंभ आहेत. या लेणीची लांबी व रुंदी ५९ फूट व उंची ११ फूट ३ इंच आहे. या लेणीस तीन दरवाजे आहेत. या लेणीत २० स्तंभावर आधारलेला नवरंग मंडप आहे. व्हरांडयाच्या शीर्ष पट्टीवर चैत्यगवाक्ष कोरले आहे. छतावर चित्रकाम केलेले आढळते. गर्भगृहात पार्श्वनाथाची पद्मासनास्थ भव्य मूर्ती आहे. मूर्तीच्या सभोवती यक्ष, यक्षिणी, अप्सरा व रक्षकाच्या मूर्ती आहेत. वरील दोन्ही लेणी वैशिष्टयपूर्ण आहेत. या दोन्ही लेण्यामध्ये सिंहासनस्थ पार्श्वनाथाच्या मूर्ती असून त्याच्या दुतर्फा प्रतीहार आहेत. अजिंठा येथील भद्रासन - सिंहासनाप्रमाणेच याही सिंहासनावर धर्मचक्र आणि काळवीट ही प्रयोजने आहेत. सिंहासनाच्या दुतर्फा किंचित मागच्या बाजूस चौरीधारक आणि आकाशात विहारणाऱ्या ठेंगू यक्ष मूर्ती दाखविल्या आहेत. या मूर्तीभोवती अर्ध उठावात ढगांसारख्या

आकृती दाखवल्या आहेत. फरक इतकाच की, या लेण्यास तीर्थकाराच्या डोक्यावर नागाचा फणा दाखविला आहे.

**धाराशिव लेणी जैन की बौध्द :**

धाराशिवच्या ईशान्येस पश्चिमाभिमुख्र टेकडीत कोरलेली काही लेणी पुरातत्वज्ञांस परिचित आहेत. बर्जेसने त्याचे वर्णन आपल्या Archaeological survey of western India, Vol-III आणि Caves Temples of India. नामक ग्रंथात केली आहे. त्याच्या मते ती जैन धर्माची लेणी आहे. धाराशिवची लेणी ‘करकंडचरिऊ’ या अपभ्रंश आणि ‘बृहत्कथाकोष’ या संस्कृत ग्रंथात जैन धर्माची म्हणून वर्णिली आहेत. तसेच डॉ. सुतार अमर व प्रा. रोडे सोमनाथ यांनी ही धाराशिव लेणी हया जैन आहेत असे मत मांडले.[३४] डॉ. मिराशी वा.वि. यांनी ‘धाराशिव लेणी बौध्द की जैन? ’ हा लेख प्रसिध्द केला व त्यामध्ये त्यांनी हया लेणी जैन धर्मीय असल्याचे मत प्रतिपादन केले.[३५] अलीकडे डॉ. ढवळीकर म.के. यांनी ती बौध्द धर्माची आहेत असे विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक सन १९६२ आणि सन १९६८ मधील लेखांत सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. या लेण्याच्या वैशिष्टयपूर्ण स्थापत्यावरुन त्या मुळच्या बौध्द असाव्यात पण सातव्या शतकात त्या जैन धर्मीयांनी आत्मसात केल्या असाव्यात असे म्हटले जाते.

**शिऊर लेणी :**

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात शिऊर नावाचे एक खेडेगाव आहे. या गावची लोकसंख्या ७२७ आहे. हे गाव मराठवाडा - विदर्भाच्या सरहद्दीवर असून पैनगंगा नदीच्या अगदी दक्षिण काठावर वसलेले आहे. पैनगंगा नदी ही मराठवाडा विदर्भाची सरहद्द आहे. पैनगंगेच्या दक्षिण बाजूस मराठवाडा आणि उत्तर बाजूस विदर्भ आहे. शिऊर हे गाव हदगाव पासून ४० कि.मी. अंतरावर आहे. येथे जाण्यासाठी नांदेडहून दोन मार्ग आहेत. नांदेडहून निघाल्यानंतर मानवाडी फाट्यावरुन निवघा ( बाजार ), कोळी, तळणी, आमगव्हाण मार्गे शिऊरला जाता येते. या मार्गाने नांदेडपासून शिऊर ९९ कि.मी. आहे. दुसरा मार्ग नांदेड- अर्धापूर, वारंगा फाटा, आखाडा बाळापूर - माळेगाव फाटा, शिऊर असा आहे. माळेगाव फाट्याहून शिऊर १६ कि.मी. अंतरावर आहे. या मार्गाने नांदेड पासून शिऊर ७६ कि.मी. आहे.

शिऊर या गावाच्या नैऋत्येला २०७ मीटर अंतरावर एक अगदी लहान माळटेकडी आहे. या माळटेकडीला सपाट डोंगर म्हणता येईल. या सपाट डोंगरात तीन लेण्यांचे खोदकाम करण्यात आलेले आहे. या लेण्या सपाट डोंगर अर्थात माळटेकडीत खोदलेल्या असल्यामुळे जवळ जाईपर्यंत येथील लेण्या दृष्टीस पडत नाहीत. सपाट डोंगरात कोरलेल्या लेण्या अंबाजोगाई येथे आढळतात. शिऊर येथील लेणी पूर्वाभिमुख असून त्या दक्षिण - उत्तर ९२ फूट अंतरात खोदलेल्या आहेत. येथील तिनही लेणींचे विधान गर्भगृह व सभामंडप असे आहे. येथील खडक ठिसूळ असल्यामुळे लेणींचे खोदकाम अर्धवट झालेले आढळते. तसेच लेणीतील स्तंभ, छत व भिंतीचे काम सुबक झालेले नाही. येथील लेणीतील स्तंभ आणि भिंतीवर सुंदर शिल्पकाम केलेले आहे ; परंतु खडक ठिसूळ असल्यामुळे येथील बहुतेक शिल्पे भंगलेल्या व झिजलेल्या स्थितीत आढळतात. शिल्पकलेच्या दृष्टीने येथील लेणी विशेष उल्लेखनीय ठरतात. या लेणी लेणीस्थापत्याच्या विकासाचा प्राथमिक टप्पा दर्शवितात. भारतीय लेणी स्थापत्याच्या विकासात या लेण्यांना महत्वाचे स्थान आहे. शिऊर या गावाच्या नैऋत्याला असलेल्या एका डोंगरात तीन लेण्यांचा समूह कोरलेला आहे. या लेण्या डोंगराच्या पूर्वेला ९२ फूटात कोरलेल्या आहेत. स्थापत्यशास्त्रीय दृष्ट्या पाहिल्यास येथील तिनही लेण्यांचे रेखाटन सारखेच दिसते. या ठिकाणी लेण्यांच्या खोदकामासाठी आवश्यक असलेला आणि योग्य प्रकारचा खडक नसल्यामुळे लेण्यांचे खोदकाम व त्यामधील शिल्पकाम अर्धवट स्थितीत सोडून कलाकारांना दुसरीकडे निघून जावे लागले. पूर्णावस्थेत नसलेल्या या लेण्या इ.स. १९७२ पर्यंत अज्ञात होत्या. याचवर्षी डॉ. प्रभाकर देव आणि डॉ. जी.सी. शेळके यांनी या लेण्यांचे प्रथम सर्वेक्षण केले आणि या लेण्यांवर प्रकाश टाकला.[३६] शेवटी महाराष्ट्र शासनाने इ.स. १९८५ मध्ये या लेण्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिली.

शिऊर येथील लेणी वाकाटक काळातील आहेत. वाकाटकांच्या दोन शाखा होत्या. पहिल्या शाखेची राजधानी नंदीवर्धन होती तर दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म होती. वत्सगुल्म म्हणजे आधुनिक वाशिम होय. इ.स. ३३० ते इ.स. ५५० हा वत्सगुल्मच्या वाकाटक घराण्याचा कालखंड आहे. परभणी, औरंगाबाद, नांदेड व बीड जिल्ह्याच्या भागावर वाकाटकांची सत्ता होती. वाकाटक काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते. द्वितीय विंध्यशक्तीच्या ( इ.स. ३५५-

४००) वाशिम ताम्रपटावरुन समजते की, वाकाटककालीन नांदेडचे नाव नांदीकड व नांदीतट होते. याच काळात नांदेडप्रमाणेच कंधार हेही बौध्द कला व स्थापत्याचे प्रसिध्द केंद्र होते. या काळातील एक विहार आणि बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची प्रतिमा अनुक्रमे कंधार व बहाद्दरपूरा येथे आढळते. वाकाटक काळात नांदेड जिल्हा कला व स्थापत्य क्षेत्रात प्रगतीवर होता. याच काळात शिऊरजवळील डोंगरात लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. लेणीस्थापत्य विकासाचा पहिला अर्थात प्राथमिक टप्पा म्हणून या लेण्यांकडे पाहिले जाते. डॉ. देव प्रभाकर आणि डॉ. जी.सी. शेळके यांनीही या लेण्यांचे खोदकाम सम्राट विंध्यशक्ती दुसरा यांच्या काळात झाले असावे असे मत मांडले.[३७] भारतात बौध्द, हिंदू आणि जैन धर्माच्या लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. वाकाटक सम्राट वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी अजिंठा या ठिकाणी बौध्द धर्माच्या लेण्यांचे खोदकाम केले.वाकाटकांच्याच काळात शिऊर येथे खोदलेल्या लेणी वैष्णव लेणी आहेत.[३८] येथील डोंगराच्या पूर्वेस ९२ फुटात कोरलेल्या लेण्यांमध्ये कोरण्यात आलेली सर्व शिल्पे वैष्णव पंथाची आहेत. त्यावरुन या लेणी वैष्णव पंथाच्या ठरतात. येथील लेण्यांमध्ये ब्रह्मा, विष्णू, त्रिविक्रम, नृसिंह, वराह, राम, वासुदेव पद्मनाथ, सप्तमातृका, कृष्ण, गरुड, महिषासुरमर्दिनी, केशव, हत्ती व किर्तीमुख इत्यादी शिल्पे आढळतात.

### लेणी क्रमांक १ :

लेणी क्रमांक १ ही पूर्व - पश्चिम २३ फूट ६ इंच लांब आणि दक्षिण - उत्तर २० फूट रुंद आहे. लेणींच्या छताची उंची ६ फूट ९ इंच आहे. गर्भगृह आणि सभामंडप असे या लेणीचे विधान आहे. या लेणीचे खोदकाम सर्वप्रथम करण्यात आले. या लेणीचा दर्शनी भाग पूर्णपणे नष्ट झाला आहे. या लेणीत चौकोनी आकाराचे १६ स्तंभ होते. त्यापैकी आज १२ स्तंभ शिल्लक असून दर्शनी भागातील ४ स्तंभ नष्ट झाले आहेत. लेणीच्या भिंती, छत आणि स्तंभाचे काम योग्य खडक नसल्यामुळे ओबड - धोबड स्वरुपाचे आढळते, स्तंभ सरळसोट उभे आहेत. त्यांना स्तंभशीर्षाचा आकार दिलेला नाही. हे स्तंभ दक्षिण - उत्तर ३ फूट ४ इंच आणि पूर्व - पश्चिम ३ फूट ६ इंच आकाराचे आहेत. या स्तंभाची उंची ६ फूट ९ इंच आह. लेणीतील स्तंभावर विविध मूर्तिशिल्प कोरलेले आढळते ; परंतु या मूर्तिशिल्पाची मोठी झीज झाली आहे. या लेणीत समोरच्या भिंतीतून

एक मोठा शिलाखंड पुढे आलेला आहे. त्यातून गर्भगृह कोरलेले आढळते. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ कोरलेला नाही. लेणीचे खोदकाम अर्धवट स्वरुपात आढळते. लेणीचे खोदकाम सर्वप्रथम करण्यात आले असून लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. या लेणीतील दक्षिणेकडून पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर वासुदेवाचे शिल्प आहे. वासुदेव चतुर्भुज आहे. ही मूर्ती स्थानक असून तिची उंची १५० सें.मी. आणि जाडी ६० सेंमी. आहे. विष्णुच्या वरच्या हातात शंख व चक्र आहे, तर खालच्या हातात गदा व पद्म आहे. तिसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावरही अशाच प्रकारची विष्णुमूर्ती आढळते.

## लेणी क्रमांक २ :

लेणी क्रमांक १ ला लागूनच डाव्या बाजूस लेणी क्रमांक २ आहे. लेणी क्रमांक १ प्रमाणेच गर्भगृह आणि सभामंडप असे या लेणीचे विधान आहे. तसेच याही लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. लेणी क्रमांक १ आणि ३ च्या तुलनेत अधिक खोलवर खोदलेली आहे. या लेणीचा आकार लेणी क्रमांक १ च्या आकारापेक्षा मोठा आहे. ही लेणी पूर्व - पश्चिम २८ फूट ६ इंच लांब, दक्षिण - उत्तर १९ फूट ६ इंच रुंद असून तिच्या छताची उंची ८ फूट ६ इंच आहे. लेणीत मागील भिंतीलगत गर्भगृह आहे. या गर्भगृहाची पूर्व - पश्चिम रुंदी ६ फूट असून दक्षिण - उत्तर लांबी ७ फूट आहे.

गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ कोरलेलाआहे. परंतु मागील भिंतीत थोडासा प्रस्तर खोदण्याचे काम राहिलेले आहे. या लेणीत ८ स्तंभ आहेत. प्रत्येक ओळीत ४ या प्रमाणे स्तंभाच्या २ ओळी आहेत. त्यापैकी पहिल्या ओळीतील पहिला स्तंभ नष्ट झाला आहे. या स्तंभाचा आकार चौकोनी असून त्यास स्तंभशीर्षाचा आकार दिलेला नाही. स्तंभ सुबक आणि शिल्पांकीत आहेत ; परंतु स्तंभांना पूर्णपणे आकार दिलेला नाही. लेणी क्रमांक १ मधील स्तंभाच्या आकारासमानच याही लेणीतील स्तंभाचा आकार आहे. स्तंभावर केशव, नृसिंह, विष्णू, वराह, गरुड, सप्तमातृका व कृष्ण इत्यादी शिल्पे कोरलेली आढळतात. मध्यभागातील दुसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर केशवाची अत्यंत सुंदर मूर्ती कोरलेली आहे, तर खालच्या उजव्या हातात गदा आणि डाव्या हातात पद्म आहे. येथील एका स्तंभावर नृसिंहाचे शिल्प आहे. हे शिल्प भंगलेल्या स्थितीत आहे. लेणीच्या भिंतीवर मात्र शिल्पकाम करण्यात आलेले नाही.

## लेणी क्रमांक ३ :

लेणी क्रमांक ३ ही लेणी क्रमांक २ लगत डाव्या बाजूस आहे. ही लेणी येथील लेणी समुहातील सर्वात मोठी असून स्थापत्यशास्त्रीय व शिल्पकलेच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या लेणीचे विधान गर्भगृह आणि सभामंडप असे आहे. या लेणीची अर्थात सभामंडपाची पूर्व - पश्चिम लांबी ५० फूट दक्षिण - उत्तर रुंदी ३२ फूट आणि छताची उंची ५ फूट ९ इंच आहे. आज या लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाल्यामुळे तिची पूर्व - पश्चिम लांबी ४० फूट, दक्षिण - उत्तर रुंदी ३२ फूट आणि छताची उंची ५ फूट ९ इंच आढळते. लेणीच्या मागील भिंतीत मध्यभागात गर्भगृह कोरलेले आहे. त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६ फूट ६ इंच, दक्षिण - उत्तर रुंदी ५ फूट ९ इंच आणि छताची उंची ४ फूट ९ इंच आहे. गर्भगृहात मध्यभागी खडकातच शिवपिंड कोरलेली आहे. ही शिवपिंड उत्तराभिमुख आहे. गर्भगृहाचे खोदकाम पूर्ण झालेले आहे ; परंतु या गर्भगृहाला प्रदक्षिणापथ कोरलेला नाही. तसेच येथील गर्भगृहाला स्वतंत्र प्रवेशद्वारही कोरलेले नाही. केवळ दोन बाजूस दोन भिंती खोदून गर्भगृह तयार केलेले आहे.

या लेणीत २० स्तंभ होते. प्रत्येक ओळीत ५ याप्रमाणे स्तंभाच्या ४ ओळी आहेत. २० स्तंभापैकी दर्शनी भागातील मध्यभागातील एक व दक्षिण बाजूकडील एक असे दोन स्तंभ नष्ट झालेले आहेत. या दर्शनी भागातीलच दोन स्तंभ झिजलेल्या व भग्नस्थितीत आढळतात. १६ स्तंभ मात्र चांगल्या स्थितीत आहेत. स्तंभ व स्तंभशीर्षाचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. स्तंभ चौकोनी आकाराचे आहेत. त्यांची दक्षिण - उत्तर लांबी ३ फूट ११ इंच, पूर्व - पश्चिम रुंदी ३ फूट ६ इंच आणि उंची ५ फूट ९ इंच आहे. प्रत्येक स्तंभावर चारही बाजूने शिल्पकाम केलेले आहे. लेणीचे छत व भिंत गुळगुळीत करण्याचा प्रयत्न केला आहे. भिंतीवर अर्धवट कोरलेले गरुड, हत्ती व किर्तीमुख आहेत. लेणीत एका स्तंभावर रामाची स्थानक मूर्ती असून रामाच्या हातात धनुष्यबाण आहे. याच लेणीत लिंगोद्भव शिवमूर्ती आणि शेषशायी विष्णुची मूर्ती आहे. एका

स्तंभावर येथे एक शिवलिंग दाखविले असून त्याच्या डाव्या बाजूस ब्रह्मा नमस्कार मुद्रेत आणि उजव्या बाजूस विष्णू असून त्यांचा डावा हात शिवलिंगावर आहे. हीच लिंगोद्भव शिवमूर्ती होय. ब्रह्मा व विष्णू आसनस्थ आहेत. येथील शेषशायी विष्णु मूर्तीच्या चारही हातात शंख, चक्र, गदा व पद्म आहे. येथे एका स्तंभशीर्षावर गरुड आहे, तर एका स्तंभावर स्थानक सप्तमातृका दाखविल्या आहेत.

## वास्तुमंदिरे :

वाकाटक काळात ज्याप्रमाणे गुहामंदिरे म्हणजेच लेणी स्थापत्याची निर्मिती केली गेली. त्याचप्रमाणे याकाळात वास्तूमंदिरेही निर्माण करण्यात आली. वास्तुमंदिरास रचनात्मक मंदिरे असेही म्हणतात. दगड आणि विटा एकावर एक रचुन वास्तूमंदिरे बांधण्यात येतात. वास्तू मंदिराच्या बांधकामासाठी दगड, माती, विटा व चुना उपयोगात आणला जातो. वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौध्द वास्तुमंदिरे निर्माण करण्यात आली. परंतु या काळातील एकही वास्तुमंदिरे आज अस्तित्वात नाही. वाकाटक घराण्याने इ.स. २५० पासून इ.स. ५१० पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले.[३९] वाकाटकांच्या दोन शाखा होत्या. वत्सगुल्म ( वाशिम ) शाखा ही वाकाटकांची कनिष्ठ शाखा होती.[४०] या शाखेने इ.स. ३३० पासून इ.स. ५१० पर्यंत राज्य केले. वत्सगुल्म वाकाटक शाखेच्या काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते.[४१] वाकाटक काळात नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कला व स्थापत्याची निर्मिती झाली. परंतु त्यांचे पुरातत्वीय अवशेष कंधार नगर वगळता आढळत नाहीत. कंधार हे वाकाटक काळातील कला, स्थापत्याचे प्रमुख आणि प्रसिध्द ठिकाण होते. याठिकाणी या काळातील बरेच शिल्पावशेष आढळतात. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा हेही वाकाटक काळातील कलेचे प्रमुख केंद्र होते.[४२] कंधार येथील शिल्पकला व वास्तूकला अजिंठा कलापरंपरेतील आहे. कंधार शहरात दर्गापुरा भागात वाकाटक काळातील बौध्द विहार होते.[४३] त्यांचे अवशेष या ठिकाणी मिळाले आहेत. हे बौध्द विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा ( इ.स. ३५५-४०० ) याच्या कारकिर्दीतील असावे. दर्गापुरा भागात सईदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर मकदूम सैया व अवलियांचा दर्गा आहे. हा दर्गा बडी दर्गा म्हणून ओळखला जातो. या दर्गाच्या वास्तुशेजारी एक प्राचीन वास्तू असून ती पाषाणात बांधलेली आहे. या वास्तुची

बांधकाम शैली बौध्द कलापरंपरेतील आहे. पुढे सभामंडप आणि पाठीमागे गर्भगृह अशी, या वास्तुची रचना आहे. या गर्भगृहात गौतम बुध्दांची मोठी प्रतिमा असावी. गर्भगृह आणि सभामंडपाला आधार दिलेल्या दगडी स्तंभावर ज्या प्रतिमा आहेत, त्या प्रतिमा बौध्द परंपरेतील आहेत. अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागाची प्रतिकृती प्रतिमेच्या रुपाने येथील स्तंभावर कोरलेली आढळते. अजिंठायेथील सर्वच लेणी बौध्दधर्मीय आहेत. यावरुन कंधार येथील ही वास्तू सुध्दा प्राचीन बौध्द विहार होते, असा निष्कर्ष निघतो. या वास्तुमधील स्तंभांवर नागाचीही शिल्पे कोरलेली आढळतात. गौतम बुध्दांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दांची उत्तम प्रतीके समजली गेली. बुध्द व नाग यांचा संबंध जवळचा आहे.

गया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुध्द जवळच्या तळ्यातील मूचलिंद नागाकडे गेले. त्यावेळी पाऊस पडू लागला म्हणून मूचलिंदाने आपला फणा त्यांच्या डोक्यावर उभारुन त्यांचे ( गौतम बुध्दांचे ) पावसापासून रक्षण केले.[४४] त्यामुळे बौध्द वास्तुमध्ये नागांच्या प्रतिमा आढळतात. त्यावरुन ही वास्तू बौध्द विहार, हे स्पष्ट होते. ही वास्तू पूर्णपणे दगडांनी बांधलेली आहे. पुढे बौध्दधर्माचा प्रभाव कमी झाला आणि हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. त्याचवेळी या बौध्द विहाराला हिंदू मंदिर बनविले. हेच हिंदू मंदिर म्हणजे कालप्रिय ( शिवमंदिर ) मंदिर होय. याच मंदिरात हाजी सरवर मकदूम सैया यांचे वास्तव्य होते. येथेच त्यांचा मृत्यू झाला. याच ठिकाणी त्यांचा दर्गा बांधण्यात आला. त्यामुळे बौध्द मंदिर अर्थात विहाराचे अस्तित्व संपुष्टात आले.

कंधार तालुक्यात बाळांतवाडी नावाचे गाव आहे. हे गाव कंधारच्या पश्चिमेस कंधार - घोडज रस्त्यावर असून ते कंधारपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. हे गाव अगदी लहान असले तरी या ठिकाणी बरेच प्राचीन शिल्पावशेष आढळतात. या गावालगत उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. आज या ठिकाणी देवीची एक प्रतिमा आहे. ही प्रतिमा भवानी देवी म्हणून ओळखली जाते. येथील भग्नावशेषांचे सर्वेक्षण केले असता या ठिकाणी प्राचीन बौध्द विहार होते, हे स्पष्ट होते. याठिकाणी ५ फूट उंचीचे दोन स्तंभ असून हे दोन्ही स्तंभ आणि दर्गापूरा भागातील विहाराचे स्तंभ यांच्यात साम्य असून या दोन्ही स्तंभांवर अजिंठा लेणी क्र.९ च्या दर्शनी भागाच्या

प्रतिमा आढळतात. यावरुन निष्कर्ष निघतो की, हे दोन्ही विहार वाकाटक सम्राट विंध्यसेन दुसरा याच्या कारकिर्दीतील असावेत.

गौतम गुध्दाच्या प्रतिमा निर्माण होण्यापूर्वी बुध्दाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक प्रतीकांचा शोध घेण्यात आला. अशा परिस्थितीत बुध्दाच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दाची उत्तम प्रतीके समजली गेली.[४५] मग या प्रतीकांच्या रुपानेच बुध्दाची उपासना सुरु झाली. बुध्दांच्या अनेक प्रतीकांपैकी हत्ती हा एक उत्तम प्रतीक समजला गेला.[४६] महामायादेवीच्या गर्भात ज्यावेळी तथागताने ( बुध्द ) प्रवेश केला, त्यावेळी तिला स्वप्नात पांढरा हत्ती दिसला होता. त्यामुळे हा हत्ती बुध्द जन्माचे प्रतीक झाला. या ठिकाणी हत्तीच्या चार प्रतिमा पाहावयास मिळाल्या. याशिवाय येथे बुध्दाची एक खंडित प्रतिमाही आढळली. यावरुन स्पष्ट आहे की, येथे प्राचीन बौध्द विहार होते. बुध्द टेकडीवरील विहारापासून हा विहार केवळ अर्धा फर्लांगवर आहे. येथील भग्नावशेषातील हिंदू धर्मीय मूर्तिशिल्पही आढळले. येथे ६० सें.मी. उंचीची व चतुर्भूज असलेली ध्यान मुद्रेतील देवीची प्रतिमा आहे. दोन हात अभय मुद्रेत आहेत तसेच दोन हात सरळ दोन्ही गुडघ्यांवर ठेवलेले आढळतात. या प्रतिमेचे मस्तक खंडित झाले आहे. या प्रतिमेशिवाय येथे आणखी एक स्त्री प्रतिमा आहे या प्रतिमेचीही उंची ६० सें.मी. आहे. याचठिकाणी एका मोठ्या शिळेवर त्रिशूल कोरलेले आहे. आज जरी हे हिंदूधर्मीय मंदिर वाटत असले तरी हे मंदिर मूळ बौध्द विहार होते.[४७] हिंदू धर्माचा प्रभाव वाढल्यानंतर व बौध्द धर्माचा प्रभाव नाहीसा झाल्यावर या बौध्द विहाराचे रुपांतर हिंदू मंदिरात करण्यात आले.इतर बौध्द विहारांच्या ठिकाणी जी बौध्दशिल्पे पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे बौध्दशिल्पे येथेही पाहावयास मिळतात. हीच बौध्दशिल्पे येथे बौध्द विहार असल्याचा प्रत्यक्ष पुरातत्वीय पुरावा आहे.

कंधार शहराच्या दक्षिणेस एक माळटेकडी आहे. ही टेकडी कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस असून ती कंधारपासून २ कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी डोंगर उतरणीस राष्ट्रकूट काळातील बौध्द विहार होते.[४८] यामुळे ही टेकडी बुध्द टेकडी या नावाने ओळखली जाते. आज मात्र या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे.त्यामुळे या ठिकाणी मुस्लिम भूत असल्याचे सांगितले जाते. म्हणूनच आज ही बुध्दटेकडी भुताची टेकडी या नावाने ओळखण्यात येते. भुताची ही बुध्दाची या

शब्दाचा अपभ्रंश आहे. येथे बौध्द विहार होते. या विहारातील बुध्दमूर्ती १२२ सें.मी. उंचीची होती. हे बौध्द विहार पूर्वाभिमुख असून त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६२ फूट आणि दक्षिण - उत्तर रुंदी ५१ फूट होती. आज या ठिकाणी बौध्द विहाराचे केवळ पुरातत्वीय अवशेष आढळतात. या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे. या तुरबतचे कच्चे बांधकाम केलेले आहे. या बांधकामासाठी बौध्द विहाराच्या बांधकामासाठी उपयोग आणलेल्या दगडी शिळांचा वापर केलेला आहे. येथे बरेच बौध्द शिल्पावशेष आढळतात. परंतु ते सर्व खंडीत स्वरुपात आहेत. येथील विहाराच्या छताला आधार दिलेल्या दगडी खांबाचा खंडीत भाग येथे पहावयास मिळतो. खांबाचा एक शीर्षभागही येथे पाहावयास मिळतो. २x२ फुटाच्या एका चौरसाकृती दगडावर कोरलेले कमळाचे फूल अत्यंत सुंदर आहे. हे शिल्प एखाद्या स्तंभाचा शीर्षभाग असावा. गौतम बुध्दाची पद्मासन अवस्थेतील तीन शिल्पे येथे आहेत, पण या शिल्पांना चुना लावल्यामुळे त्यांचे मूळ ऐतिहासिकत्व संपले आहे. या ठिकाणी एका २x २ फूटांच्या चौरसाकृती दगडावर चारही बाजूने अजिंठा येथील लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. अशी शिल्पे कंधारमध्ये सर्वत्र आढळतात. एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीसमान असलेल्या शिल्पांवर वरच्या बाजूस मध्यभागी एक वृक्ष आहे, हा बोधिवृक्ष आहे. बोधिवृक्ष हे बुध्दाच्या ज्ञान प्राप्तीचे प्रतीक आहे.[४९] यामुळे बौध्द कलापरंपरेत बोधिवृक्ष दाखविण्यात येतो. हा विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय ( इ.स. ३५५-४०० ) यांच्या काळातील असावा कारण अजिंठा कला परंपरेतील बौध्दशिल्प येथे आढळून आली आहे.

## ५.२ स्तूप स्थापत्य :

वाकाटक काळात लेणी, मंदिरे आणि स्तूप स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. मराठवाड्यात केवळ कंधार व परिसरात या काळातील स्तूप स्थापत्याचे अवशेष मिळाले. हे स्तूप बौध्द स्तूप असून ते उद्देशिक स्तूप होते. याठिकाणी प्रथम बौध्द स्तूपाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी स्तूप हा शब्द वापरला जातो. अवशेषांवर बांधलेले स्मारक म्हणजे स्तूप होय.[५०] स्तूप हा बौध्द धर्माशी संबंधित असलेला एक वास्तूप्रकार आहे. स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय. या समाधीमध्ये त्या महापुरुषाचे शरिरावशेष

( अस्थी ) आणि त्याने वापरलेल्या वस्तुंचे अवशेष ठेवण्यात येत असत. थोडक्यात, एखाद्या महापुरुषाच्या दफनानंतर त्याच्या अवशेषांवर त्यांच्या स्मरणार्थ तयार केलेल्या वास्तुला अर्थात स्मारकाला स्तूप अशी संज्ञा प्राप्त झाली. एखाद्या महापुरुषाची स्मारकरुप समाधी म्हणजे स्तूप अशीही स्तूपाची व्याख्या करता येते. स्तूप हा संस्कृत शब्द आहे. जोडणे किंवा एक करणे आणि प्रशंसा करणे किंवा स्तवन करणे[५१] असे स्तूपाचे दोन अर्थ आहेत. त्यावरुन लोकांची श्रध्दा असणारे स्मारक उभारणे असा स्तुपाचा अर्थ काढता येतो.

## स्तुपाचे प्रकार :

स्तूप मुळात बुध्दाच्या निर्वाणाचे प्रतीक मानला जात असे. परंतु स्तूपाला इतके जास्त पावित्र्य मिळाले की, तो बुध्दाचा प्रतीक सुरुवातीलाच नव्हे तर पुढच्याही काळात मानला गेला. त्यामुळे देवमूर्तीची प्रतिष्ठापना करणे जसे महान व पुण्याचे कार्य समजले जावू लागले तसेच स्तूप बनविणे, स्तुपाचा जीर्णोद्धार करणे व स्तुपाची पूजा, उपासना व वंदना करणे, हे ही पुण्यकर्म समजले जावू लागले. प्रत्येक स्तुपाचे पाच भौतिक अवशेषांचा धातुकरंडक ठेवणे कधीही शक्य नव्हते. त्यामुळेच स्तुपाचे पुढील तीन प्रकार कल्पिले गेले.[५२]

**१) शारीरिक स्तूप -** शारीरिक अवशेषांवर बांधलेला स्तूप हा शारीरिक स्तूप होय. या स्तुपात शरीर धातू असतात.

**२) पारिभोगिक स्तूप -** बौध्दांच्या किंवा श्रेष्ठ भिक्खुंच्या प्रतिनिधित्व अवशेषांवर बांधलेला स्तूप म्हणजे पारिभोगिक स्तूप होय. गौतम बुध्दाच्या परिभोगात, उष्णीष पात्र व वज्रासन इत्यादी वस्तु असत. यावर बांधलेले स्तूप हे परिभोगिक स्तूप समजले जातात.

**३) उद्देशिक स्तूप -** उद्देशिक स्तूप म्हणजे बौध्द प्रार्थना मंदिरे होत. बुध्द किंवा पूर्वकालीन बुध्द यांच्या स्मृतीत तयार केलेले स्तूप म्हणजे उद्देशिक स्तूप होय. मध्ययुगात हा तिसरा प्रकार बराच वाढला. पवित्र बौध्द तीर्थस्थानी गेल्यावर पूजेसाठी दगडाचे लहान लहान स्तूप बांधण्याची पध्दत रुढ झाली.

कंधारच्या दक्षिणेस कंधार - घोडज रस्त्यावर कंधारपासून २ कि.मी. अंतरावर उजव्या बाजूस एक माळटेकडी आहे. ही माळटेकडी चारजमुनी माळालगत आहे. ही माळटेकडी बुध्दटेकडी

या नावाने ओळखली जाते. या माळटेकडीच्या उतरणीस बौध्द विहार[५३] आणि पूर्वेस बौध्द स्तुपाचे[५४] अवशेष मिळाले. आज या ठिकाणी केवळ बौध्द शिल्पावशेष पाहावयास मिळतात. येथील शिल्पावशेष आणि परिसराचे अवलोकन केले असता असे दिसते की, टेकडीच्या वरच्या बाजूस विहार आणि खालच्या बाजूस स्तूप होता. हा स्तूप मानसपुरी येथील स्तुपाच्या तुलनेत आकाराने थोडा मोठा असावा. या स्तुपाचे बहुतेक बांधकाम दगड व मातीने केलेले असावे. केवळ अर्धगोलाकार अंड हा भाग विटांनी बांधलेला असावा. या स्तुपाला एकच प्रवेशद्वार असावे. या प्रवेशद्वाराचा अर्थात तोरणाचा दगडी भग्नावस्थेतील स्तंभ अये आढळून आला. येथे एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीत मध्यभागी बोधिवृक्ष दाखविला आहे.[५५] येथे मिळालेल्या स्तुपांच्या अवशेषात अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. यावरुन अजिंठा चैत्यगृह आणि या स्तुपाचा कालखंड एकच असावा. हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय इ.स. ( ३५५-४००) यांच्या काळातील आहे. या काळातील भरपूर शिल्पावशेष येथे आढळतात. परंतु वाकाटक काळात स्तूप बांधल्याची उदाहरणे आढळून आली नाहीत. त्यावरुन येथे असा निष्कर्ष काढता येतो की, येथील स्तूप मौर्य काळातील असावा आणि विहार मात्र वाकाटक काळातील असावे. तसेच स्तूप आणि विहाराची पुनर्बांधणी वाकाटक काळात झाली असावी.

कंधार तालुक्यात कंधारच्या पश्चिमेस कंधारपासून साधारणपणे ५ कि.मी. अंतरावर कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्याबाजूस काही अंतरावर बाळांतवाडी नावाचे एक खेडेगाव आहे. या गावाच्या उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. हे भग्नावशेष व शिल्पावशेष हिंदू आणि बौध्द धर्माशी संबंधित आहेत. याच ठिकाणी एक बौध्द विहार होते.[५६] या विहाराच्या जवळच बौध्द स्तुपाचे भग्नावशेष आढळतात. या ठिकाणी बौध्द स्तुपाच्या त्रिदली तोरणाचे अवशेष आढळून आले. या ठिकाणी ५ फूट उंचीचे व $१^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे २ स्तंभ आणि ७ फूट उंचीचे व $१^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे ४ स्तंभ प्राप्त झाले आहेत. या स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागापासून अर्धवर्तुळाकार चैत्यकमानी आहेत. पदविन्यास पाहता या स्तुपाचा व्यास ३०

फूट असावा. अंड, वेदिका, हर्मिका, छत्रावली व प्रदक्षिणापथ हे सर्व स्तुपाचे घटक येथे अवशेषरुपाने आढळतात.[५७]

## ५.३ मूर्तिशिल्प :

वाकाटककालीन मराठवाड्यातील मूर्तिशिल्पाचा आढावा घेण्यापूर्वी याठिकाणी मूर्ती म्हणजे काय आणि मूर्ती निर्मितीचा इतिहास पाहणे आवश्यक ठरते. मूर्ती या शब्दाने विशिष्ट व्यक्ती किंवा देवतेचे मूर्त स्वरुप व अनुकृती आणि सादृश्य या गोष्टी ध्वनित होतात. प्रतिकृती, प्रतिमा, प्रतिबिंब, समान आकृती आणि प्रतिरुप इत्यादी शब्द मूर्ती या शब्दाचे समानार्थक आहेत. मूर्ती व प्रतिमा यांच्यात महत्वाचे अंतर असून मूर्ती ही सामान्य मनुष्याची किंवा प्राण्याची प्रतिकृती असते. मात्र प्रतिमा या शब्दाचा उल्लेख देवी, देवता, महात्मा व स्वर्गवासी व्यक्तींच्या संदर्भात केला जातो. आणखी महत्वाचे म्हणजे मूर्ती निर्माण प्रक्रियेत कलाकार स्वतंत्र असतो. परंतु प्रतिमा निर्माण प्रक्रियेत कलाकाराला पूर्णपणे स्वातंत्र्य नसते. प्रतिमा निर्मितीसाठी त्याला निश्चित नियत आणि वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. ज्या मूर्ती कोणत्या ना कोणत्या तरी धर्माशी संबंधीत असतात. अशा मूर्तीसाठी प्रतिमा या शब्दाचा प्रयोग केला जातो. प्रतिमा म्हणजे प्रतिरुप होय. प्रतिरुप म्हणजेच समान आकृती प्रतिकृती किंवा प्रतिबिंब होय. पाणिनीने समान आकृतीसाठी प्रतिकृती या शब्दाचा उपयोग केला आहे.[५८] प्राचीन भारतात वैदिक काळापासून प्रतिमा या शब्दाचा प्रयोग चालत आलेला आहे.[५९] यज्ञाच्या स्वरुपाच्या संदर्भात ऋग्वेदात प्रतिमा हा शब्द प्रयुक्त झालेला आहे. ऋग्वेदात प्रतिमासाठी अर्च्चा शब्दाचा प्रयोग केलेला आहे.[६०] पतंजली यांनी ही आपल्या महाभाष्यात प्रतिमासाठी अर्च्चा या शब्दाचाच प्रयोग केलेला आढळतो.[६१] भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा प्रारंभ सिंधु संस्कृतीपासून होतो. ही संस्कृती प्राचीन समजली जाते. सिंधु संस्कृतीच्या उत्खननात मातीपासून बनविलेल्या अनेक स्त्रीमूर्ती मिळाल्या. त्यांना मातृदेवीच्या मूर्ती म्हणतात. मोहोंजोदाडो[६२] येथील उतखननात पाषाणात घडविलेली एक पुरुष मूर्ती मिळाली आहे. या पुरुषाला दाढी असून त्याच्या अंगावर शालीसारखे वस्त्र आहे. या वस्त्रावर त्रिफूली अलंकरण असून या अलंकरणाचा प्रचार मिश्र, कीट व मेसोपोटेमिया येथे होता. त्या ठिकाणी त्यांचा संबंध देवमूर्तीशी होता. यावरुन ही पुरुष मूर्ती कोणत्या तरी धर्माशी संबंधित असली पाहिजे. मोहोंजोदडो[६३] या

ठिकाणी दुसरी एक पुरुष प्रतिमा मिळाली आहे. एका चौकोनी तुकड्यावर तीन डोकी असलेला आणि शिंगाचा मुकूट घातलेला एक पुरुष योगासनात बसलेला दाखविण्यात आला आहे. हा योगी पुरुष आहे. जे.एन. बॅनर्जी यांच्या मते, हे कुर्मासन आहे.[६४] या योगी पुरुषांच्या उजव्या बाजूस हत्ती व वाघ तर डाव्या बाजूस म्हैस, गेंडा, वाघ व एक मनुष्य आहे, तर समोर एक हरीण आहे. जॉन मार्शल यांच्या मते, हा योगी पुरुष म्हणजे पशुपति शिवाचे प्रारंभिक रुप आहे.[६५] एका दुसऱ्या तुकड्यावर एक पुरुष आसन घालून बसलेला आहे.[६६] त्याच्या डोक्यावर नागफणा असून त्याच्या आजूबाजूस गुडघे टेकून बसलेले उपासक दिसतात. आणखी तीन तुकड्यांवर जैन तीर्थकरांप्रमाणे स्थानक स्थितीत विवस्त्र असलेले वृक्षदेव दाखविण्यात आलेले असून या प्रत्येकाच्या जवळ अर्धा वाकलेला उपासक दाखविला आहे.[६७] या उपासकाच्या डोक्यावर साप आढळतो. उत्खननात मातीचे अनेक तुकडे प्राप्त झालेले आढळतात. मॅकेच्या मते, या गृहदेवता असाव्यात.[६८] याशिवाय उत्खननात विशिष्ट प्रकारची केशभूषा केलेल्या मातीच्या अनेक स्त्रीप्रतिमा सुध्दा मिळालेल्या आहेत, अशा स्त्रीप्रतिमांना मातृदेवीच्या मूर्ती म्हटले जाते.[६९] यावरुन निष्कर्ष काढता येतो की, सिंधु संस्कृतीपासूनच मूर्ती अर्थात प्रतिमा निर्मितीस प्रारंभ झाला. तसेच या संस्कृतीपासूनच मूर्तीपूजेलाही सुरुवात झाली. सर्वप्रथम कोणत्या धर्मात प्रतिमा निर्माण केल्या गेल्या हा प्रश्न निर्माण होतो. गणेश हरी खरे यांच्या मते, सर्वप्रथम जैन, या नंतर बौध्द आणि शेवटी वैदिक अर्थात हिंदू धर्मात प्रतिमा निर्माण केल्या गेल्या.[७०]

हिंदू धर्मात विविध देवदेवता आहेत. या देवदेवतांच्या मूर्ती निर्माण करण्याची सिंधु संस्कृतीपासून सुरु झालेली परंपरा पुढे निरंतर चालू राहिली. हिंदू धर्मात ज्या मूर्ती निर्माण केल्या गेल्या. त्यामध्ये शिव, पार्वती, विष्णू, सूर्य, गणपती, कार्तिकेय, नाग, ब्रह्मदेव, गजलक्ष्मी, मातृदेवता, सप्तमातृका, दुर्गादेवी, वृषभ ( नंदी ), नृसिंह, श्रीलक्ष्मीनृसिंह, सरस्वती इत्यादी मूर्ति विशेष उल्लेखनीय ठरतात. वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौद मूर्तिशिल्पाची निर्मिती करण्यात आली. परंतु त्याचे प्रमाण अत्यंत कमी आढळते. याकाळातील मूर्तिशिल्प नांदेड, शिऊर आणि कंधार येथेच आढळते.

### विष्णूमुर्ती :

शिऊर येथील लेण्यात ९ विष्णुमूर्ती आढळतात. लेणी क्रमांक - १ मध्ये १, लेणी क्रमांक - २ मध्ये १ आणि लेणी क्रमांक -३ मध्ये ७ विष्णुमूर्ती आहेत. ब्रह्मा, विष्णू व महेश ( शिव )या महत्वाच्या हिंदू देवता आहेत. सृष्टीचा निर्माण कर्ता ब्रह्मदेव, पालनकर्ता विष्णू व संहारकर्ता महेश समजला जातो. भागवत आणि वैष्णव संप्रदायात विष्णू या देवतेस सर्वोच्च स्थान आहे. विष्णू ही प्राचीन देवता असून ऋग्वेदातील अनेक सुक्तांत त्याचे उल्लेख आढळतात.[७१] कुशाण काळापूर्वीपासून विष्णू प्रतिमानिर्मितीस प्रारंभ झाला. वैखानस आगमातील विवरणानुसार विष्णूमुर्तीचे स्थानक, आसन व शयन असे तीन प्रकार पडतात.[७२] या प्रत्येकाचे योग, भोग, वीर व आभिचारिक असे चार भाग पडतात. विष्णुमूर्तीचे ३६ प्रकार प्रचलित आहेत. या सर्व प्रकारात स्थानक मूर्तीची संख्या अधिक आहे. स्थानकमूर्तीत द्विभूज, चतुर्भूज, अष्ठभुज, चतुर्व्युह, पंचवीर, वैकुंठ, विश्वरुप, अनंत, हरिहर आणि काही अवतार मूर्तीचा समावेश होतो. गदा, चक्र, शंख, पद्म जलपात्र आणि फळ ही विष्णुची आयुधे आहेत.[७३] डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, कटिसूत्र, अंगद, कंकणे, कुंडले, एकावली ( टपोऱ्या मण्यांचा एकच सर ), हारयष्टी, ( मोत्याचे किंवा मण्यांचे एकाधिक पदर एकत्र गुंफून तयार केलेला जाडजूड दागिना) आणि वनमाला(वनपुष्पांची माळा ) हे विष्णूचे दागिने आहेत.[७४]

शिऊर येथील लेण्यांतील स्तंभावर असलेल्या विष्णुमूर्ती स्थानक असून चतुर्भूज आहेत. लेणी क्रमांक - १ मधील दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर विष्णुची स्थानक मूर्ती आहे. ही मूर्ती १५० सें.मी. उंचीची आणि ६० सें.मी. जाडी असलेली आहे. ही मूर्ती चतुर्भूज आहे. विष्णुच्या हातात गदा, चक्र, शंख आणि पद्म आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, गळ्यात हार, दंडात बाजूबंद,जानवे, कटिसूत्र, कानात कुंडले, हातात कंकणे व वनमाला आहे. अशाचप्रकारची विष्णुमूर्ती लेणी क्रमांक - २ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर आढळते. याच लेणीत दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर चतुर्भूज आणि स्थानक विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या उजव्या खालच्या हातात गदा व वरच्या हातात फळ आहे, तर डाव्या खालच्या हातात शंख व वरच्या हातात चक्र आहे. चक्र असलेला हात नष्ट झाला आहे.

लेणी क्रमांक -३ मध्ये सहा स्थानक विष्णुमूर्ती असून एक विष्णुमूर्ती शेषशायी प्रकारातील आहे. लेणीत दक्षिणेकडून पहिल्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर विष्णूची स्थानक मूर्ती आढळते. या मूर्तीची उंची १५२ सें.मी. आणि जाडी ८४ सें.मी आहे. ही मूर्ती चतुर्भुज आहे. मूर्तीच्या वरच्या डाव्या हातात चक्र असून खालच्या डाव्या हातात शंख आहे, तर उजव्या वरच्या हातात पद्म व खालच्या हातात गदा आहे. विष्णूच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, मेखला, कंठहार, हातात कंकणे व कानात कुंडले आहेत. दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर द्विभूज विष्णुमूर्ती आहे. या मूर्तीची उंची १५८ सें.मी. असून जाडी ६० सें.मी. आहे.

विष्णुच्या उजव्या हातात कोपराखाली गदा असून डावा हात कमरेवर ठेवलेला आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, कानात कुंडले आणि हातात कंकणे आहेत. याच ओळीतील दुसऱ्या स्तंभावर १४५ सें.मी. उंचीची आणि ६९ सें.मी. जाडीची चतुर्भूज विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या वरच्या डाव्या हातात शंख आहे, तर खालचा हात झिजलेला असल्याने अस्पष्ट झाला आहे. उजव्या वरच्या हातात चक्र आहे, तर खालचा हात कमरेवर ठेवला आहे.

विष्णुच्या डाव्या बाजूस सेविका असून तिची उंची ६९ सें.मी. आणि जाडी २० सें.मी. आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, कानात कुंडले, अंगावर जानवे, हातात कंकणे, गळ्यात हारयष्टी ( मण्यांचे किंवा मोत्याचे एकाधिक पदर एकत्र गुंफून तयार केलेला जाडजूड दागिना ) व कटिसूत्र आहे. याच लेणीत दक्षिणेकडून तिसऱ्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर १५८ सें.मी. उंचीची व ७६ सें.मी. जाडीची स्थानक आणि चतुर्भूज विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या वरच्या उजव्या हातात शंख असून खालच्या हातात कसलेही आयुध नाही. वरच्या डाव्या हातात फळ आहे, तर खालच्या हाताचा कोपर गदावर टेकवला आहे. विष्णुच्या अंगावर सर्वप्रकारचे अलंकार आहेत. चौथ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर असलेली विष्णुमूर्ती १४५ सें.मी. उंचीची आणि ४५ सें.मी. जाडी असलेली आहे. विष्णू स्थानक व चतुर्भूज आहे. विष्णुच्या डाव्या हातात गदा व उजव्या हातात पद्म आहे. बाकी दोन्ही हात नष्ट झालेले आहेत. विष्णुच्या डाव्या बाजूस पायथ्याशी चवरीधारक सेविका आहे.

## शेषशायी विष्णू :

विष्णुमूर्तीचा तिसरा प्रकार म्हणजे शयन विष्णुमूर्ती होय. या मूर्तिप्रकारात फक्त एकाच प्रकारची मूर्ती म्हणजे शेषावर झोपलेला विष्णू आपल्याला पाहावयास मिळतो. शेषनागावर झ्‌ ाोपलेल्या विष्णुला शेषशायी, अनंतशायी आणि जलशायी इत्यादी नावानेही ओळखले जाते. विष्णुधर्मोत्तर पुराणात शेषशायी विष्णुला पद्मनाथ नावाने उल्लेखिले आहे.[७५] शेषशायी विष्णुमूर्ती कशा स्वरुपाची असावी, याचेही वर्णन यामध्ये केलेले आढळते. त्यानुसार जलाशयात विष्णू पहुडलेला असावा, त्याचा एक हात मांडीवर आणि दुसरा हात त्याच्या बेंबीजवळ असावा. वरचा उजवा हात मस्तकाजवळ असावा तर डाव्या हातात मंजरी असावी. बेंबीमधून निघालेल्या कमळावर ब्रह्मा आसनस्थ असावा. तसेच राक्षसांनी कमळाच्या देठाला धरलेले असावे. अशा स्वरुपात शेषशायी विष्णुची मूर्ती असावी.

वाकाटक कालखंडात व काळात शिऊर येथील लेणी क्रमांक - ३ मध्ये दक्षिणेकडील भिंतीत स्तंभाच्या पहिल्या ओळीत तंभ क्रमांक -२ आणि ३ च्या मध्यभागातील जागेत शेषशायी विष्णुची मूर्ती कोरलेली आहे. विष्णू शेषनागावर झोपलेले असून ते चतुर्भुज आहेत. विष्णुच्या डोक्यावर पाच नागफणा आहेत. तसेच विष्णुच्या चारही हातात शंख, चक्र, गदा आणि पद्म आहे. ही मूर्ती गुप्त वाकाटक काळातील आहे. विष्णुची ही मूर्ती पूर्व - पश्चिम १३५ सें.मी. लांब आणि दक्षिण - दक्षिण - उत्तर ६० सें.मी. जाडीची आहे. विष्णुचे डोके पूर्वेला तर पाय पश्चिमेस आहेत. विष्णुच्या तिन्ही बाजूस स्तंभावर व भिंतीवर देव - देवतांची शिल्पे कोरलेली आहेत. या देवता स्थानक असून त्यांची उंची ५४ सें.मी. आहे. ही सर्व शिल्पे झिजलेल्या स्थितीत आहेत.

## केशव :

विष्णुची एकूण २४ रुपे मानली जातात. त्यापैकी पहिल्या क्रमांकाचे रुप म्हणजे केशव होय. शंख, चक्र, गदा व पद्म ही केशवाची आयुधे आहेत.[७६] केशवाच्या मूर्ती स्थानक स्थितीत व प्रामुख्याने मंदिराच्या बाह्यभिंतीवर आढळतात. येथील लेणी क्रमांक -२ मध्ये पहिल्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर केशवाची स्थानक मूर्ती कोरलेली आढळते. या मूर्तीची उंची १५० सें.मी. आणि जाडी १०५ सें.मी. आहे. केशव चतुर्भुज असून त्यांच्या वरच्या डाव्या हातात चक्र व खालच्या हातात

पद्म आहे, तर उजव्या वरच्या हातात शंख व खालच्या हातात गदा आहे. केशवाच्या वरच्या हातातील आयुधे तुटलेली आहेत. केशवाच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार आहेत. कलाकौशल्याच्या बाबतीत ही मूर्ती उल्लेखनीय नसली तरी महत्वाची ठरते.

**पद्मनाथ :**

लेणी क्रमांक - ३ मध्ये पहिल्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर पद्मनाथाची उत्तराभिमुख स्थानक मुर्ती कोरलेली आहे. या मूर्तीची उंची १४८ सें.मी. असून ती चतुर्भुज आहे. रुपमंडननुसार शंख, गदा, चक्र व पद्म ही पद्ममनाथाची आयुधे आहेत.[७७] पद्मनाथाच्या खालच्या उजव्या हातात शंख व डाव्या हातात गदा आहे. इतर दोन हात खंडीत झाले आहेत. त्या हातात पद्म व चक्र आहे. या मूर्तीच्या खालच्या दोनही हातात शंख व गदा आहे. त्यावरुन ही मूर्ती पद्मनाथाची असल्याचे मत डॉ. भगवान देशमुख यांनी व्यक्त केले आहे.[७८] पद्मनाथाच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, गळ्यात कंठहार, कमरेवर मेखला, हातात कंकणे व कानात कुंडले आहेत. पद्मनाथाच्या वरच्या दोन्ही बाजूस आकाश गंधर्वकन्या असून त्यांच्या हातात पुष्पहार आहेत. या गंधर्व कन्यांची उंची ३२ सें.मी. आहे.

**वासुदेव :**

विष्णुमूर्तीचे २४ प्रकार आहेत. त्यापैकी वासुदेव हा त्यापैकीच एक प्रकार आहे. लेणी क्रमांक --१ मध्ये तिसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर वासुदेवाचे शिल्प कोरलेले आहे. वासुदेवाची ही मूर्ती १४५ सें.मी. उंच आहे. ही मूर्ती स्थानक असून समभंग आहे. वासुदेव चतुर्भुज आहे. वासुदेवाच्या वरच्या हातात शंख आणि चक्र आहे, तर राहिलेल्या दोन हातात गदा आणि पद्म आहे. या मूर्तीचे खालचे दोन्ही हात खंडीत झालेले आहेत. रुपमंडन नुसार गदा, शंख, चक्र व पद्म ही वासुदेवाची आयुधे आहेत.[७९] या मूर्तीच्या वरच्या दोन्ही हातात शंख आणि चक्र असल्यामुळे ही मूर्ती वासुदेवाची आहे. डॉ. प्रभाकर देव यांनी या मूर्तीचा उल्लेख विष्णूमूर्ती म्हणून केला आहे.[८०] परंतु मूर्तिशास्त्रानुसार ही मूर्ती वासुदेवाचीच ठरते.

## नृसिंह :

विष्णुच्या १० अवतारापैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे. नृसिंह हा विष्णुचा तात्कालिक अवतार आहे.[८१] येथील लेणी क्रमांक -२ मध्ये दुसऱ्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर नृसिंहाचे एक शिल्प कोरलेले आहे. मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने गिरीज नृसिंह, स्थौन नृसिंह, यानक नृसिंह, योग नृसिंह व लक्ष्मी नृसिंह असे नृसिंह मूर्तीचेह प्रकार पडतात.[८२] गिरीज नृसिंह पद्मासनात व उत्कटासनात दाखविला जातो. एकटा दाखविल्यास त्यास केवल नृसिंह म्हणतात. हा नृसिंह द्विभुज व चतुर्भूज असतो. त्याच्या दोन हातात गदा व चक्र असते.[८३] शिऊर येथील नृसिंह केवल नृसिंह असून तो द्विभुज आहे. नृसिंह आसनस्थ असून त्याने आपले दोन्ही हात मांडीवर ठेवलेले आहेत. त्याच्या दोन्ही हातात गदा व चक्र आहे. नृसिंहाची ही मूर्ती ११० सें.मी. उंचीची असून तिची बरीच झीज झाल्यामुळे ती अस्पष्ट दिसते. विष्णुच्या १० अवतारापैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे.

## वराह :

विष्णुच्या १० अवतारांपैकी एक वराह अवतार आहे. वराहमूर्तीचे शिल्पांकन भूवराह, आदिवराह, नृवराह, यज्ञवराह आणि प्रलयवराह इत्यादी प्रकारात केले जाते. विष्णुधर्मोत्तर पुराणानुसार वराहचे मुख आणि मानवाचे शरीर असलेली अलिधासनात उभी असलेली वराहमूर्ती असावी.[८४] वराहमूर्ती चतुर्भूज असावी. त्याच्या वरच्या दोन्ही हातात शंख व चक्र असून एका हाताने भूदेवीच्या पायाला आधार दिलेला असावा तर दुसऱ्या हाताने भूदेवीला कवटाळले असावे. येथील लेणी क्रमांक - २ मध्ये दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर आणि लेणी क्रमांक - ३ मध्ये तिसऱ्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर भूवराहाची एक एक मूर्ती कोरलेली आहे. लेणी क्रमांक - २ मधील स्तंभावरील वराहमूर्ती १३० सें.मी. उंचीची आहे. वराह द्विभूज असून त्याचा उजवा हात कमरेवर आहे, तर डाव्या हाताने त्याने भूदेवीला कवटाळले आहे. भूदेवी किंचितशी डावीकडे पाहात आहे. वराहाने उजवा पाय जमिनीवर रोवलेला आहे, तसेच डावा पाय चालत्या स्थितीत आहे. वराहाच्या अंगावर जानवे व कटिसूत्र आहे. या मूर्तीची बरीच झीज झाली आहे. अशाचप्रकारची

वराह मूर्ती लेणी क्रमांक - ३ मधील स्तंभावर आढळते. परंतु या मूर्तीची झीज बरीच झाल्यामुळे ती अस्पष्ट झाली आहे.

**राम :**

विष्णुच्या १० अवतारांपैकी राम आणि कृष्ण हे पूर्णावतार आहेत. रावणाचा संहार करण्यासाठी विष्णुने रामाच्या रुपात अवतार घेतला होता. वाल्मिकी रामायणात रामाच्या जीवनाचे संपूर्ण विवेचन केलेले आहे. रामाच्या मूर्ती द्विभूज आणि चतुर्भुज बनविल्या गेल्या. गुप्तकाळापूर्वीच्या रामाच्या स्वतंत्र मूर्ती मिळाल्या नाहीत. गुप्तकाळात रामायणातील घटना शिलापट्ट आणि मंदिरावर अंकित केल्या जात होत्या. गुप्तकाळानंतर रामाच्या मूर्ती बनविल्या जाऊ लागल्या. राम आणि सीतेची मध्ययुगीन एक आलिंगन प्रतिमा ग्वाल्हेर संग्रहालयात पाहावयास मिळते. मराठवाड्यात रामाच्या मूर्ती वेरुळ लेणी, अंबाजोगाई येथील आमलेश्वर मंदिराच्या बाह्यभिंतीवर , औंढा येथील नागनाथ मंदिराच्या बाह्यभिंतीवर , चारठाणा, वडगाव आणि नांदेड जिल्ह्यातील खानापूर, कापसी ( बु.), शिऊर आणि होट्टल येथे मिळाल्या आहेत.[८५] शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये चौथ्या ओळीतील दुसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर रामाची स्थानक मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती १६४ सें.मी. उंचीची असून दक्षिणाभिमुख आहे. रामाच्या डाव्या हातात धनुष्य आहे आणि उजव्या खांद्यावर बाणाचा भाता आहे. राम द्विभुज आहे. त्यांच्या गळ्यात रुद्राक्षाची माळ, मनगटातही रुद्राक्षाचे कंकण, अंगावर केसांचा जटामुकूट आहे. नांदेड जिल्हयात शिऊर व होट्टल व कापसी ( बु. ) येथे रामाच्या स्थानक मूर्ती मिळाल्या असून यामध्ये शिऊर, खानापूर येथील रामाची मूर्ती सर्वात प्राचीन ठरते. ही मूर्ती वाकाटक काळातील आहे. रामाच्या जवळ उजव्या बाजूस एक स्थानक पुरुष प्रतिमा आहे. ही प्रतिमा लक्ष्मणाची असावी. या प्रतिमेची उंची ८४ सें.मी. आहे. लक्ष्मणाच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे व कानात कुंडले आहेत.

**कृष्ण :**

कृष्ण शब्दाचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो.[८६] वासुदेव-देवकीचा पुत्र कृष्ण हा विष्णुचा आठवा अवतार मानला जातो. मत्सपुराणात कृष्णाला विष्णुचा पूर्ण अवतार म्हटले आहे. कुशाण काळापासूनच कृष्णाच्या कथांचे अंकन करण्यास प्रारंभ झालेला होता. कृष्ण जन्माष्टमीच्या कथेचे

शिल्पांकन केलेले एक प्राचीन खंडीत शिल्प मथुरा संग्रहालयात पाहावयास मिळते.[८७] हे शिल्प इसवी सनाच्या दुसऱ्या - तिसऱ्या शतकातील आहे. कृष्णाच्या विविध रुपातील मूर्ती बनविल्या गेल्या. खजुराहो येथे कृष्णद्धारा पुतनावध, शकटभंग, कुब्जानुग्रह, कुवलयापीड वध, चाणूर युध्द, शलयुध्द, तृणावर्त वध, यमलार्जुन उध्दार, वत्सासुर वध, कालियामर्दन व अरिष्टासुर वध इत्यादी मूर्तीचे सुंदर अंकन केलेले आढळते.[८८] शिऊर येथील लेणी क्रमांक - २ मध्ये दुसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर कृष्णाची कालियामर्दन प्रकारातील सुंदर मूर्ती कोरलेली आहे. यमुना नदीच्या एका डोहात कालीया नावाचा विषारी नाग होता. त्यामुळे लोक कालीया नागास घाबरत असत. कृष्णाने या कालीया नागाचे दमन केले. या प्रसंगाचे शिल्पांकन येथे केलेले आढळते. येथे कृष्ण चतुर्भुज असून त्याच्यासमोर मोठा सर्प दाखविला आहे. कृष्ण या सर्पाचे दमन करीत आहे. कृष्णाची ही मूर्ती दक्षिणाभिमुख असून १४५ सें.मी. उंचीची आहे. कृष्णाची ही मूर्ती नांदेड जिल्ह्यातील एकमेव मूर्ती ठरते.

## पुतनावध :

प्राचीन भारतात कृष्णाच्या विविध रुपातील मूर्ती बनविल्या गेल्या. त्यापैकीच एक म्हणजे पुतनावध होय. पुतना ही एक राक्षसीण असते. बाल कृष्णाचा वध करण्यासाठी ती त्याला जवळ घेऊन मांडीवर बसवून स्तनपान करते. तिच्या स्तनातील दूध म्हणजे विष असते. त्यामुळेच ती कृष्णाला स्तनपान करते. परंतु कृष्ण तिच्या स्तनातील सर्व दूध पिऊनही स्तन सोडत नाही. तो तिच्या स्तनाद्धारे तिच्या शरीरातील सर्व रक्ताचे शोषण करतो. यावेळी पुतना आकाशात झेप घेते, तरीही कृष्ण तिचे स्तन न सोडता तिचे रक्तशोषण करतो. त्यामुळे पुतना मरण पावते. हाच पुतनावध होय. शिऊर येथील लेणी क्र. २ मधील स्तंभावर एक आणि लेणी क्र. ३ मध्ये दोन स्तंभांवर एक एक अशा २ पुतनावधाच्या मूर्ती शिल्पीत केल्या आहेत. कृष्ण पुतनाचे उजवे स्तनपान करीत आहे, तर पुतना त्याच्या तोंडातून स्तन सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी ती आकाशात झेप घेत आहे. तिने आपले दोन्ही हात वर केलेले आहेत. पुतनावधाची ही मूर्ती ९२ सें.मी. उंचीची आहे.

## गरुड :

विष्णुचे वाहन गरुड आहे. भारतीय मूर्तिकलेत गरुडाच्या विविध प्रकारच्या मूर्ती आढळतात.विष्णुधर्मोत्तर पुराणात मनुष्य रुपातील गरुडाचे वर्णन केलेले आहे. [८९] अणकुचीदार नाक, चार हात, एकटा असल्यास त्याच्या हातात छत्र व कुंभ असावा व दोन हात अंजली मुद्रेत जोडलेले असावेत. श्री तत्वनिधिप्रमाणे मात्र मनुष्य रुपातील गरुड द्विभुज असावा. मानवी रुपातील गरुड प्रतिमा द्विभुज, टोकदार नाक, पसरलेले पंख व भरपूर दागिने असलेल्या आहेत. कधी - कधी त्याच्या हातात सर्प दिसते. शिऊर येथील लेणी क्रमांक - २ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर गरुडाची मानवी रुपातील मूर्ती कोरलेली आढळते. ही मूर्ती द्विभूज व स्थानक असून ९० सें.मी. उंचीची आहे. गरुडाच्या उजव्या हातात सर्प आहे. गरुड धावत्या - उडत्या स्थितीत दाखविला आहे. गरुडाच्या मस्तकावर मुकूट व कानात कुंडले आहेत. गरुडाच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार आहेत. गरुडाची ही मूर्ती पूर्वाभिमुख असून ती ऊन, वारा व पावसांचा आघात सहन करीत टिकून आहे. ज्या स्तंभावर ही मूर्ती कोरलेली आहे, तो स्तंभ लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाल्यामुळे उघड्यावर आहे. लेणी क्रमांक - ३ मध्येही तिसऱ्या ओळीतील चौथ्या क्रमांकाच्या स्तंभावर गरुडाची मूर्ती कोरलेली आहे. गर्भगृहाच्या उत्तर बाजूस हा स्तंभ आहे. गरुड स्थानक असून दक्षिणाभिमुख आहे. गरुडाच्या या मूर्तीची उंची ११९ सें.मी. आहे. गरुड द्विभूज असून त्याचे नाक सरळ व टोकदार आहे. त्याच्या डोक्यात मुकूट असून डाव्या हातात सर्प आहे. या मूर्तीची बरीच झीज झाल्यामुळे ती अस्पष्ट दिसते. याच लेणीत भिंतीवरही गरुडाचे शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प अर्धवट स्वरुपात कोरलेले आहे.

## त्रिविक्रम :

त्रिविक्रम हा विष्णुचा पाचवा अवतार आहे.[९०] गुप्त - वाकाटक काळापासून त्रिविक्रमाच्या प्रतिमा शिल्पात एक पाय आकाशाकडे उचलून उभा असलेला प्रचलित आढळतो.[९१] अवतार प्रतिमेतील त्रिविक्रम द्विभुज, चतुर्भुज आणि अष्ठभुज दाखविला जातो. त्याच्या हातात धनुष्य, ढाल, शंख, खड्ग, गदा, फळ आणि चक्र ही त्रिविक्रमाची आयुधे आढळतात.[९२] शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये दुसऱ्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर त्रिविक्रमाची मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती

१५५ सें.मी. उंचीची असून उत्तराभिमुख आहे.त्रिविक्रम चतुर्भुज असून त्याच्या वरच्या डाव्या हातात चक्र आणि खालच्या हातात शंख आहे, तर उजवा खालचा हात कमरेवर असून वरच्या हातात फळ आहे. त्रिविक्रमाचा डावा पाय आकाशाकडे उचलून उभा असलेला दाखविला आहे. त्रिविक्रमाच्या मस्तकावर मुकूट, अंगावर जानवे, कानात कुंडले, हातात कंकणे, गळ्यात जाडजुड हार ( हारयष्टी ) व दंडात बाजूबंद आहेत. त्रिविक्रमाच्या वरच्या दोन्ही बाजूस चवरीधारक सेविका आहेत.

### लिंगोद्‌भव मूर्ती :

लिंगोद्‌भव शिवमूर्तीचा हा प्रकार भारतात लोकप्रिय होता. लिंगातून उत्पन्न झालेली ती लिंगोद्‌भव मूर्ती होय.[१३] लिंगोद्‌भव मूर्तीच्या कथेची माहिती लिंगपुराण, वायुपुराण व शिवपुराणात आढळते. ब्रह्मदेव आणि विष्णू हे दोघेही स्वत:ला श्रेष्ठ समजून एकमेकांना भांडू लागले. अचानक त्या दोघांमध्ये विस्तवाने धगधगणारे एक लिंग प्रगट झाले. त्याच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागत नव्हता. हे दोघेही त्याचा पत्ता लावण्यास निघाले. हंसाचे रुप धारण करुन ब्रह्मदेव वर गेले आणि वराहाच्या रुपाने विष्णुने खालची वाट धरली. दोघेही खूप भटकले. परंतु त्यांना त्यांच्या समोर प्रगट झालेल्या लिंगाच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागला नाही तेव्हा एकाएकी प्रणवाचा नाद उमटला. हेच शिवाचे स्वरुप होते. दोघेही त्याला शरण गेले आणि क्रमाने उजवी आणि डावीकडे हात जोडून उभे राहिले.[१४] डॉ. नि.पु. जोशी[१५] यांच्या मते उत्तर भारतात बहुतेक नुसते लिंगच दाखवीत तर दक्षिण भारतात लिंगातून उद्‌भूत झालेला शंकरही दाखवीत असत. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये तिसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर लिंगोद्‌भव शिवमूर्ती कोरलेली आहे. ही शिवमूर्ती नांदेड जिल्ह्यातील सर्वात प्राचीन ठरते. या शिवमूर्तीची परंपरा उत्तरेची परंपरा आहे. कारण या लेण्या गुप्त - वाकाटक काळातील आहेत. येथे मूर्ती दर्शवीत असताना केवळ लिंगच दर्शविण्यात आलेले आहे. मध्यभागी १५४ सें.मी. उंचीचे शिवलिंग आहे. शिवलिंगाच्या डाव्या बाजूस ब्रह्मदेव नमस्कार मुद्रेत बसलेले आहेत. ब्रह्मदेव चतुर्मुख आहेत. ब्रह्मदेवाच्या मूर्तीची उंची १५४ सें.मी. असून जाडी २५ सें.मी. आहे. ब्रह्माच्या मस्तकावर मुकूट व गळ्यात हार आहे. शिवलिंगाच्या उजव्या बाजूस विष्णू आहे. विष्णूची मूर्ती ५८ सें.मी. उंचीची व जाडी ३० सें.मी. आहे. त्यांच्या वरच्या उजव्या हातात चक्र असून खालचा उजवा हात अभयमुद्रेत आहे, तर वरचा डावा हात शिवलिंगावर

ठेवला असून खालचा हात गुडध्यावर ठेवला आहे. डॉ. नि.पु. जोशी यांचे मत विचारात घेतल्यास ही शिवमूर्ती लिंगोद्भव शिवमूर्ती ठरते.[९६]

## महिषासुरमर्दिनी :

महिषासूर नावाच्या राक्षसाचा संहार करणाऱ्या दुर्गादेवीला महिषासुरमर्दिनी म्हणतात.[९७] देवीमहात्म्य, मत्स्यपुराण आणि रुपमंडन यामध्ये देवीच्या महिषासुरमर्दिनी रुपाला कात्यायनी म्हटले आहे.[९८] सिंह हे महिषासुरमर्दिनीचे वाहन आहे. वज्र, तलवार, ढाल, शूल ( त्रिशूल ), अंकूश, धनुष्यबाण, पाश, चक्र, सळई ( शलाका ), मुदगर, डमरु, मुण्ड, खेटक, कठार, गदा, आरसा, ध्वज, शक्ति, अक्षमाळा, दंड, शंख, पद्म, घंटा, पानपात्र व परशु ही महिषासुरमर्दिनीची आयुधे आहेत.[९९] तिला चार, आठ, दहा, सोळा, अठरा व वीस हात आढळतात. या देवीचे स्तन सुपुष्ट, विशाल नेत्र व मान सुंदर असते. दुर्गादेवीच्या महिषासुरमर्दिनीच्या रुपाला चंडी असेही म्हणतात. महिषासुर मर्दिनीच्या प्रतिमांच्या निर्मितीचा प्रारंभ इ.स.पू. पहिल्या किंवा इसवी सनाच्या पहिल्या शतकात झाला. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्याच स्तंभावर महिषासुरमर्दिनीचे अत्यंत सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प १५८ सें.मी. उंचीचे आणि ८४ सें.मी. जाडीचे आहे. महिषासुरमर्दिनी चतुर्भुज असून उत्तराभिमुख आहे. तिच्या वरच्या डाव्या हातात घंटा आहे, तर खालचा हात महिषासुराच्या ढोपरावर आहे. वरच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे, तर खालच्या हातात शलाका आहे, तर खालच्या हातात शलाका म्हणजेच सळई आहे. महिषासुरमर्दिनीच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात हार, कानात कुंडले व हातात दोन बांगड्या आहेत. महिषासुरमर्दिनीने उजव्या हातातील त्रिशूल महिषासुराच्या नरड्यावर मारला असून तिने उजव्या पायाने त्याच मस्तक दाबून धरले आहे.

## सप्तमातृका :

सर्व प्रकारच्या देवींसाठी सप्तमातृकाचा प्रयोग केला जातो. सप्तमातृकाचे मुळ ऋग्वेदात आढळते, असे मत डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे. प्राचीन भारतीय समाजात मातृदेवतेची पूजा प्रचलित होती. मातृकांची संख्या सात आहे. काही ठिकाणी ही संख्या ८,१६,३२ व ६४ अशी आढळते- देवी भागवत पुराणात ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी

आणि चामुंडा या सप्तमातृकांबरोबरच आठवी मातृका म्हणून लक्ष्मीचा उल्लेख केलेला आढळतो. सप्तमातृकांची शिल्पे लेणी व मंदिराच्या भिंतीवर व छतावर प्रामुख्याने कोरलेली आढळतात. सप्तमातृका आसनस्थ आणि स्थानक स्थितीत कोरलेल्या आढळतात. सप्तमातृकांची शिल्पनिर्मिती कुशाण काळापासून सुरु झाली. कुशाण काळात सप्तमातृकांसोबत स्कंदही दिसतो. इसवी सनाच्या पाचव्या - सहाव्या शतकात स्कंदाची जागा शिवाने घेतलेली दिसते. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये तिसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर स्थानक स्थितीत सप्तमातृकांची शिल्पे कोरलेली आहेत. या ठिकाणी सप्तमातृकांबरोबर शिव दाखविला आहे. ही सप्तमातृकांची शिल्पे स्तंभाच्या पायथ्याशी असून दक्षिणाभिमुख आहेत. सप्तमातृकाची ही शिल्पे ७४ सें.मी. उंचीची आहेत. सप्तमातृकांची शिल्पे आसनस्थ आढळतात. परंतु येथील सप्तमातृका मात्र स्थानक आहेत.

**गंधर्वकन्या :**

आकाशात उडणाऱ्या गंधर्वकन्यांची शिल्पे प्रामुख्याने लेणींच्या भिंतीवर आणि स्तंभांवर कोरलेली आढळतात. शिऊर येथील लेणी क्रमांक - ३ मध्ये पहिल्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर वरच्या बाजूस आकाशात उडणाऱ्या दोन गंधर्वकन्यांची शिल्पे कोरलेली आहेत. या गंधर्वकन्या आकाशात मुक्तपणे संचार करीत असून त्यांच्या हातात पुष्पहार आहेत. या गंधर्वकन्यांच्या खालच्या बाजूस पद्मनाथाचे शिल्प आहे.

**नृसिंह :**

विष्णुच्या दहा अवतारांपैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे. या अवताराची कथा विभिन्न पुराणात आढळते. स्थौन हे नृसिंहाचे एक विशेषण आहे. स्थौन या शब्दाचा अर्थ खांब अर्थात स्तंभ होय. स्तंभातून प्रकट झालेला नृसिंह तो स्थौण नृसिंह होय. भागवत पुराणावरुन समजते की नृसिंह स्तंभातून प्रकट झाले.[१००] हिरण्यकश्यपू या दैत्याचा पुत्र प्रल्हाद हा हरिचा भक्त होता. वडिलांनी समजावूनही त्याची भगवान हरिची भक्ती कमी झाली नाही. त्यामुळे हिरण्यकश्यपू या दैत्याने आपला पुत्र प्रल्हाद यास रागात विचारले की, तुझा भगवान कुठे आहे ? प्रल्हादने उत्तर दिले की भगवान सर्वत्र आहे. एवढेच नाही तर ते समोरच्या स्तंभातही आहेत. हिरण्यकश्यपूने त्या स्तंभावर आघात करताच त्यातून भगवान विचित्र रुप धारण करुन प्रकट झाले. ते रुप पूर्णपणे

सिंहाचेही नव्हते आणि पूर्णपणे मनुष्याचेही नव्हते. या नृसिंह रुपात भगवानने हिरण्यकश्यपू या दैत्यास आपल्या जांघावर घेऊन त्याचे उदर विदीर्ण केले आणि त्यास ठार केले. भारतात गुप्तकाळात नृसिंह अवताराच्या मूर्ती बनविण्यास प्रारंभ झाला. नृसिंहाची प्राचीन मूर्ती बसाढ येथे मिळालेल्या मुद्रेवर पाहावयास मिळते.[१०१] त्यामध्ये वरचा भाग सिंहाचा आणि खालचा भाग मानवाचा आहे. नांदेड या ठिकाणी प्राचीन नृसिंहाचे मंदिर गोदावरी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर होते. आज हे मंदिर नामशेष झालेले आढळते. या मंदिराचे काही अवशेष होळी भागात नृसिंह गल्लीत पाहावयास मिळतात. या मंदिरात केवल नृसिंहाची मूर्ती होती. ही मूर्ती आनंदीदास लक्ष्मीकांत देशमुख यांच्या वाड्यात आहे. ही मूर्ती गोदावरी नदीच्या पात्रात मिळाली. केवल नृसिंहाची ही मूर्ती द्विभुज व आसनस्थ असून १२२ सें.मी. उंचीची आहे. नृसिंहाने डाव्या पायाची मांडी घातलेली आहे, तर उजवा पाय पंजावर टेकवून मांडी वर उचलेली आहे. या मांडीखाली १५ सें.मी. उंचीची प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंहाचा डावा हात गुडघ्यावर टेकलेला आहे तर उजवा हातही गुडघ्यावर टेकलेला असून त्या हातात चक्र आहे, मनगटात कडे आणि दंडात बाजूबंद आहेत. नृसिंह द्विभूज असून ते ७.५ सें.मी. उंचीच्या आणि १२० सें.मी. लांब व ६० सें.मी. रुंदीच्या आसनावर आसनस्थ झालेले आहेत. आसनावर कमळ कोरले असून त्याखालच्या सिंहासनावर हत्ती कोरलेला आहे. ही मूर्ती वाकाटक कालीन आहे.

## बोधिसत्व पद्मपाणि :

नांदेड जिल्ह्यात मानसपुरी आणि कंधार येथे वाकाटककालीन बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराच्या सुंदर मूर्ती मिळाल्या. इसवी सनाच्या पहिल्या शतकात कुषाण काळात बुध्दाच्या प्रथमच मूर्ती बनविल्या गेल्या. यामध्ये महायान संप्रदायाचे योगदान महत्वाचे ठरते. या संप्रदायात बुध्दापेक्षा बोधिसत्वाला अधिक महत्व आहे. याच बोधिसत्वाचा आदर्श महायानचा प्रमुख आदर्श होता. त्यामुळेच सर्वप्रथम बनविण्यात आलेल्या प्रतिमा बोधिसत्वाच्याच आहेत. अशाप्रकारे बुध्दाची प्रथम मूर्ती बोधिसत्व या नावाखाली प्रथम घडविण्यात आली. बोधिसत्वाचे पुढील तीन अर्थ आहेत.[१०२]

१) बोधि प्राप्त करण्याची इच्छा असणारा व्यक्ती.

२) ज्याचा विचार अथवा इच्छा, परमज्ञानावर केंद्रीत झालेली आहे असा व्यक्ती.

३) भावी बुध्द.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मानसपुरी येथे बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची एक खंडीत मूर्ती मिळाली.[१०३] ही मूर्ती तेथील मारुती मंदिराजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या बुडाला ठेवण्यात आली होती. या मूर्तीच्या कमरेच्या वरचा भाग मिळाला. या मूर्तीचे मस्तकही खंडीत झालेले आहे. बोधिसत्वाच्या हातात पद्म आहे. या मूर्तीचा खालचा भाग येथेच भीमनगर वसाहतीत मरीआईच्या ओटयावर आढळून आला. प्राप्त अवशेषांवरुन या मूर्तीची उंची १०५ सें.मी. आणि जाडी ३० सें.मी. असावी. कंधार तालुक्यात बहाद्दरपुरा येथील गणेश मंदिरात बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची सुंदर प्रतिमा आहे. १८० सें.मी. उंचीच्या ६० सें.मी. रुंदीच्या आणि ६० सें.मी. जाडी असलेल्या मोठ्या शिळेवर बोधिसत्व पद्मपाणिचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प स्थानक स्थितीत असून त्याची उंची १५० सें.मी. आहे. पद्मपाणिच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात मन्याची माळ, दंडात बाजूबंद, कमरेवर मेखला आणि हातात कंगण आहे. उजवा हात अभयमुद्रेत असून त्याच हातात कमळाचे फुल ( पद्म ) आहे. डावा हात वरदमुद्रेत आहे. मुकूटावर ध्यानी बुध्द अमिताभचे अंकन केले आहे. तर उजव्या बाजूस अमोघसिध्दिची १२० सें.मी. उंचीची स्थानक प्रतिमा आहे. पद्मपाणिच्या मुकुटाच्या वरील बाजूस धम्मचक्र प्रवचन मुद्रा आहे.

## ५.४ चित्रकला :

चित्रकला या शब्दांचा विग्रह चित्र + कला असा होतो. चित्र म्हणजे एका ठरवून घेतलेल्या जागेत रेषा, आकार व रंग या तीन घटकांची केलेली सुसंवादी रचना किंवा आकृती होय. महाराष्ट्र शब्दकोशात चित्र काढण्याच्या कौशल्याला चित्रकला म्हटले आहे. मानवी जीवनात चित्राला महत्व आहे. मानवाने प्राचीन काळापासून चित्र काढून आपल्या भावना व्यक्त केलेल्या दिसतात. शं.गो. तुळपुळे यांच्या मते प्राचीन महाराष्ट्रीयन लोकांना चित्रकलेचे आकर्षण नव्हते. म्हणून चित्रकलेच्या दृष्टीने वाखाणण्यासारखे महाराष्ट्रात काहीच नाही. अजिंठयाची भिंती चित्रे

बौध्द धर्मीय पण अन्य प्रांतीयांनीच निर्मिली असावीत.[१०४] अशाच प्रकारचे मत प्राचीन चित्रकलेच्या वारशा संदर्भात द.बा. डिकसळकर यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते महाराष्ट्रातील चित्रकलेला २००० वर्षाची परंपरा आहे.[१०५] परंतु ही मते योग्य वाटत नाहीत. कारण भारतात व महाराष्ट्रात अश्यमयुगपासून चित्रकलेचा वारसा सातत्याने चालत आला आहे.

इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांच्या मते आपल्या प्राथमिक प्रागैतिहासिक काळातील पूर्वजांनी कोरीव व रंगीत चित्रे विचार प्रदर्शनार्थ काढली असावीत.[१०६] आपल्या भावना मुखाद्वारे व्यक्त करण्यासाठी समोरचा माणूस हजर असावा लागतो. अगदी प्राथमिक अवस्थेतील मानवाला लेखनकला अवगत नव्हती. म्हणून तो ज्या स्थळी (डोंगर, कपारी, गुहा) राहत असे. तेथील भिंतीसदृश्य खडकावर किंवा प्राण्यांच्या हाडांवर रेखाचित्र कोरित व त्या चित्राद्वारे आपल्या भावना इतरांपर्यंत कधी काळी पोहोचतील अशी आशा बाळगत असे. जेथे भाषेने संपूर्ण भावना कळविता येत नसे. तेथे उपस्थित मनुष्याला काठीने किंवा बोटाने जमिनीवर, पाने, भूर्जपत्रे इत्यादीवर रंगचित्रे काढून तो आपले मनोगत स्पष्ट करीत असे.

महाराष्ट्रातील मराठवाडयातील वाकाटक कालखंडात चित्रकला प्रगत अवस्थेत आढळते. अजिंठयाची चित्रकला पाहिल्यानंतर माणूस आश्चर्याने थक्क होतो. त्या काळात आधुनिक विद्युत प्रकाश योजने सारखी सुविधा नसताना चित्रकारांनी इतकी उत्तम चित्रे लेण्यातील अंधारात कशी काढली असतील. येथील चित्रकार प्रगल्भ, संवेदनशील, सूक्ष्मरेखाविशारद, उच्च दर्जाचे असावेत. मराठवाडयातील चित्रकला शुध्द स्वरुपात अजिंठयाच्या लेण्यात पहावयास मिळते. आधुनिक काळात चित्रकलेच्या प्रांतात उल्लेखिले जाणारे रेखांकन, स्मरणचित्र, कल्पना चित्र, वस्तूचित्र, संकल्प चित्र आदी सर्व घटक अजिंठयाच्या चित्रात पहावयास मिळतात.

वाकाटक काळात मराठवाडयात अजिंठा लेण्यामध्येच चित्रकाम करण्यात आले.ही चित्रकला जगप्रसिध्द आहे. अजिंठा येथील चित्रकाम दोन टप्प्यात पूर्ण झाले आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पैठणच्या सातवाहनांच्या काळात लेणी क्रमांक ९ व १० मध्ये चित्रकाम करण्यात आले. चित्रकामाचा हा पहिला टप्पा ठरतो. इसवी सनाच्या पाचव्या शतकात गुप्त व वाकाटक काळात लेणी क्रमांक १, २,१६ व १७ मध्ये चित्रकाम करण्यात आले. चित्रकामाचा हा दुसरा टप्पा

ठरतो. चित्रांत हरीण, हत्ती, फळे, फुले, यक्ष, गंधर्व, अप्सरा, बुध्द, मनुष्य व स्त्रियांची चित्रे आढळतात. चित्रांतील नायक, नायिका, देव, गंधर्व व अप्सरा अशा व्यक्ती आकाराने मोठ्या दाखविल्या आहेत.

चित्रकारांचे चित्रकाम करण्याचे तंत्र व शैली विशेष उल्लेखनीय आहे. ज्या ठिकाणी चित्रकाम करावयाचे आहे तेथील भिंत छन्नीने तासून सपाट बनवीत असत. या सपाट भिंतीवर चिखलाचा लेप देत असत. हा लेप पक्का होण्यासाठी त्यामध्ये गाईचे शेण, कडबा, गवत, भुसा आणि तांदळाचा कोंडा मिसळत असत. भिंतीवर कापड किंवा गोणपाट पसरत. हा लेप घोटून घेटून गुळगुळीत करीत आणि तो ओलसर असतानाच चुन्याचे पाणी व लिंबाच्या रसाचे मिश्रण तयार करुन त्यावर लावत असत. या पांढऱ्या रंगावर चित्र काढले जाई. चित्राची बाह्यरेषा ठळक व स्पष्ट पध्दतीची होती. त्यासाठी तांबूस व विटकरी रंगाचा वापर करीत असते. चित्राचा पुर्ण आराखडा झ ाल्यावरच रंगभरणी केली जाई. चित्र रंगविण्यासाठी जलरंगाचा वापर केला जाई. टिकाऊपणा आणण्यासाठी रंगामध्ये डिंक मिसळत असत. चित्र काढणे पूर्ण होईपर्यंत गिलावा ओलसर राहील याची दक्षता घेण्यात येत असे. अचूक रेखांकन व जलद रंगकामासाठी अजिंठ्याचे चित्रकार प्रसिध्द होते. चित्रकामासाठी लाल, हिरवा, निळा, पिवळा, पांढरा व विटकरी रंगाचा वापर करण्यात येत असे.

बेल, भोकर आदी फळांमधील गर, विविध झाडांच्या सालींचा द्रव करुन रंग तयार करण्याची जी पध्दत आहे. तिला पालीमर म्हणतात. याच पालीमर पध्दतीद्वारे अजिंठा लेण्यातील सर्व चित्रे रंगविण्यात आली आहे. चित्रांमध्ये उंचवटा, खोलगट भाग दाखविण्याचे अत्यंत अवघड असे तंत्र अतिशय कल्पकतेने वापरुन महान म्हटल्या जाणाऱ्या चित्रकारांचे डोकेही चक्रावून टाकले आहे.

अजिंठा येथील चित्रांचे विषय बौध्द - धर्मीय होते. त्या ठिकाणी भगवान गौतम बुध्दाच्या जीवनातील प्रसंग आणि जातक कथावर आधारीत चित्रे काढली आहेत. जातक हा शब्द पुनर्जन्म या अर्थाने वापरला आहे. गौतम बुध्दाने का जन्म घेतला, या जातकांची म्हणजे त्यांच्या जन्माच्या कथांची संख्या ५५० आहे. त्यामुळेच बौध्द साहित्यात जातक कथांना महत्व आहे. गौतम बुध्दाच्या

पुनर्जन्माच्या अनेक प्रकारच्या कथा अजिंठा लेण्यात चित्रित केल्या आहेत. याशिवाय हरीण, हत्ती, बैल, नाग, यक्ष, अप्सरा, गंधर्व आणि स्त्री पुरुषांची चित्रेही अजिंठा या ठिकाणी पाहावयास मिळतात. लेणीतील स्तंभ, भिंती आणि छतावर चित्रकाम केलेले आहे. ही चित्रकला जग प्रसिध्द आहे. अजिंठा येथील सर्व चित्रकाम कथानात्मक बोधप्रद असे आहे. स्त्री - पुरुषांची चित्रे शरीरशास्त्रास धरुन अचूक काढली आहेत.

**अजिंठा येथील चित्रकलेचा परिचय :**

**लेणी क्रमांक १**

**१) शिबी जातकाचे चित्रण :**

लेणीत प्रवेश केल्यावर डाव्या बाजूच्या भिंतीवर शिबी जातकाचे चित्र दिसते.[१०७] शिबी या राजाने कबुतर या पक्षाला अभय दिले आहे. शिकाऱ्यापासून राजाने कबुतराचे रक्षण केले, तेव्हा कबुतर राजाला म्हणते की, आपण मला अभयदान देऊन शिकाऱ्याला उपाशी मारत आहात. याचवेळी राजाने कबुतराच्या वजनाइतकेच आपल्या शरीराचे मांस कापून शिकाऱ्याला दिले ; पण त्याने ज्या कबुतराला अभयदान दिले होते, त्यास मुक्तच राहू दिले. या काल्पनिक चित्रात तराजू आणि शिबिपुत्र दाखविले आहेत.

**२) कृशकाय सुंदरीचे चित्रः**

कृशकाय सुंदरी ही बिछान्यावर झोपलेली आहे आणि तिच्या मैत्रिणी तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दुसऱ्या दृश्यात राजदरबारातील स्त्रिया बसलेल्या आहेत आणि दारात एक भिक्खू उभा आहे. हे दृश्य बुध्दाची स्वतःची कहाणी आहे. जेव्हा बुध्द स्वतःच्या राजदरबारात भिक्षा मागण्यासाठी गेले, तेव्हाचे हे दृश्य असावे ;

**३) शंखपाल जातक कथेचे चित्रण :**

या लेणी क्र. १ मध्ये शंखपाल जातक कथा आहे.[१०८] शंखपाल जातक चित्रणाची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्वाचा जन्म मगध नरेशाच्या वंशात झाला. जेव्हा तो तरुण वयात आला तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याच्यावर राज्यकारभार सोपवून संन्यास घेतला. बोधिसत्व आपल्या

वडिलांना भेटण्यासाठी प्रारंभी वनात जात होते. त्यांच्या वडिलांचे प्रवचन ऐकण्यासाठी प्रारंभी नागलोकाचे राजे वनात जात होते.

**४) नंदाला धर्मदीक्षा दिल्याचे चित्र :**

गौतम बुध्दाने आपला भाऊ नंद यास धर्मदीक्षा दिल्याचे एक चित्र आहे. नंदाला भिक्खू केले आहे. हे पाहून नंदाची पत्नी सुंदरी ही विरहामुळे बेशुध्द होऊन पडली आहे. लेणीच्या बाहेरील भिंतीवर मारा चे चित्र आहे, जो प्रेमदेवता आहे. तो बुध्दाला रोखून ठेवत आहे. तो त्यास तपस्या न करण्यास सांगत आहे असा भास होतो. एका दुसऱ्या चित्रात बुध्दाच्या अनेक मुद्रा दर्शविल्या आहेत.

**५) बोधिसत्व पद्मपाणि :**

मुख्य मंडपाच्या पाठीमागील भिंतीवर डाव्या बाजूस जगप्रसिध्द बोधिसत्व पद्मपाणि चे सुंदर चित्र आहे. त्याच्या डोक्यावर मुकूट असून चेहऱ्यावर प्रसन्न हावभाव आहेत. त्याच्या हातातील कमळाचे फूल शांती आणि पवित्रतेची निशाणी आहे. त्याचे खांदे रुंद व भरदार आहेत. त्याचे शरीर खांद्यापासून खाली निमूळते होत गेलेले आहे. त्याच्या उभे राहण्यातला डौल खुबीने टिपला आहे. तो सरळसोट उभा राहिल्यामुळे त्याच्यातील ताठरपणा आणि दुर्बलताही दिसत नाही. त्याचा मुकूट व अंगाखांद्यावर असलेले मोजके अलंकार खूलून दिसतात. तो वरुन खाली पाहत आहे. डोळ्यात करुणभाव दिसते. गळ्यात मोत्याची माळ आहे. या मोत्याच्या माळेत मध्यभागी निळा मोती आहे. बोधिसत्वांच्या डाव्या बाजूला त्याची पत्नी राजकुमारीचे चित्र आहे. तिच्या चेहऱ्यावर शांतिभाव आहे. तिच्या हातातसुध्दा कमळाचे फूल आहे. ती निराशेने उभी आहे. डोंगरावर माकड, मोर, गंधर्व, किन्नर आणि अन्य प्राण्यांची चित्रे आहेत. बोधिसत्व पद्मपाणिचे चित्र म्हणजे कलेचा अत्युच्य अविष्कार आहे.[१०९]

**६) मारविजयचे दृश्य :**

लेणीच्या अंतराळातील डाव्या भिंतीवर मारविजयचे दृश्य चित्रित केले आहे. गौतम बुध्द भूमीला स्पर्श करुन भूदेवीला साक्षीच्या रुपाने बोलावित आहेत. ते बोधिवृक्षाखाली ध्यानमग्न झाले आहेत. त्यांच्या चारही बाजूस मारचे सैन्य आहे. एक ठेंगू राक्षस आपले डोळे वटारुन बुध्दाला भेडसाविण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरा एक मनुष्य बुध्दावर तलवारीचा वार करु इच्छित आहे.

दुसऱ्या बाजूनं सशस्त्र समूह बुध्दावर हल्ला करण्यासाठी चालून येत आहे. खाली एका कोपऱ्यात हिरव्या रंगाचा राक्षस दाखविला असून जवळच एक दानव आहे. त्याच्या तोंडातून साप निघत आहे. उजव्या बाजूस खाली वस्त्र व अलंकाराने सुसज्ज असलेला मार दाखविला आहे. तो बुध्दाला त्याच्या दृढ निश्चयापासून दूर करण्यात अपयशी झाल्याने निराश झालेला आहे. बुध्दाच्या जवळच माराच्या कन्या असून त्या बुध्दाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचे कोमल शरीर व कामुकतापूर्ण डोळे आणि चेहऱ्यावरील हावभाव रेखाटण्यात कलाकार यशस्वी झ- ालेला आहे ; पण मार आणि त्याच्या कन्या बुध्दाला तपस्येपासून दूर करु शकल्या नाहीत.

**७) श्रावस्तीच्या चमत्काराचे चित्रण :**

अंतराळाच्या डाव्या भिंतीवर श्रावस्तीच्या चमत्काराचे दृश्य चित्रित केले आहे. गौतम बुध्दाचा जादूटोण्यास विरोध होता ; परंतु काही लोकांना जोपर्यंत चमत्कार पाहावयास मिळणार नव्हता, तोपर्यंत ते कोणत्याही व्यक्तीची महता मानत नव्हते. श्रावस्ती येथे बुध्दाला अशाच सहा संन्याशांपूढे काही चमत्कार दाखविण्यासाठी विवश व्हावे लागले. त्यांनी स्वत:ला विभिन्न रुप आणि मुद्रेत एकाच वेळी दाखविले. त्याचेच दृश्य या ठिकाणी चित्रित केले आहे. या दृश्यालाच श्रावस्तीचा चमत्कार या नावाने ओळखले जाते. अंजिठा लेणीमधील आढळणारे श्रावस्तीच्या चमत्काराचे चित्र अतिशय सुंदर चित्रीत केलेले आहे.

**८) बोधिसत्व वज्रपाणी व काळी राणी :**

अंतराळातील उजव्या बाजूस पाठीमागील दालनाच्या भिंतीवर बोधिसत्व वज्रपाणीचे चित्र आहे. बोधिसत्वाचा मुकूट अत्यंत सुंदर आहे. बोधिसत्व वज्रपाणीच्या उजव्या बाजूस एक राजा थाळीमध्ये पुष्प घेऊन बोधिसत्वाकडे येत आहे. खालच्या बाजूला दोन स्त्रियांची चित्रे आहेत, त्यामध्ये एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला पुष्प अर्पण करीत आहे. ज्या स्त्रीला पुष्प अर्पण केले जात आहे ती स्त्री काळी राजकुमारी या नावाने प्रसिध्द आहे. तिची शरीररचना आणि डोळ्याची लाली पाहण्यासारखी आहे. तिच्या शरीरावर फक्त आभूषणे दिसतात. बाकी ती नग्नावस्थेत आहे.

**९) चांपेय जातक कथेचे चित्र :**

अंतराळाच्या उजव्या बाजूस पाठीमागील दालनाच्या भिंतीवर चांपेय जातक कथेचे चित्रण केले आहे. आपल्या पूर्वजन्माच्या इच्छेनुसार बोधिसत्वाने नाग लोकात राजा चांपेयाच्या रुपाने जन्म घेतला. धन व ऐश्वर्याने त्याचे मन लगेच भरुन आले. त्याने दुसऱ्यांच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पण करण्याचा निश्चय केला. तो नागराजाच्या रुपाने मुंग्या असलेल्या बिळावर जाऊन झोपला. मुंग्यानी आपल्या शरीराचे मांस भक्षण करुन आपले पोट भरावे असा त्याचा त्यामागे हेतू होता ; पण घडले वेगळेच. एक नागवाला त्या ठिकाणी आला आणि त्याने नागराजाला पकडून ठिकठिकाणी नाचवून आपला उदरनिर्वाह सुरु केला. एकदा वाराणसीच्या राजासमोर नागवाला आपल्या नागराजाला नाचवीत होता. त्यावेळी बोधिसत्वाची पत्नी नागी सुमना ही बोधिसत्वाचा शोध करीत तेथे आली. तिने जेव्हा वाराणसीच्या राजाला बोधिसत्वाचा बरोबर परिचय दिला, तेव्हा त्याने तात्काळ नागवाल्याच्या ताब्यातून नागराजाची सुटका केली. यानंतर बोधिसत्वाने वाराणसीच्या राजाला नागलोकात नेले आणि तेथे त्याचा सात दिवस अतिथिसत्कार करुन धनधान्यासहित परत त्याच्या राज्यात पाठविले. या कहाणीचे चित्र पुढीलप्रमाणे केले आहे. डाव्या बाजूस वर आपल्या राजमहालात राजा चांपेय जगातील सुखाने थकून बसलेला आहे. उजवीकडे वाराणसीच्या राजाच्या दरबाराचे दृश्य आहे. नागी सुमना ही नागराजाला सोडून देण्यासाठी प्रार्थना करीत आहे. जवळच एक बालक आहे. नागी सुमना म्हणत आहे की, माझ्यासाठी नाही तर किमान या बालकावर दया करुन नागराजाला मुक्त करा. खाली डाव्या बाजूस चांपेयाचा अतिथिसत्कार स्वीकारुन वाराणसीचा राजा नागलोकात येत आहे. उजव्या बाजूस चांपेय प्रवचन करीत आहेत आणि वाराणसीचा राजा प्रवचन ऐकत आहे.

दोन्ही राजांच्या भोवती दासी व महिला आहेत.

**१०) राजदरबाराचे दृश्य :**

लेणीच्या मुख्य दरवाजातून आत गेल्यावर उजव्या बाजूकडील भिंतीवर राजदरबाराचे एक दृश्य नजरेस पडते. राजा एक उंच आसनावर बसलेला आहे आणि त्याच्याभोवती दरबारातील लोक उभे आहेत. उजव्या बाजूस विदेशी लोक आहेत. त्यापैकी काहीना दाढी आहे तर काही जणांनी

इराणी नुकीली टोपी घातलेली आहे. काही लोक मंडपाच्या बाहेर आहेत तर काही विदेशी मंडपात येत आहेत आणि काही लोक मंडपात आलेले आहेत. जे विदेशी लोक राजाजवळ दाखविले आहेत ते राजाला आदरपूर्वक भेट देत आहेत.

**११) बैलजोडीची टक्कर :**

लेणीत डाव्या बाजूस बसलेल्या एका स्तंभावर दोन बैलांच्या टकरीचे दृश्य चित्रित केले आहे. हे दोन्ही बैल सजीव वाटतात. दोन्ही बैल जोरजोराने एकमेकांना टक्कर देत आहेत. त्यांची शेपटी वर उंचावलेली आहे.[११०] टकरीमुळे त्यांच्या पायापासून जमिनीवरील धूळ उडत आहे. हे दोन्ही बैल शक्तीशाली असल्यामुळे त्यांच्यापैकी कोणीही जिंकला नाही आणि कोणीही हरलेला नाही. एकमेकांवर धावणाऱ्या या दोन्ही बैलांच्या नसानसातून रक्त ओसंडत आहे. या लेणीच्या छतावरही पक्षी, फुले व फळांची चित्रे आहेत. त्यामध्ये पुष्प, पशू आणि मदिरा पीत असलेले दृश्यसुध्दा विभिन्न आयाताकारामध्ये चित्रित केले आहे. काही विदेशी मदिरापान करीत असल्याचे चित्र आहे. हे चित्र इराणचा राजा खुसरो द्वितीय आणि त्याची सुंदर पत्नी शीरीन यांचे असावे.

**१२) नागराज व शिकारीचे दृश्य :**

रस्त्याच्या कडेला एक नागराज एकांतात पडले होते. काही शिकारी शिकार मिळाली नाही, म्हणून नाराज होऊन परत चालले होते. तेवढ्यात त्यांनी नागराजाला पाहिले आणि ते त्यास शिकार आहे असे समजून ओढू लागले. शिकारी लोकांची - वेशभूषा विविध प्रकारची आहे. अलार नामक व्यापाऱ्याने बैलगाडीने जाताना हे पाहिल्यावर त्यास नागाराजाची दया आली आणि त्याने शिकाऱ्यांना खूप धन देऊन नागराजावरील संकट दूर केले याचे चित्रण येथे केलेले आहे. ही शंखपाल जातकाची कथा आहे. याच लेणीत एका स्त्रीचे सुंदर व आकर्षक चित्र आहे. स्त्रीच्या केवळ पार्श्वभागाचेच दर्शन होते. तिची बसण्याची शैली अशी आहे की ती आपल्याकडे पाहात तर नाही, पण आपणाबरोबर बोलत मात्र आहे असे आश्चर्यचकीत करणारे हे चित्र आहे.

**१३) महाजन जातक कथेचे चित्रण :**

महाजन जातक कथेचे तीन विभाग होतात. पहिल्या विभागात राजदरबारात राजा खिन्न मुद्रेत बसलेला आहे. राणी त्याची समजूत घालीत आहे. समोरच नर्तिका नृत्य करीत आहेत- तिसऱ्या

विभागात ते घोड्यावर असून नगरद्धारातून निघताहेत. ताटातुटीच्या वेळेची शोकमग्नता दास व दासी दाखवीत आहेत. पश्चिमाभिमुख भिंतीवर गौतम बुध्द भिक्षापात्र हातात घेऊन बसलेले आहेत. त्यांच्यासमोर भक्तगण बसलेले आहेत. तसेच राजपुत्र स्नान करीत आहे. याच लेणीत मिथून मद्यपान - मस्त दर्शविले आहे. काळ्या राणीच्या जवळ अनेक वृध्दांची चित्रे आहेत. आखाड्यात काही जनावरे लढत आहेत. राणी अरुंधती झोका घेत असतानाचे चित्र मोहक आहे. सांडाचे चित्रही आश्चर्यचकीत करणारे आहे. सांडाकडे कोणत्याही कोनातून पाहिले तर तो आपल्यावर आक्रमण करण्यासाठी धावून येत आहे असे पाहणाऱ्यास वाटते.

## लेणी क्रमांक २ :

लेणी क्रमांक २ मधील बरीच चित्रे सुस्थितीत आहेत. बाहेरच्या दालनात व भिंतीवर भरपूर चित्रे आहेत. लेणीच्या प्रवेशद्धाराच्या डाव्या बाजूकडील दालनाच्या भिंतीवर अनेक अर्हत व किन्नर बोधिसत्वाची पूजा करण्यात मग्न आहेत. बोधिसत्वाचा मुकूट अतिशय सुंदर आहे. याच चित्रातील इंद्राचे चित्रही सुंदर आहे. छतावर फुले व मानवाची चित्रे आहेत. एका ठिकाणी इराणी व भारतीय वेशभूषेतील दोन व्यक्ती मदिरापान करीत आहेत. छतावर एका नागवाल्याचे सुंदर चित्र आहे. नागवाला गुडघे टेकून बसलेला आहे. त्याच्या बगलेत त्याचे पेटारे असून साप त्यामधून आपली तोंड बाहेर काढत आहेत. लेणीत बुध्दाची भरपूर चित्रे आहेत. गर्भगृह व अंतराळातील भिंतीवर, मंडपाच्या डाव्या भिंतीचा काही भाग आणि मंडपाच्या पाठीमागील भिंतीच्या डाव्या भागावर बुध्दाची भरपूर चित्रे आहेत. ही चित्रे विभिन्न आसन आणि मुद्रेत आहेत. गर्भगृहाच्या उजव्या बाजूस अंतराळाच्या पाठीमागील भिंतीवर एक चित्रित अभिलेख आहे. त्यावरुन बुध्दाच्या चित्रासाठी दिलेल्या दानाची माहिती होते. लेणीच्या आत डाव्या भिंतीवर बुध्दाच्या जन्माशी संबंधित चित्रे रेखाटली आहेत.

### १) महामायेच्या शयनागाराचे चित्र :

डाव्या बाजूस सर्वात खाली महामायेच्या शयनागाराचे चित्र आहे.[१११] महामाया झोपली असून जवळच दोन - तीन दासी बसलेल्या आहेत. महामायेच्या स्वप्नातील श्वेत हत्ती येथे स्पष्ट दिसत नाही. या चित्राच्या वरील दृश्यात महामाया आपले पती राजा शुध्दोदन यांना आपल्याला

पडलेले स्वप्न सांगत आहे. समोर दोन ज्योतिषी आहेत. ते स्वप्नांचा अर्थ सांगत असावेत. उजवीकडील कोपऱ्यात रत्न व अलंकाराने सजलेली एक स्त्री खांबाला टेकून उभी आहे. ती महामाया असावी. दोन्ही ज्योतिषांची दोन बोटे वर उंचावलेली आहेत. त्यावरुन ते होणारे बालक चक्रवर्ती राजा किंवा संन्याशी होईल, अशी भविष्यवाणी सांगत असावेत असे वाटते आणि ही भविष्यवाणी ऐकूण महामाया आता काय होईल यावर विचार करीत आहे. तिच्या चेहऱ्यावरील भावचित्रण रेखाटण्यात चित्रकार यशस्वी झालेला आहे.

**२) तुषित स्वर्गाचे दृश्य:**

भिक्खुगृहाच्या ( प्रकोष्ठ ) दरवाजाच्या वर तुषित स्वर्गाचे दृश्य चित्रित केले आहे. सिध्दार्थाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी त्याच्या आईचा महामायादेवीचा मृत्यू झाला होता. त्यानंतर बुध्दाने स्वर्गात जाऊन महामायेपुढे प्रवचन केले होते. सिंहासनाच्या दोनही बाजूस मकराच्या आकृती आहेत. बुध्दाचे चित्र धम्मचक्र मुद्रेत आहे. सर्वात खाली बुध्दाचा जन्म दाखविला आहे. शुक्राच्या हातात जन्मलेले बाळ आहे. सिध्दार्थ जन्मल्याबरोबर सात पावले चालले होते. उजव्या बाजूस या सात पावलांची चिन्हे दाखविली आहेत. उपवनाच्या प्रवेशद्धाराच्या बाहेर भिक्षा मागणाऱ्या लोकांचा एक समूह आहे.

**३) महाहंस जातकाचे चित्रण:**

मंडपाच्या डाव्या भिंतीवर महाहंस जातंकाचे चित्रण केले आहे.[११२] बनारसचा राजा संयम हा आपली राणी खेमा हिची प्रत्येक इच्छा पूर्ण करीत असे. एकदा राणीने स्वर्ण हंस प्रवचन करीत असल्याचे स्वप्न पाहिले. त्यामुळे तिला स्वर्ण हंसाच्या प्राप्तीची तीव्र इच्छा झाली. त्यासाठी राजाने बनारसजवळ एक तलाव खोदला, ज्यामुळे हंस हिमालय सोडून तेथे येतील आणि हंस तेथे आले की त्यांना पकडण्याचीही व्यवस्था केली गेली. स्वर्णहंसाचा प्रमुख सुमूख हा आपला राजा धित्तरथ व समूहासोबत बनारसला आला. त्याठिकाणी त्यांना पकडण्यात येऊन बनारसच्या राजापूढे उभे केले. राजाने त्यांचा आदर - सन्मान केला आणि स्वर्णहंसांनी त्याला धम्माचे शिक्षण दिले. एका ठिकाणी नागराज कन्या झोका खेळत आहे. तिचे कौमार्य, सौंदर्य व स्वप्निल डोळ्यांचे रेखाटन चांगले केले आहे. तिचे सौंदर्य पाहून यक्ष मुग्ध झाला आहे. डाव्या बाजूस वर एका चित्रसमूहात इंद्रप्रस्थ मध्ये

होणाऱ्या द्युतक्रीडेचे सुंदर चित्रण केले आहे. याठिकाणी पूर्णक व धनंजय जुगार खेळत आहेत. तसेच विधूर पंडित नागलोकात राजा व राणीस धर्माचे ( धम्माचे ) शिक्षण देत असल्याचे दाखविले आहे.

खालच्या बाजूला एक मृग ( हरीण ) एका व्यक्तीस आपल्या पाठीवर घेऊन जात आहे. या चित्रणाची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व जेव्हा स्वर्ण - मृगाच्या रुपात जन्माला आले होते तेव्हा त्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता पाण्यात बुडत असलेल्या व्यक्तीचा जीव वाचविला होता ; परंतु त्या व्यक्तीने त्यांना पकडून राजाकडे सोपविले होते. राजाने त्यांचा आदर - सन्मान केला व राणीला त्यांचे प्रवचन ऐकविले.

**४) पूर्णावदान जातकाचे चित्रण :**

विधूर पंडित जातकात जेथे अरुंधती झोका घेत असल्याचे चित्र आहे, त्याच्या खाली पूर्णावदान जातकाचे चित्रण केले आहे.[११३] पूर्ण व त्याचा भाऊ भाविल यांना त्यांच्या इतर बंधूनी वडिलांच्या संपतीचा कसलाच हिस्सा दिला नाही ; पण पूर्ण ने स्वत: व्यापाराच्या माध्यमातून बरीच संपत्ती मिळविली. नंतर तयाने बुध्दाकडून दीक्षा घेतली व सर्व संपत्ती भाविल यास देऊन टाकली. एकदा भाविल शूर्पारक या व्यापारी केंद्राकडे चालला होता. तेव्हा त्याचे जहाज वादळात अडकले. त्यावेळी त्याने पूर्ण चे स्मरण व ध्यान केले, तेव्हा पूर्ण ने भाविलंची वादळाच्या संकटातून सुटका केली. चित्रात डाव्या बाजूस बुध्द एका भक्तास आशीर्वाद देत असतांना दाखविले आहेत. हा भक्त पूर्ण असावा. त्यानंतर वादळात फसलेल्या जहाजाचे चित्र आहे. वरच्या बाजूस बुध्द एका समूहापूढे प्रवचन देत असल्याचे दाखवले आहे.

**५) शांतिवादिन जातकाचे चित्रण:**

याच लेणीत शांतिवादिन जातक कथेचे चित्रण केले आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व संन्याशाच्या रुपाने जन्माला आले. त्यांच्या प्रवचनात शांती व धैर्यास मोठे महत्व दिले जात होते. त्यामुळे ते शांतिवादिन या नावाने प्रसिध्द झाले. एकदा तेथील राजा आपली राणी व नर्तकीच्या बरोबर ज्या वनात शांतिवादिन प्रवचन करीत असत त्या वनात आले. तेथे राजाला झोप लागली व तो त्याच ठिकाणी झोपला. इकडे राणी व नर्तकी फिरत फिरत ज्या ठिकाणी संन्यासी प्रवचन करीत होते तेथे आल्या. राजाला जेव्हा जाग आली तेव्हा आपल्याला एकटा पाहून त्यास

इतका राग आला की त्याने बोधिसत्व व नर्तकीचा वध करण्याचा आदेश दिला. चित्रात राजाच्या हातात तलवार आहे. नर्तकीचे रेखाटन अतिशय सुंदर आहे. हे चित्र अजिंठा येथील सर्वश्रेष्ठ चित्रांपैकी एक आहे. नर्तकी राजाची क्षमा मागत असून ती जीवदान देण्याची भीक मागत आहे. लेणीच्या छतावर करण्यात आलेले नक्षीकाम अत्यंत सुंदर आहे.

## लेणी क्रमांक १६ :

### १) हस्ति-जातक कथेचे चित्रण:

समोरच्या वीथीमध्ये दरवाजांच्या डाव्या बाजूस हस्ति जातक कथेचे चित्रण केले आहे.[११४] त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्वाने हत्तीच्या रुपात जन्म घेतला.एके दिवशी त्याने वनात गोंधळाचा आवाज ऐकला व तेथे जाऊन पाहिले तर तेथे राजाने वनात सातशे लोकांना निर्वासित केल्याचे दिसले. हे सर्व लोक उपाशी होते. वनात त्यांना खाण्यासाठी काही नव्हते ; म्हणून बोधिसत्वाने आपले जीवन समाप्त करुन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने सर्व लोकांना पहाडाच्या पायथ्याशी जाण्यास सांगितले. त्या ठिकाणी एक मृत हत्ती पडलेला आहे आणि त्याचे मांस खाऊन आपली भूक भागवावी असेही त्यांनी त्यांना सांगितले. यानंतर बोधिसत्व पहाडाच्या शिखरावर गेले व तेथून त्यांनी खाली उडी मारुन आपले जीवन संपविले. चित्रात डाव्या बाजूस अग्नीजवळ काही माणसे बसलेली आहेत. त्यापैकी दोन व्यक्ती सुरीने मांस कापत आहेत. त्यांच्या समोरच मृत हत्ती पडला आहे. दुसरी व्यक्ती अग्नीत मांस भाजत असल्याचे दाखविले आहे.

### २) महाउमग्ग जातक कथेचे चित्रण:

वीथीच्या डाव्या बाजूकडील भिंतीवर महाउमग्ग जातकाचे चित्रण आहे. डाव्या वीथीमध्ये सौदरानंद ची कहाणी चित्रित आहे. या वीथीच्या भिंतीवर मृण्मयी राजकुमारीचे चित्र आहे. डावीकडे पहिल्या दृश्यात दोन व्यक्ती उभ्या आहेत. त्यामधील एकीच्या हातात मुकूट आहे, तर दुसरी व्यक्ती राजकुमारीस काहीतरी सांगत आहे. एक दासी राजकुमारीला वारा घालत आहे. राजकुमारी आसनावर पडलेली असून पाठीमागून एक दासी तिला आधार देत आहे. दासीने आपले केश पाठीमागे बांधले आहेत. राजकुमारी अशक्त दाखविली असून तिचा चेहरा निस्तेज आहे. ती

बेशुध्दावस्थेत असून एका दुसऱ्या दासीने आपला एक हात राजकुमारीवर ठेवला आहे तर दुसऱ्या हाताने ती तिचा हात हातात घेऊन नाडी पाहत आहे. विरहाने त्रस्त झालेल्या राजकुमारीचे
चित्र आहे.

**३) सौदरानंद नाटकाच्या कथेचे चित्रण:**

सौदरानंद या नाटकाची रचना अश्वघोष यांनी केली. या नाटकाची कथा या ठिकाणी चित्रित केली आहे. नंदाला शुध्दोदनानंतर कपिलवस्तूचे राज्य मिळणार होते. एकदा बुध्द स्वत: कपिलवस्तूमध्ये भिक्षा मागण्यासाठी आले, तेव्हा नंद बुध्दाला भिक्षा देण्यासाठी आपल्या नवविवाहीत पत्नीपासून उठून बाहेर आले, पण बुध्दाने भिक्षा घेतली नाही. यानंतर नंद बुध्दाच्या मागे त्यांच्या निवासापर्यंत चालत आले. त्या ठिकाणी नंदाचे केस मुंडण करुन त्यांना बौध्द बनविण्यात आले. नंद संघात फार दु:खी राहत असे. आपल्या नवविवाहीत पत्नीच्या आकर्षणामुळे नंद दु:खी राहतो, हे बुध्दाला समजले, तेव्हा त्यांनी नंदाला स्वर्गात नेले व त्यास अप्सरांचे दर्शन घडविले. [११५] तेव्हा नंदाचा भ्रम दूर झाला. सौदरानंद नाटकाचे दृश्य डाव्या विथीच्या भिंतीवर चित्रित केले आहे. श्वेत वस्त्र परिधान केलेले व भिक्षापात्र हातात घेतलेले बुध्द सर्वप्रथम दाखविले आहेत. त्यांच्यासमोर एक घोडा व नोकर आहे. त्यांच्यापुढे पुन्हा बुध्दाला दाखविले असून त्यांच्याजवळ एक स्त्री व एक बालक आहे. ते राहूल आणि यशोधरा आहेत. बुध्द कपिलवस्तू येथे परत आल्याचे दाखविण्यासाठी हे दृश्य दाखविले आहे. या दृश्याच्या पुढे दुसऱ्या व तिसऱ्या भिक्खूगृहाच्या वर नंद संघात प्रवेश करीत असल्याचे चित्र आहे. नंतर तो जमिनीवर बसला असून पाठीमागून न्हावी त्याचे केस कापत आहे. दोन भिक्खू हे दृश्य ध्यानपूर्वक पाहत आहेत. पुन्हा मंडपात एक दु:खी भिक्खू दिसतो. तो नंद असावा. डाव्या बाजूस बुध्द एका भिक्खूसोबत हवेत उडत असल्याचे चित्र आहे. बुध्द नंदाला स्वर्गात घेऊन जात असल्याचे हे दृश्य आहे.

तिसऱ्या भिक्खूगृहाच्या वर दोन कोनाड्यांत बुध्दाच्या बसलेल्या अवस्थेतील मनुष्य आहे. खालच्या कोनाड्यात चार व वरच्या कोनाड्यात सात - आठ आकृती असून आकृतीच्या डोक्याच्या मागे प्रभामंडळ आहे आणि त्याच्या पाठीमागे कपड्याच्या गादीचे नमुना आहेत. हे चित्र इसवी सनाच्या आठव्या शतकातील असावे. चौथ्या

भिक्खूगृहाच्या उजवीकडे उडत असलेल्या आकृती आहेत. त्यांचे चित्रण केवळ काळ्या व पांढऱ्या रंगाने केले आहे. आकृतीच्या हातात पाने - फूले असल्यामुळे ते बुध्दाच्या पूजेसाठी जात असावेत असे वाटते. या चित्राच्या खाली एका अलंकृत सिंहासनावर बुध्द बसले आहेत. त्यांचे हात धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेत असून त्यांच्या दोन्ही बाजूस एक पुरुष व एक स्त्री उभी आहे.

**४) सुजाताचे चित्रः**

लेणीच्या पाठीमागील भिंतीवर बुध्द प्रवचन करीत असल्याचे चित्र आहे. जवळच हत्तीसहित एक मिरवणूक निघाली आहे. बुध्दाला भेटण्यासाठी जात असलेल्या अजातशत्रूची ही मिरवणूक असावी. लेणीच्या डाव्या वीथीच्या भिंतीवर बुध्दाच्या जीवनासंबंधी काही चित्रे आहेत. डाव्या बाजूस सर्वात वर सुजाता बुध्दाला खीर वाढत असल्याचे चित्र आहे[११६] सुजाता दोन्ही हाताने धरलेल्या भांड्याने बुध्दाच्या भिक्षापात्रात काही तरी घालत आहे. उजव्या बाजूस सुजाता अग्नीवर खीर बनवीत असल्याचे दाखविले आहे. तिच्या पाठीमागे चार गाई दाखविल्या असून त्यापैकी तीन गाई बसलेल्या आहेत व एक गाय उभी आहे. त्याच्यापूढे वृध्द बसलेले असून त्यांच्या दोन्ही बाजूस तपस्यु आणि मल्लिक या व्यक्ती आहेत. हे दोन व्यापारी बंधू ओरिसाचे राहणारे होते आणि बुध्दत्व प्राप्तीनंतर सर्वप्रथम त्यांनीच बुध्दाला खाद्यपदार्थ अर्पण केले होते. या चित्रांच्या खाली बुध्दाच्या जीवनातील काही चित्रे आहेत. बिंबिसार बुध्दाजवळ येत असल्याचे एक चित्र आहे. दृश्यात बिंबिसारच्या जुलूस दाखविला आहे. या चित्राच्या उजव्या बाजूस सिध्दार्थ बालपणातच समाधिस्थ झाल्याचे दृश्य दाखविले आहे. सिध्दार्थ शेती करण्याच्या हंगामाच्या वेळी आपल्या आई वडिलांसमवेत बाहेरगावी गेले होते. चित्रात नांगर व बैल दाखिवले आहेत. त्या ठिकाणी एका वृक्षाखाली बालवयातच ते समाधिस्थ झाले होते. वृक्षाची सावली जेथे होती ती तेथेच थांबलेली होती हे या चित्राद्धारे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

**५) शुध्दोदन व महामायादेवीचे चित्रः**

वरील चित्राच्या डावीकडे शुध्दोदन आणि महामायादेवीचे चित्र आहे.[११७] जवळच महामायेच्या स्वप्नांचे दृश्य आहे. राजा व राणीच्या चित्राच्या खाली त्या चार प्रसिध्द चित्रांचे अंकन केले आहे ज्यास पाहिल्यानंतर सिध्दार्थाने संन्यास ग्रहण केला होता. राजा-राणी सिध्दार्थाच्या या

दु:खद गोष्टीचा विचार करीत आहे. महामायेच्या या स्वप्नदृश्याच्या पार्श्वभूमीवर हत्तीचे दोन दात अंकित केले आहेत. महामाया बिछान्यावर झोपलेली असून तिच्या पायाजवळ एक तक्कया आहे. तिच्याजवळ दोन दासी आहेत.

त्या सुध्दा झोपलेल्या आहेत. डाव्या बाजूस एक वृत्ताकार बारहदरीमध्ये राजा व राणी दास आणि दासीसमवेत दाखविले आहेत. राणी -राजाला कांहीतरी सांगत आहे आणि राजा ते ध्यान देऊन ऐकत आहे. हे दृश्य महामाया शुध्दोदनाला आपल्याला पडलेले स्वप्त पडल्याचे सांगत आहे. पहिल्या व दुसऱ्या भिक्कू गृहाच्यामधील भिंतीवर बुध्दाच्या बाल जिवनातील दृश्ये चित्रीत केली आहेत. या लेणीत मगरीचेही सुंदर चित्र आहे.

**लेणी क्र. १७**

या लेणीतील चित्रे सर्वाधिक सुरक्षित राहिली आहेत. प्रवेशद्धाराच्या डाव्या भिंतीवरील चित्रे नष्ट झाली आहेत. पण काही चित्रे ओळखू येतात. तेथे गंधर्वाची उडती चित्रे आहेत. विना वाजवीत असलेल्याही काही आकृती आहेत. गायकाचे चित्र आहे. दरवाजाच्या चौकटीवर दांपत्याची सुंदर चित्रे आहेत. पक्षांची चित्रे आहेत. बाहेरच्या दालनात प्रवेशद्धाराच्या बाजूकडील भिंतीवर डाव्या बाजूस एका मंडपात राजा -राणी मध्यपान करीत आहेत. त्यानंतर ते दांपत्य विचारमग्न अवस्थेत नगरद्धाराच्या उजवीकडे बोधिसत्वाच्या बरोबर एक मंजिरा वाजवीत असलेली अप्सरा अतिशय सुंदर आहे.

**१) नालागिरी दमनचे चित्रण :**

दालनाच्या भिंतीच्या सर्वात उजवीकडे नालागिरी दमनचे दृश्य चित्रित केले आहे.[११८] बुध्द स्वत: चमत्काराच्या विरोधी होते. पण तरीही त्यांनी आपल्या जिवनात आठ चमत्कार दाखवावे लागले. नालागिरी दमन हा त्यापैकीच एक चमत्कार आहे. बुदाचा भाऊ देवदत्त ने बुध्दाला ठार मारण्याचा प्रयत्न अनेकवेळा केला होता. एकदा बुध्द राजगृहात होते. तेव्हा देवदत्ताने अजातशत्रूच्या मदतीने एक षडयंत्र रचले व बुध्दाला मारण्यासाठी एक पागल हत्ती - नालागिरीस सोडला. या हत्तीने रस्त्यावर अनेक निरपराध लोकांना ठार केले. अशावेळी बुध्दाने पळून जावे असे त्यांच्या शिष्यांनी सांगितले. पण बुध्द पळून न जाता हत्तीसमोर गेले. तेव्हा हत्तीने शरण येऊन बुध्दाच्या

चरणांना स्पर्श केला. बुध्दाने आपला हात त्याच्या मस्तकावर ठेवला. चित्रात राजगृहाची सडक आणि त्याच्या कडेला घरे दाखविली आहेत. भीतीने त्रस्त झालेले नागरिक आणि संतापलेले अजातशत्रु व देवदत्तही दाखविले आहेत. दालनाच्या डावीकडे पाठीमागील भिंतीवर जीवन - चक्राचे आलेखन केले आहे. त्यामध्ये कुंभार, वानर, मिथून दृश्य, उंट, बाजार आणि उद्यान इत्यादींचे दृश्य दाखविले आहे. या जीवन चक्रास एका व्यक्तीने दोन्ही हाताने पकडले आहे. नालागिरी दमन हा त्यापैकीच एक चमत्कार आहे. बुध्दाचा भाऊ देवदत्त ने बुध्दाला ठार मारण्याचा प्रयत्न अनेकवेळा केला होता.

एकदा बुध्द राजगृहात होते. तेव्हा देवदत्ताने अजातशत्रूच्या मदतीने एक षडयंत्र रचले व बुध्दाला मारण्यासाठी एक पागल हत्ती - नालागिरीस सोडला. या हत्तीने रस्त्यावर अनेक निरपराध लोकांना ठार केले. अशावेळी बुध्दाने पळून जावे असे त्यांच्या शिष्यांनी सांगितले. पण बुध्द पळून न जाता हत्तीसमोर गेले. तेव्हा हत्तीने शरण येऊन बुध्दाच्या चरणांना स्पर्श केला. बुध्दाने आपला हात त्याच्या मस्तकावर ठेवला. चित्रात भीतीने त्रस्त झालेले नागरिक आणि संतापलेले अजातशत्रु व देवदत्तही दाखविले आहेत. दालनाच्या डावीकडे पाठीमागील भिंतीवर जीवन - चक्राचे आलेखन केले आहे. त्यामध्ये कुंभार, वानर, मिथून दृश्य, उंट, बाजार आणि उद्यान इत्यादींचे दृश्य दाखविले आहे. या जीवन चक्रास एका व्यक्तीने दोन्ही हाताने पकडले आहे.

**२) छदंत जातक कथेचे चित्रण:**

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरील वीथीच्या डाव्या भींतीवर छदंत जातक कथेचे चित्रण आहे.[११९] सर्वात वर डाव्या बाजूला आजाराचा बहाणा करुन राणी आजारी पडल्याचे दाखविले आहे. ती बिछान्यावर झोपली आहे. अगदी खाली बोधिसत्वाला हत्तीच्या रुपात अन्य हत्तीसमवेत कमलवनात दाखविले आहे. उजव्या बाजूला पहाडाच्या आडून शिकारी हत्तीला पाहत आहेत. पाहाडावर माकडे खेळत आहेत. सर्वात वर सोनोत्तर शिकाऱ्यावर बाण चालवीत असल्याचे दाखविले आहे. खाली सोनोत्तर बोधिसत्व हत्तीची वंदना करीत आहे. या दृश्याच्या डाव्या बाजूस शिकारी हत्तीचे दान घेऊन राजदरबारात पोहोचल्याचे दाखविले आहे. राजा राणीला हाताने आधार देत आहे तर राणी हत्तीचे दात पाहून बेशुध्द होत आहे.

**३) महाकपी जातक कथेचे चित्रण:**

वरील चित्रांच्या पुढे महाकपी जातक कथेचे चित्रण केले आहे.[१२०] हे चित्र खिडकी व लहान दरवाजे यांच्या मध्ये आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व माकडाच्या रुपाने जन्माला आले. ते आपल्या अन्य साथीदारासह गंगा किनाऱ्यावरील जंगालात राहत होते. हा समूह आंब्याच्या बागेतील आंबे खात असे. वाराणसीचा राजा ब्रह्मदत्त यालाही येथील आंबे खाण्याची इच्छा झाली. पाण्यातून वाहून आलेल्या एका आंब्याचा स्वाद फार चांगला असल्यामुळे राजाने त्या आंब्याच्या बागेचा शोध आपल्या सेवकामार्फत लावला. राजाचे सेवक जेव्हा या बागेतील आंबे घेण्यासाठी आले तेव्हा जी माकडे या बागेतील आंबे खात होती त्यांचे जीवन संकटात आले. अशावेळी बोधिसत्वांनी आपल्या शरीराचा नदीवर एक पूल बनविला, जेणेकरुन त्यांचे सहकारी त्यांच्या पाठीवर चढून संकटातून दूर होतील ; पण त्यांचा भाऊ देवदत्त जो माकडाच्या रुपाने जन्माला आलेला होता त्याने मुद्दाम बोधिसत्वाच्या पाठीवर जोरात उडी टाकली. त्यामुळे बोधिसत्वांचा हात सुटला आणि ते ब्रह्मदेवाच्या सेवकांच्या हाती सापडले, परंतु बोधिसत्वाने केलेल्या या त्यागाने ब्रह्मदत्त प्रभावीत होऊन त्याने बोधिसत्वांचा आदर केला व त्यांच्या प्रवचनाचा लाभ घेतला. चित्रात दरवाजाच्या डावीकडे नदीचे दृश्य चित्रित केले असून नदीत मासे व अन्य जलचर प्राणी आहेत.

काही लोक स्नान करीत आहेत. डाव्या बाजूस राजा घोडेस्वारांसमवेत आहे. त्यामधील काही लोक माकडांकडे बाण मारत आहेत. सर्वात वर बोधिसत्वांच्या पाठीवरुन चालून गेलेली माकडे आहेत. खाली बोधिसत्वाला चादरीत गुंडाळून काही लोक घेऊन जात आहेत. खिडकीच्या वर बोधिसत्व राजाला प्रवचन ऐकवीत आहे.

**४) हस्ति व हंस जातक कथेचे चित्रण :**

पुढे हस्तिजातक कथेचे चित्रण आहे. डाव्या बाजूस भिंतीवर दोन भागात चित्रकाम केले आहे. या चित्राची कथा नेमकी कोणती आहे याचा शोध लागलेला नाही. वरच्या बाजूस राजदरबाराचे चित्र आहे. आणि खाली राजा हातात तलवार घेऊन बसलेला आहे. हंस जातक कथेचेही चित्रण येथे केलेले आहे. त्याचा काही भाग वडील पुषती व संजय यांचा निरोप घेत आहे.

वेसांतर हात जोडून बसला आहे. पुषती दु:खाने पुत्राकडे पाहात आहे. एक दासी पुषती व वेसांतर यांच्या मध्यभागी दु:ख व्यक्त करीत उभी आहे. इतर दोन पुरुष स्त्रियांसुध्दा वेसांतरकडे पाहात आहेत. पुढील दृश्यात माद्री व वेसांतर आपल्या दोन पुत्रांसह नगराबाहेर जात असल्याचे दाखविले आहे. पुढे ते सर्वजण रथात बसलेले आहेत. समोर भिक्षा मागणारे लोक आहेत. वेसांतर त्यांना घोडे व रथही दान देत आहे. पुढील दृश्यात कुमार वेसांतर, माद्री व त्यांची दोन मुले पायी चालत आहेत. आता त्यांच्या अंगावर कसलीच आभूषणे नाहीत.

थोडे पुढे गेल्यानंतर झुज्जक माद्रीला मुले देण्याची भिक्षा मागत असल्याचे चित्र आहे. माद्रीने या मागणीस नकार दिल्याने झुज्जक कुमार वेसांतरकडे मुलांची भिक्षा मागत आहे. मुले भीतीने वेसांतरला चिपकली आहेत, पण वेसांतरने मुलांना दान म्हणून झुज्जकला देऊन टाकलेच. यानंतर झुज्जकने राजा संजयच्या दरबारात जाऊन मुले परत केल्याचे व बदल्यात पैसे घेतल्याचे दाखविले आहे. झुज्जकचे पुढे दोन हात तुटलेले असून त्यास थोडीसी दाढी आहे. पुढील दृश्यात वेसांतर व माद्री परत येत असल्याचे दाखविले आहे.

**६) महाकपित जातक कथेचे चित्रण:**

पाठीमागील वीथीच्या डाव्या भिंतीवर महाकपित जातक कथेचे चित्रण केले असून त्याची कथा अशी आहे. एकदा एक ब्राह्मण शेतकरी आपल्या बैलांचा शोध घेताना जंगलात रस्ता चुकला. तो बऱ्याच दिवसापासून उपाशी होता. एका झाडावरील फळे तोडण्याच्या प्रयत्नात तो एका खड्डयात पडला. यावेळी बोधिसत्व माकडांच्या रुपाने जन्माला आले होते. त्यांना त्या ब्राह्मणाची दया आली आणि त्यांनी त्या ब्राह्मणास खड्डयातून वर काढले. तसेच त्यास खाण्यासाठी फळे दिली, पण बोधिसत्व झोपी गेले तेव्हा त्या कृतघ्न ब्राह्मणाने त्यांना दगड मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बोधिसत्व उडी घेऊन झाडावर चढले. एवढे होऊनही त्यांनी त्या ब्राह्मणास जंगलाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला.

चित्रात एक मनुष्य उडी मारुन फळे तोडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे व नंतर तो एका खड्ड्यात पडत असल्याचे दाखविले आहे. त्याला बाहेर काढण्यासाठी माकडाला खड्डयात

डोकावलेले दाखविले आहे. यानंतर झोपत असलेल्या बोधिसत्वाला मारण्यासाठी ब्राह्मणाने दगड उचलला आहे. शेवटी तेच माकड त्या ब्राह्मणाला जंगलातून बाहेर जाण्याचा रस्ता दाखवीत आहे.

**४) सुतसोम जातक कथेचे चित्रण:**

पाठीमागील वीथीच्या भिंतीवर डावीकडे सुतसोम जातक कथा चित्रित केली आहे.[१२१] त्याची कथा अशी आहे. बनारसचा राजा सुदास हा एकदा जंगलात शिकार करता करता आपल्या सहकाऱ्यांपासून अलग झाला. तो थकून झोपला तेव्हा जंगलातील एका वाघिणीने त्याचा पाय चाटला. नंतर त्या वाघिणीस मुलगा जन्मला तेव्हा ती वाघीण सुदासकडे गेली. त्याच्या मुलाला सौदासला नंतर राज्य मिळाले. वाघिणीच्या पोटी जन्माला आल्यामुळे सौदासला मानवाचे मांस खाण्याचा छंद होता. राजा झाल्यावर त्याला यासाठी मोकळीक मिळाली. नंतर प्रजेने त्यास पदच्युत केले. आता तो जंगलात निर्भयपणे मानवाचे मांस खाऊ लागला. एकदा इंद्रप्रस्थचा राजा सुतसोम जंगलात सौदासच्या हाती लागला. त्याने सौदासला अशी विनंती केली की मला खाण्यापूर्वी बुध्द कश्यप चे प्रवचन मला ऐकू द्यावे. बुध्दाचे प्रवचन ऐकल्यानंतर सुतसोम सौदासकडे आला ; पण त्याच्या प्रभावामुळे सौदासच्या वागण्यात बदल
झाला.

चित्रात राजा सुदास घोड्यावर बसून नगराबाहेर जात असल्याचे दाखविले आहे. त्याच्यासोबत त्याचे सहकारी आहेत. कुत्र्यांचा समूह हरणांचा पाठलाग करीत आहे. यानंतर राजा एकटाच दाखविला असून सभोवती जंगल व जंगली प्राणी आहेत. यानंतर वाघीण त्याचे पाय चाटीत आहे. ती बाजारात फिरत आहे. लोक आश्चर्यचकीत झाले आहेत. उजव्या बाजूस वाघीण राजासमोर उभी आहे. बालक राजाच्या हातात आहे. त्याच्या खाली सौदास विद्योपार्जन करीत आहे. उजवीकडे सौदासचे राज्यारोहण आणि स्नान दाखविले आहे. दुसऱ्या तीन दृश्यात मानवाचे मांस कापले जाणे, ती शिजविणे व राजापुढे सादर करणे हे दाखविले आहे. एका दृश्यात सौदास व प्रजा यांच्यातील लढाई दाखविली आहे. डाव्या बाजूला तो पदच्युत झाल्यानंतरचे दृश्य आहे.

**८) शरभ मृगजातक कथेचे चित्रण:**

अंतराळाच्या उजवीकडे पाठीमागील भिंतीवर चार जातक कथांचे चित्रण केले आहे. वरील भागावर शरभ मृगजातक कथा चित्रित आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व हरणाच्या रुपाने जन्माला आले. वाराणसीच्या राजाने शिकार करण्यासाठी त्याचा पाठलाग केला, पण तो खडड्यात पडला. बोधिसत्वाने मात्र आपला प्राण घेण्यासाठी आलेल्या राजाला खडड्यातून वर काढले व त्याचा जीव वाचविला. चित्रात मध्यभागात शिकारीला निघालेल्या लोकांचा समूह दाखविला आहे. उजवीकडे बोधिसत्वाच्या पाठीवर दगड ठेवून भार वाहून नेत असल्याचे दाखविले आहे. त्यानंतर बोधिसत्व राजाला पाठीवर घेऊन जात असल्याचे दाखविले आहे.

**९) मच्छ जातक कथेचे चित्रण:**

शरभ मृग जातकाच्या उजवीकडे मच्छ जातक कथेचे चित्रण करण्यात आले आहे.[१२२] एका सरोवरात एक मोठा मासा व अन्य लहान लहान मासे इतर प्राण्यांसह दाखविले आहेत. दुसऱ्या ठिकाणी असलेल्या एका चित्रात नाक डोळे बंद करुन म्हशीच्या पाठीवर बसलेले आहे. दुसऱ्या चित्रात एक क्रुध्द हल्या ( रेडा ) माकडास आपल्या पायाने दाबत असल्याचे दाखविले आहे. पाठीमागील व उजव्या बाजूकडील वीथीजवळ एका उपांत स्तंभावर एक यक्ष आहे. त्याच्या उजव्या हातात कमळाचे फूल आहे आणि तो उजवीकडे थोडा झुकला आहे. अलंकाराचे चित्रण सुंदर आहे. अजिंठा लेणी क्र. १७ मधील मच्छ जातक कथेचे चित्रण अतिशय सुंदर केलेले आहे.

**१०) सिंहल अवदान जातक कथेचे चित्रण:**

उजवीकडील वीथीमध्ये सुरुवातीच्या आणि शेवटच्या दोन उपान्त्य स्तंभाच्या मध्यभागी संपूर्ण भिंतीवर सिंहल अवदान जातकाचे चित्रण आहे. सिंहल विजयाची कथा दिव्यावदान मध्येही वर्णन केलेली आहे. या लेणीत चित्रित केलेली कथा दिव्यावदानाच्या कथेशी मिळती - जुळती पण थोडीशी भिन्न आहे. त्याची कथा अशी आहे. सिंहकल्पचा राहणारा व्यापारी सिंहक याचा पुत्र सिंहल हा मोठा प्रतिभाशाली होता. शिक्षणाची दीक्षा घेतल्यानंतर आपल्या पित्याला विदेशी जाऊन व्यापार करण्याची त्याने परवानगी मागितली. पित्याची इच्छा आपला पुत्र दूर जावा अशी नव्हती, पण तो पुत्राला थांबवू शकत नव्हता. सिंहल पाचशे अन्य व्यापाऱ्यांसह काही सामान घेऊन विदेशी गेला- व्यापाऱ्यांशी आपल्या वस्तू किफायतशीरपणे विकून ते परत निघाले. रस्त्यात ते ताम्र द्वीप या

ठिकाणी थांबले. याठिकाणी राहत असलेल्या राक्षसींनी सुंदर रमणीची रुपे घेऊन त्या पाचशे व्यापाऱ्यांचा आदर व सन्मान केला. सिंहल यास काही संशय आल्याने त्याने व्यापाऱ्यांना तेथून तात्काळ निघण्याचा सल्ला दिला, पण व्यापाऱ्यांनी ऐकले नाही. सिंहलला मदत करण्यासाठी बोधिसत्व आले. त्यावेळी ते घोड्याच्या रुपाने जन्माला आले होते. सिंहल आपल्या काही सहकाऱ्यासह घोड्यावर बसून उडून गेला. अन्य व्यापाऱ्यांना रात्री राक्षसींनी खाऊन टाकले.

सिंहल तेथून जम्बुद्वीपला गेला. राक्षसिणींनी त्याचा पाठलाग केल्यामुळे तो परत सिंहकल्पला आला. एक राक्षसीण पुन्हा सुंदरीचे रुप घेऊन व एक मुलगा हातात घेऊन तेथे आली व तिने त्याच्यासोबत राहू देण्याची विनंती केली. सिंहलने ती राक्षसीण असल्याचे राजाला समजाविले; पण राजाला तिची भुरळ पडली. सिंहलने तिला स्वीकारण्यास नकार दिला. तेव्हा राजाने स्वत: तिच्याशी विवाह केला. परिणामी या राक्षसिणीने अन्य राक्षसिणींना बोलाविले आणि त्यांनी राजमहालातील सर्व लोकांना खाऊन टाकले. पुढे सिंहलच्या नेतृत्वाखाली लोकांनी राजमहालावर हल्ला करुन राक्षसिणींना मारुन पळवून लावले. पुढे तेथील लोकांनी सिंहलला राजा बनविले.त्यांनी ताम्रद्वीप येथूनही राक्षसिणींना पळवून लावले. तेव्हापासून ते ठिकाण सिंहलद्वीप या नावाने प्रसिध्द झाले.

चित्रात सर्वात खाली तुटलेले जहाज आणि काही सुंदरी आहेत. एका खोलीत एक पुरुष व एक स्त्री आहे. दुसऱ्या दृश्यात राक्षसीण सिंहलच्या राजदरबारात आहे. तिच्या पाठीमागे राजाचा मंत्री आहे. दुसऱ्या दृश्यात राक्षसिणींचा राजमहालावरील हल्ला दाखविला आहे. राजमहालावर गिधाडेही आहेत. सिंहलने राजमहालावर चढाई केल्याचे चित्र आहे. राक्षसिणी पळत आहेत. सिंहलचे राज्यारोहणही दाखविले आहे- पुढे हत्ती, घोडे व पायदळ सैनिक ताम्रद्वीपवर चढाई करीत आहेत. ढाल, तलवार, भाला, तीर व धनुष्यबाण ही शस्त्रे सैन्याच्या हातात आहेत. याच वीथीमध्ये उपान्त्य स्तंभावर शृंगार करीत असलेल्या एका स्त्रीचे चित्र आहे. दोन दासी प्रसाधनाच्या कामात तिला मदत करीत आहेत. हे सुंदर चित्र अजिंठा येथील सुंदर चित्रापैकी एक आहे.

**११) शिबी जातक कथेचे चित्रण:**

समोरील वीथीमध्ये शिबी जातक कथा चित्रित केली आहे. लेणी क्रमांक एक मधील शिबी जातक - कथेपेक्षा ही जातक - कथा थोडी वेगळी आहे. याठिकाणी शिबी आपले डोळे दान देतो, त्याची कथा चित्रित केली आहे. एका दृश्यात शिबीचा दरबार आहे. पुढे शिबीचे डोळे काढत असल्याचे दृश्य आहे. नंतर शिबीने केलेल्या नेत्रदानामुळे खूश व प्रसन्न होऊन शक्क ने शिबीचे डोळे परत केले. शिबी - जातकात काही ठिकाणी अभिलेख चित्रित केले आहेत. या कथेतील चित्र एकाच वेळी पण अलग अलग कलाकारांनी काढल्यामुळे चित्रांत अंतर पडले आहे.

**१२) रुरु जातक कथेचे चित्रण:**

याच ठिकाणी रुरु जातक - कथा चित्रित केली आहे [१२३] एकदा बोधिसत्वाने स्वर्ण - मृगाच्या रुपाने जन्म घेतला. त्याने पाण्यात बुडत असलेल्या एका व्यक्तीचा जीव वाचविला या ठिकाणी चित्रात बुडत असलेलया व्यक्तीस स्वर्ण - मृग वर काढत असल्याचे चित्र आहे. राजाला जंगालात घोड्यावर बसून कुत्र्यासह शिकार करण्यासाठीजात असल्याचे दाखविले आहे. एक व्यक्ती स्वर्ण - मृगाला पकडण्याचा प्रयत्न करीत आहे. तिचा हात कापला जातो. शेवटी रथात बसलेल्या स्वर्ण मृगाचा जुलूस दाखविला आहे.

**१३) निग्रोध मृग जातक कथेचे चित्रण:**

वरील चित्राच्या पुढे निग्रोध मृग जातक कथा चित्रित आहे. त्याची कथा अशी आहे. बोधिसत्वाने एका गर्भवती हरीणीचा जीव वाचविण्यासाठी स्वत:ला बनारसच्या राजाच्या भोजनासाठी अर्पण केले. राजावर या घटनेचा इतका प्रभाव पडला की त्याने मांस खाणे सोडून दिले. चित्रात उद्यानात मृग दाखविले आहेत. काही मृग बसलेले आहेत, तर काही मृग उभे आहेत. काही वळून पाहात आहेत. वर राजाच्या स्वयंपाक घरात मृग स्वत:ला अर्पण करत असताना दाखविले आहे. पुढे मृग प्रवचन करीत असल्याचे चित्र आहे.

अंतराळातील भिंतीवर बुध्दाच्या जीवनातील अनेक चित्रे आहेत. उजवीकडील भिंतीवर श्रावस्तीचा चमत्कार चित्रित केला आहे. डावीकडील भिंतीवर तुशित स्वर्गात महामायेला प्रवचन सांगत आहे. सांकाश्य ब्रह्मा व शुक्रबरोबर पृथ्वीवर उतरत असल्याचे दृश्य आहे. सांकाश्यच्या सभेत

अनेक विदेशींची चित्रे आहेत. या लेणीत दरवाजाच्या डावीकडे अंतराळाच्या पाठीमागील भिंतीवर सर्वोत्कृष्ट चित्र आहे. बुध्दाला कपिलवस्तू नगरात यशोधरेसमोर भिक्षा मागत असल्याचे दाखविले आहे. लेणीच्या छतावर सुंदर चित्रण केले आहे. याच लेणीत कोंबड्याची झुंज, पहिवानांच्या कुस्त्या, बैलांच्या टकरी, किन्नर आणि विभिन्न प्रकारचे पक्षी चित्रित केले आहेत. बुध्दाला वंदन करण्यासाठी जात असणाऱ्या गंधर्व - अप्सरांचेही सुंदर चित्र या लेणीत आहे.

**५.५ वादनकला :**

नृत्य गायनाला ताल व साथ देण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या ध्वनीयुक्त साधनाला वादय म्हणतात. महाराष्ट्र शब्द कोशामध्ये वाजवणे, शब्द काढणे,वाद्यादिकांतून सूर काढण्याची क्रिया, गाण्याची साथ करणे, गायनाची निर्जीव पदार्थापासून तयार केलेल्या यंत्राने नक्कल म्हणजे वादन होय, असे म्हटले आहे.[१२४] वाद्य वाजवण्याच्या कौशल्याला वादन कला म्हणतात. गायन, नृत्य, चित्रे आदी कलां प्रमाणेच वाद्य कलेचा शोध मानवाने प्रारंभीच लावला असावा. प्राथमिक रानटी आवस्थेत मानवाने शिकारीसाठी वापरलेली हत्यारे ही वाद्याच्या उत्पत्तीचे दुवे आहेत.

दगडी हत्यारे परस्परांवर आदळल्यानंतर होणारा आवाज हा घनवर्गाच्या वाद्य उत्पत्तीस साहाय्यभूत झाला असावा. शिकारीसाठी मारलेल्या प्राण्यांचे कातडे वाळल्यानंतर त्यावर आघात केला असता वेगळा आवाज झाला. अशा कृतीतून चर्मवाद्यांची निर्मिती झाली असावी. शिकारीसाठी वापरल्या जाणाऱ्या धनुष्याच्या दोरी टणत्कारातून तंतू वाद्याचा जन्म झाला असावा. तसेच दरी, डोंगर, कपारी अथवा झाडाच्या पोकळीतून जोराने वाहणाऱ्या वाऱ्याचा वेगळा आवाज अनुभवून मानवी बुध्दीतून हवेच्या मदतीने वाजविल्या जाणाऱ्या सुषीर वाद्याचा जन्म झाला असावा. अशा प्रकारे निरीक्षण व अनुभव यांच्या साहाय्याने मानवाने निसर्गातील सुप्त शक्तीतून वाद्ये विकसीत केली असावीत.वादनकलेचे संवर्धन सिंधू संस्कृतीच्या काळातही कायम

होते. सिंधु संस्कृतीच्या उत्खननात जवळ जवळ ५५० शिक्के सापडले असून या शिक्क्यावर विविध आकृती व पशुपक्षांचे चित्रे अंकित केलेली आहेत. तसेच काही शिक्क्यावर वीणा व ढोल या वाद्यांची चित्रे देखील अंकीत केलेली दिसून येतात.[१२५]आज प्राचीन वाद्ये, वादनशैली, आकार, त्यांचा स्वर

काळाच्या पडद्याआड गेला आहे. केवळ प्राचीन शिल्पामध्ये ती पहावयाला मिळतात. भारतीय वाद्यांचे वर्गीकरण १) तंतुवाद्ये २) सुषिर वाद्ये ३) अवनद्ध वाद्ये ४) घनवाद्ये असे चार प्रकारात केले जाते.[१२६]

**१) तंतुवाद्ये :**

'तत' हा शब्द 'तन' म्हणजे ताणणे या धातूपासून उत्पन्न झालेला आहे.दोरी, रेशीम वा अन्य धातूची तार, अथवा प्राण्यांच्या आतडयाची दोरी घट्ट ताणली म्हणजे त्यातून संगीतमय नाद निघतो. अशा दोरीचा वा तारेची ज्या वाद्यामध्ये उपयोग केला जातो. त्या वाद्यांना तंतुवाद्ये असे म्हणतात. उदा. तुणतुणे, तंबोरा, सतार, व्हायोलीन, सरस्वती वीणा, नारदी वीणा ही तंतूवाद्ये आहेत.

**२) सुषिर वाद्ये :**

हवेच्या साहाय्याने वाजवली जाणारी वाद्ये म्हणजे सुषिर प्रकारची वाद्ये होय. उदा . बासरी, पावा, पुंगी, हार्मोनिअम, पिपाणी, तितरी, बिन, अलगूज ही सुषिर वाद्ये आहेत.

**३) अवनद्ध वाद्ये :**

चर्माच्छादित वाद्ये म्हणजे अवनद्ध प्रकारची वाद्ये होय. उदा. डफ, तबला, ताशा, मृदंग, ढोलकी, चौघडा, खंजिरी, कुडकुडे ही अवनद्ध वाद्ये आहेत.

**४) घन वाद्ये :**

घन वस्तूंचा एकमेकावर आघात करुन वाजवली जाणारी वाद्ये म्हणजे घन प्रकारची वाद्ये होय. उदा. टाळ, खुळखुळा, घंटा, घुंगरु, टिपरी, झर्झर ही घनवाद्ये आहेत.

मराठवाडयातील वाकाटक कालीन लेणीतील चित्रावरुन तत्कालीन वाद्यसंस्कृतीची माहिती मिळते. वाकाटक काळात मराठवाडयातील अंजिठा लेणी क्र. १ व १६ मध्ये कच्छपी वीणेचे चित्र आहे. अजिंठा लेणी क्र. १७ मधील प्रवेशद्वाराच्या उजवीकडे बोधीसत्वाच्या बरोबर एक मंजिरी वाजवत असलेली अप्सरा अतिशय सुंदर आहे. लेणी क्र. १७ मध्ये आलापिनी वीणेचे चित्र आहे. तसेच अजिंठा येथील लेणी क्र. १ मध्ये पाश्चात्य गिटारच्या धर्तीची वीणा मांडीवर घेतलेल्या पुरुषाचे चित्र पहावयाला मिळते. या लेणीमध्ये एक स्त्री आडवी बासरी धरुन वाजवत असल्याचे चित्र आहे.

अजिंठा येथील लेणी क्र. २ मध्ये उजव्या बाजूकडील उपगृहामध्ये दोन भव्य यक्षमूर्ती आहेत.त्यांच्या हातात शंख व पद्म असल्याने शंखनिधी व पद्मनिधी दाखवण्याचा प्रयत्न केला असावा.

वाकाटक कालीन औरंगाबाद येथील लेणी क्र. ७ मध्ये गर्भगृहाच्या पश्चिम भिंतीमध्ये नृत्य सभेचे शिल्प असून या शिल्पात नर्तिकेभोवती सहा स्त्रिया वेगवेगळी वाद्य वाजवित आहेत. एक स्त्री आडवा मृदंग वाजवत आहे. दोन स्त्रिया टाळ वाजवित आहेत. एक डमरु वाजवत आहे. एक स्त्री दोन उभे मृदंग ठेवून वाजवित आहे. एक स्त्री आडवी बासरी धरुन वाजवीत आहे.

अजिंठा लेणी क्र. १ मध्ये नृत्य सभेचे चित्र रेखाटले आहे. या चित्रात मध्यभागी एक नर्तकी नृत्य करत आहे. तिच्या भोवती सहा स्त्रियांचा वाद्यवृंद आहे. नर्तकीच्या उजव्या बाजूला एक स्त्री दोन उभे मृदंग वाजवत आहे. तिच्या खालच्या बाजूला असलेली स्त्री त्रिवली हे अवनद्‌ध वाद्ये वाजवत आहे. या चित्रात उभ्या मृदंगाचे तोंडावरील कातडे घट्ट गोल बांधलेले व दोऱ्यांनी ताणलेले दिसून येते. वाजवणाऱ्या स्त्रीच्या हातात दोन छोटया काडया आहेत. नर्तकीच्या डाव्या बाजूला दोन स्त्रिया लांबी रुंदीच्या दृष्टीने लहान अशी वेणू वाजवीत आहेत.औरंगाबाद लेणी क्र. ७मधील नृत्य सभा शिल्पात दोन अवनद्‌ध वाद्यासोबत दोन डाळ (छोटया चिपळया) वाजविणाऱ्या स्त्री वादक आहेत. यावरुन तत्कालीन नृत्यरंग शाळेत मृदंगासोबत दुसरे छोटे अवनध्द वाद्यांचा उपयोग आवश्यकतेनुसार केला जात असावा असे वाटते.

**५.६नृत्य कला :**

नृत् या धातूवरुन नृत्त, नृत्य, नर्तन असे शब्द बनले आहेत. महाराष्ट्र शब्दकोशात नर्तन (नृत्य) म्हणजे मनोरंजनार्थ अनेक अवयवांचे नियमबध्द व सताल चलनवलन करुन दाखविण्याची क्रिया ; नृत्, नाच, नृतकाने गाणे म्हणून त्यातील रस व भाग अंगविक्षेपाने व अभिनयाने प्रकट करण्याची क्रिया होय असे म्हटले आहे.[१२७] उत्तम नर्तन करण्याच्या कलेला नृत्यकला म्हणतात. महाराष्ट्र शब्दकोशात नाचणारा, नाचकाम करणारा, नाच्या आदीला नर्तक म्हटले आहे. नृत्य करणाऱ्या स्त्रीला नर्तकी म्हणतात. तिला नृत्यांगना, नटी, कलावंतीन असेही म्हणतात. नृत्यकला हे एक प्रकारचे रसायन आहे की, ज्यात रस, भाव आणि अभिनय यांचा समावेश असतो. रस आणि भाव यांची अभिव्यक्ती अभिनयाची जोड देऊन नृत्याद्धारे नर्तक करतो. कथानकाचा आशय, रस,

भाव अभिनयाचा सुरेख संगम साधून शब्दाचा वापर न करता ही तो प्रेक्षकांच्या अंत:करणापर्यंत पोहचवू शकतो.

भारताला नृत्यकलेचा वारसा प्राचीन काळापासून लाभला आहे. महाराष्ट्रातील मराठवाडयात प्राचीन चित्र शिल्प पाहवयाला मिळतात. वाकाटक कालखंडात मराठवाडयात अजिंठा लेण्यामधील सतराव्या क्रमाकांच्या लेण्यामध्ये ओसरीच्या डावीकडील भिंतीवर एका भव्य चक्राचे चित्र असून त्यात ग्रामीण व नागरी जीवन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. उदा : शेतकऱ्यांची घरे, जनावरे, तसेच नगरातील नाचरंग, प्रेमी युगलांचे विविध विलास, एकांतात आरण्यात चिंतन करणारे ऋषीगण चित्रित केले आहेत.

अजिंठा लेणी क्र. १ मध्ये जे नृत्य सभेचे चित्र आहे त्याचा विषय बुध्द जातक कथेतील महाजातक कथेतील आहे. शिवाली राणीच्या महालातील नृत्यसभा चित्राच्या माध्यमातून दर्शविली आहे. मध्यभागी सुंदर रंगीत व पूर्ण बाहयांचा पायघोळ गाऊनसारखा वेष परिधान करुन नर्तिका नृत्य करत आहे. त्रिभांगवस्थेतील सुंदर - हस्तमुद्रा व थोडीशी तिरकी मान केली आहे. तिच्या डोक्यावर आभूषण आहे. हे चित्र नृत्यातील गतिमानता दाखवीत आहे. लेणी क्र. १ मध्येच महाजन जातक कथेचे चित्रण आहे. पहिल्या विभागात राजदरबारात खिन्न मुद्रेत बसलेला आहे. त्याची राणी त्याची समजूत घालत आहे. समोरच नर्तिका नृत्य सादर करीत आहे.

अजिंठा लेणी क्र. २ मध्ये शांतिवादिन जातकचे चित्रण आहे. या चित्रामध्येही राणी व नाचणाऱ्या नर्तकीचे चित्र आहे.येथील नृत्य करणाऱ्या नर्तकीचे रेखाटन अतिशय सुंदर आहे. नर्तकी राजाची क्षमा मागत असून ती जीवदान देण्याची भीक मागत आहे.

वाकाटककालीन औरंगाबाद येथील लेणी क्रमांक ७ मध्ये शिल्पाच्या माध्यमातून नृत्यसभेचे दर्शन होते. औरंगाबाद लेणी क्र. ७ मधील गर्भगृहाच्या पश्चिम भिंतीला नृत्यसभेचे शिल्प आहे. या नृत्यसभेतील शिल्पामध्ये अत्यंत सौष्टवपूर्ण आणि घाटदार शरीराची एक नर्तिका मध्यभागी नृत्य करीत असून तिच्या बाजूला सहा स्त्रियांचा वाद्यसमूह वेगवेगळी वाद्य वाजवीत आहेत. येथील नर्तिकेचा सुंदर पदन्यास, वैशष्यपूर्ण हस्तमुद्रा व कमरेतील लवचिकता यामुळे ही नर्तिका उठावदार दिसते. या नृत्यसमुहात मध्यभागापासून उजवीकडे तीन स्त्रीया व डावीकडे

तीनपेक्षा जास्त स्त्रिया आहेत. नृत्यसमुहातील नायिकेचा साजशृंगार पारंपारिक पध्दतीचा आहे. नृत्यसमूहाच्या उजव्या बाजूस प्रक्षेकांचा समूह बसला आहे.या नृत्य समूहातील प्रमुख नायिका म्हणजे नर्तिका ही औरंगाबादची राजतडाग आहे.[१२८] वाकाटक काळात नृत्यकलेला स्थान होते या वरुन सिध्द होते.

वरील प्रकरणामध्ये वाकाटक कालीन कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे. वाकाटक काळात मराठवाडयात कला व स्थापत्या क्षेत्रात भरीव स्वरुपाची प्रगती झाली. औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, उस्मानाबाद व शिऊर, खारोसा येथे बौध्द व हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती झाली .या कालखंडात मूर्ती शिल्प व चित्रकलेचा ही विकास झाला. शिऊर लेणीत मुर्ती शिल्प असून अजिंठा लेणीतील चित्रकाम जगप्रसिध्द आहे.

# संदर्भ सूची


१. एन. डब्ल्यू. डी.ई.एस., १९८१ पृ. ५७.

२. सर मोनियर विल्यमस, एस.ई.डी.., १८९९. पृ. २६१.

३. दाते य.रा. (संपा) म.श. विभाग दुसरा. १९८८. पृ.६२३.

४. शर्मा, श्रीराम (संपा) यजु, १९६२, अध्याय, ३० श्लोक ६ ते २२

५. रोडे सोमनाथ व सुतार अमर, १९८६. पृ.८.

६. Sharan R., Ancient Indian History Culture and Archae ology, 2002, p. 428.

७. रोडे सोमनाथ व सुतार अमर, पूर्वोक्त. पृ.९.

८. Gokhale B.G. Buddhism in Maharashtra. p. 3,4

९. कठारे अनिल, मराठवाडयातील लेणी, २००१. पृ. १०.

१०. भावे वा.कृ. मुसलमान पूर्व महाराष्ट्र, खंड २. १९४७.पृ.३.

११. जोशी महादेवशास्त्री, (संपा) भा.सं. को. खंड दहावा, १९७९. पृ.१८७.

१२. पाटील माया, पुरातत्व: एक पर्यालोचन, २०११. पृ ३२

१३. कठारे अनिल, भारतीय कला व स्थापत्य, २०००. पृ. २८

१४. कित्ता. पृ. २९.

१५. औरंगाबाद डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर,१८८४. पृ. २५२.

१६. कठारे अनिल, भारतीय कला व स्थापत्य, खंड दुसरा २००६. पृ. १६

१७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, १९५६, पृ. १६८.

१८. कित्ता. पृ. १६७.

१९. जोशी सु.ह. महाराष्ट्रातील लेणी, जाने २०११, पृ. ४१.

२०. दि घटोत्कच केव्ह इन्स्क्रप्शनस् (हैद्रबाद आर्किऑजिलिक सीरीज) प्लेट ४ व ५

२१. Pathy T.V. & Prasad V.R.N., Ajanta, Ellura and Aurangabad Caves - 1972, p. 113-115.

२२. जोशी सु.ह. पूर्वोक्त. पृ. १८.

२३. कित्ता.

२४. Buhalar, op.cit., 1883, p. 124.

२५. जोशी सु.ह. पूर्वोक्त. पृ. २१.

३१. काटे पी.व्ही. पूर्वोक्त, पृ. २१२.

३२. कठोर अनिल., पूर्वोक्त, पृ. २४

३३. A.S.W.I., Vol. -III, Plate III, Plate No.1,2

३४. रोडे सोमनाथ व सुतार अमर, पूर्वोक्त. पृ.२२.

३५. मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली सर. क्रमांक ६. १९७२. पृ. २०६

३६. Deo P.R. and Shelke G.C., Brahmanical Caves of Siur, Vol.XI. 1972, p. 71.

३७. Ibid.

३८. साखरे विजया, नांदेड जिल्ह्यातील पुरातत्व-एक अभ्यास, जुलै २००८, पृ.१०५-१०७.

३९. मिराशी वा.वि., पूर्वोक्त. पृ. १३.

४०. कित्ता.

४१. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977.

४२. Dhavlikar Madhukar, Ajanta : A Cultural Study, 1973, p. 112.

४३. Kandhar through Epigraphy and Archaeology - Journal of Epigraphical Society of India, Vol. VII, 1980, p. 23.

४४. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ.१९५.

४५. जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.३६१,३६६.

४६. कित्ता, पृ.३६३.

४७. Indian Archaeology - A review, Delhi, 1937-38, p. 96.

४८. Annaul Report of the Archaeological Department of H.E.H, Nizams Dominion, 1914-15, Hyderabad, p. 86.

४९. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६२.

५०. पाठक अ.शं. ( संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, २००२, पृ.२९८.

५१. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, १९९३, पृ.१९१.

५२. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६४.

५३. Indian Archaeology - A review, Delhi, 1937-38, p. 96.

५४. Ibid. p-98

५५. Ibid. p-105

५६. Ibid. p-96,99

५७. Ibid. .

५८. पाणिनि., ५,६,९६.

५९. ऋग्वेद, १०.१३०.३.

६०. कित्ता, ७,९,१९,

६१. पतंजलि, महाभाष्य, १९३५, पृ.४५.

६२. Marshall Jonh, Mohenjodaro and Indus Civilisation, Vol. I, 1931, p. 44.

६३. Ibid. .

६४. Banerjea J.N., The Development of Hindu Iconography, 1956, p. 159.

६५. Marshall John. Op. Cit.

६६. Banerjea J.N., Op. Cit. p. 176.

६७. Marshall John, Op. Cit., Plate - XII, Figs. 13,14,19.

६८. Mackey E., Further Excavations at Mohenjodarao, 1938, p. 258-259.

६९. Ibid.

७०. खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग पहिला, १९५१, पृ.१७६.

७१. ऋग्वेद ९.२२.१६,१.१५४.१-६.

७२. Gopinathrao T.A., Elements of Hindu Iconography, vol. I, 1968, p. 78-80.

७३. जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.५०-५१.

७४. कित्ता, पृ. ५३-५५.

७५. विष्णुधर्मोत्तर पुराण, ८१.२.८.

७६. श्रीवास्तव बलराम ( संपा.), १९६४, ३.९.२०, पृ.१३५.

७७. कित्ता.

७८. Deshmukh B.S., Murthishilpvaibhav, 1986, p. 54.

७९. रुपमंडन, पृ.१५८.

८०. Deo Prabhakar and Shelke G.C., Brahmanical caves of Siur, 1972, p. 72.

८१ . Gopinathrao T.A., Op. Cit., Vol. II., pp. 119-120.

८२. Banerjea J.N., Op.Cit., 1956, p. 415.

८३. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.६७.

८४. विष्णुधर्मोत्तर पुराण, पुस्तक - ७९, २.७.

८५. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, 1987, pp. 59-60.
८६. ऋग्वेद, ८,८४,३-४.
८७. श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, १९९०, पृ. ५१.
८८. Agrawala Urmila, Khajuraho Sculptures and Their Signifi cance, 1964, p. 186.
८९. विष्णुधर्मोत्तर पुराण, ८०.२.९.
९०. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.१०६.
९१. मेश्राम प्रदिप व इतर, भद्रावती- पुरातत्वीय वैभव २००४.पृ. ४५.
९२. कित्ता.
९३. Deshmukh B.S., Murtishilpvaibhav, Explorations in local History and Literature, 1986,P. 59.
९४. लिंगपुराण , पुस्तक -१७,१५-२२, मनुसुखराय मोर, कलकत्ता , १९६०, पृ. ४०-४४
९५. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.१०६.
९६. कित्ता.
९७. देवीभागवत पुराण, ५, २, १७-४८, पृ. ३३६-३३८.
९८. वामनपुराण (संपा. जोशी प्र.न.) शके १९०५, पृ. ५६.
९९. विष्णूधर्मोत्तर पुराण, ११७-२०,२२.
१००. भागवतपुराण, २, ७, १४.

१०१. Spooner D.B., Excavatopms at Basarh, Archaeological Survey of India Annual Report, 1913-14, p. 133. Plate -XL, VI, No. 191.
१०२. Hastings Majes, Encyclopaedia of Religion and Ethics, VOl. II, 1953, p. 739.
१०३. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ. २७०.
१०४. तुळपुळे, शं.गो. (संपा) १९८४. पृ. ३६.
१०५. डिकसळकर., द.बा., म.प्रा.इ.स. १९६४. पृ.७६.
१०६. राजवाडे वि.का. भा.वि.सं. इ.२००६.पृ. १००.
१०७. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 20.
१०८. Ibid .P.21.
१०९. पाटील माया, पूर्वोक्त पृ. ३५

११०. जोशी सु.ह. पूर्वोक्त पृ. २३

१११. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 30

११२. Ibid .P.31

११३. Ibid .P.32..

११४. मिराशी वा.वि., पूर्वोक्त पृ. १४४

११५. कित्ता पृ. १४७.

११६. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 53.

११७. पाटील माया, पूर्वोक्त पृ. २१

११८. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 57

११९. Ibid .P.58

१२०. Ibid .P.59..

१२१. मिराशी वा.वि., पूर्वोक्त पृ. १५९

१२२. कित्ता पृ. १६२.

१२३. कित्ता पृ. १६३.

१२४. दाते य.रा. (संपा) म.श. विभाग सहावा, १९८८ पृ. २७९३

१२५. लुनिया बी.एन., प्रा. भा.सं. २००९. पृ. ६१.

१२६. रातंजनकर श्री. ना. संगीत परिभाषा १९७३. पृ. १२५.

१२७. दाते य.रा. पूर्वोक्त पृ. १७९६.

१२८. कठारे अनिल., पूर्वोक्त, पृ. २२.